# निबंधकार डॉ. आंबेडकर



डॉ. यशवंत मनोहर

# निबंधकार डॉ. आंबेडकर

**डॉ. यशवन्त मनोहर**
स्नातकोत्तर मराठी विभाग,
नागपूर विद्यापीठ, नागपूर ४४० ००१

संघमित्रा बुक हाऊस, नागपूर ४४० ००१

NIBANDHKAR DR. AMBEDKAR : 1988

प्रकाशिका :

सौ. प्रभाताई गजभिये
संघमित्रा बुक हाऊस
गड्डीगोदाम, गौतमनगर,
बुद्धविहाराजवळ, नागपूर–४४० ००१

© डॉ. यशवन्त मनोहर
अ / २, विद्यापीठ प्राध्यापक निवास
अमरावती मार्ग, नागपूर–४४० ०१०

प्रथमावृत्ती
विजयादशमी १९८८

मुखपृष्ठ :
संजय धोतरकर,
नागपूर

मुखपृष्ठ छपाई :
माधवराव फरकाडे
मयूर आर्टस्
गणेशपेठ, नागपूर

मुद्रक :
म. पां. बनहट्टी,
नारायण मुद्रणालय,
२२४ टिकेकर रोड, धनतोली
नागपूर–४४० ०१२

किंमत १० रुपये

जोतिराव फुल्यांच्या
प्रेरक बंडखोरीला —

[illegible]

— [illegible]

# प्रस्तावना

पत्रकारितेच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मराठी लेखनाचा अभ्यास होण्याची अत्यंत आवश्यकता आहे असे जाणकारांना वाटावे अशी परिस्थिती आहे.

'निबंध कार डॉ. आंबेडकर' या पुस्तकात माझी भूमिका निराळी आहे. बाबासाहेबांच्या मराठी लेखनाचा मी वैचारिक निबंध म्हणून इथे विचार करीत आहे. मराठी वैचारिक निबंधाच्या संशोधक आणि चोखंदळ अभ्यासकांनी आणि वाङ्मयेतिहासाच्या लेखकांनी निबंधकार म्हणून डॉ. आंबेडकरांचे नावही घ्यायचे टाळावे ही घटना या अभ्यासकांचे अभ्यासकपण व संशोधकपण प्रश्नार्थक करून टाकते. आंबेडकर केवळ निबंधकार, महत्वाचे निबंधकार आणि युगंधर निबंधकारच आहेत असे नव्हे तर ते निबंधकारांचेही निबंधकार आहेत. या निबंधकाराच्या प्रेरणेने विश्वविख्यात अशी विद्रोही वाङ्मयाची चळवळ मराठीत निर्माण झाली. त्याच्या नावाने 'वाद' सिद्ध झाला. तो देशाच्या संविधानाचा शिल्पकार होता. तो सर्वश्रेष्ठ प्रबोधनकार आणि या देशातील शोषितांच्या क्रांतितत्त्वज्ञानाचा जनक होता. वैचारिक निबंधाची घटना मांडणे, त्या घटनेनुसार मराठीतील वैचारिक निबंधाचा धावता तपास करून डॉ. आंबेडकरांचे वैचारिक निबंधकार म्हणून महनीय स्थान मांडून दाखविणे हा या पुस्तकाचा हेतु आहे.

ज्योतिक ढाले आणि कुलदीप शेंडे यांचे या पुस्तकाच्या संदर्भात मोलाचे सहकार्य झाले. प्रेसची सगळी धावपळीची कामे त्यांनी मनापासून केली त्याबद्दल त्यांचे, चित्रकार धोतरकरांचे आणि अल्पावधीत सुबक छपाई करून दिल्याबद्दल नारायण मुद्रणालयाचे मनापासून आभार मानतो. संघमित्रा प्रकाशनाने हे पुस्तक अगत्याने छापायला घेतल्याबद्दल या प्रकाशनासंबंधीही मी हार्दिक कृतज्ञता व्यक्त करतो.

विजयादशमी १९८८ —यशवंत मनोहर

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | वैचारिक निबंधाची घटनातत्त्वे | १ |
| २. | डॉ. आंबेडकरांचा समाजविचार | २४ |
| ३. | डॉ. आंबेडकरांचे धार्मिक विचार | ३५ |
| ४. | डॉ. आंबेडकरांचे राजकीय विचार | ४३ |
| ५. | डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार | ५३ |
| ६. | डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक विचार | ६० |
| ७. | डॉ. आंबेडकरांचे वाङ्मयविषयक विचार | ७२ |
| ८. | डॉ. आंबेडकरांचे कामगार आणि क्रांतीसंबंधी विचार | ८१ |
| ९. | डॉ. आंबेडकरांची गद्यशैली | ८६ |
| | परिशिष्ट | |
| | डॉ. आंबेडकरांचा त्रोटक जीवनपट | १०३ |

१

# वैचारिक निबंधाची घटनातत्त्वे

" While it is true that a non-Brahmin Scholar is free from the inhibitions of the Brahmin scholar, he is likely to go to the other extreme and treat the whole Literature as a collection of fables and fictions fit to be thrown on the dung heap not worthy of serious study. This is not the spirit of an historian, as has been well said, an historian ought to be exact, sincere, and impartial, free from passion, unbiased by interest, fear, resentment or affection; and faithful to the truth, which is the mother of history, the preserver of great actions, the enemy of oblivion, the witness of the past, the director of the future. In short he must have an open mind, though it may not be an empty mind, and readiness to examine all evidence even though it be spurious."

(Preface : Who were the shudras ?)

—**Dr. Ambedkar**

विचार करता येणे हे मनुष्याचे अनन्य वैशिष्ट्य आहे. 'विचार करता येणे' या महाशक्तीमुळेच मानवजातीचा आजवरचा विकास झाला आहे. "संस्कृती ही अनुभवांचे आणि विचारांचे संचयस्थान असते."[१] असे जे म्हटले गेले आहे ते खरे आहे. विचार हा कोणत्याही संस्कृतीच्या खोलीचा आणि उंचीचा मापदंड असतो. त्या संस्कृतीमधील भावनात्मक व्यवहारही विचारकक्षेच्या आतच चालतात. त्यामुळे भावनात्मक व्यवहार अधिक अर्थपूर्ण व सर्वस्पर्शी, अधिक उपकारक व प्रकाशतत्त्वस्पर्शी होण्यासाठी विचाराच्या कक्षा अधिकाधिक विस्तृत होणे आवश्यक असते. विचार हा मुळात अनुभवच असतो. या अनुभवातून निष्कर्ष निर्माण होतात. हेच विचार होत. ते माणसाच्या विवेकशक्तीचा विकास करतात. या विकासातून परत विचार नवनवी क्षितिजे ओलांडीत जातो. "मनुष्य स्वभावतःच बुद्धिप्रधान आहे. कारण नियमबद्ध निसर्गाच्या कुशीतूनच तो उदय पावला आहे बुद्धी हाही जीवनधर्मच असल्यामुळे माणसाची इच्छाशक्ती बुद्धीशी मुळीच विरोधी नाही."[२] या विवेचनाचा अर्थ असा की, मनुष्य विचार करणारा प्राणी आहे. तो बुद्धिवादी आहे. वैचारिक निबंध मनुष्याच्या या अनन्य वैशिष्टयाच्या पोटीच जन्माला येतो. या निबंधामुळेच संस्कृती उन्नत होते. त्यामुळेच मानवजातीचा विकास होतो. राष्ट्रांना सामर्थ्य प्राप्त होते. "...तत्त्वचिंतन–निबंधलेखन हे जर तेथे होत नसेल तर, त्या देशाला संस्कृतीच्या उच्च पदवीवर यत्किंचितही अधिकार सांगता येणार नाही. कारण मानाच्या स्थानावर विराजमान होण्यासाठी जी बलसंपन्नता राष्ट्राच्या अंगी असावी लागते तीच निबंध-लेखनाच्या अभावी तेथे असू शकणार नाही. खरोखर निबंध ही एक महाशक्ती आहे."[३] समाजाला प्रवाहित ठेवण्याचे, त्याला जागृत व

१. लक्ष्मणशास्त्री जोशी, **वैदिक संस्कृतीचा विकास**, वाई, दु. आ. १९७२, पृ. ५००
२. मानवेन्द्रनाथ रॉय, **नवमानवतावाद**, वाई, १९५५, पृ. १०२
३. वि. स. खांडेकर : **समाज चिंतन**, पुणे (पुनर्मुद्रण) १९७९ प्रस्तावनेतून पृ. १०

सतर्क ठेवण्याचे आणि त्याला अधिकाधिक पूर्णत्वाकडे जाण्यात सतत शक्ती देण्याचे कार्य मनुष्यजीवनात वैचारिक निबंध करीत असतो. वैचारिक निबंध म्हणजे एकाअर्थी प्रकाशपूजन आणि वैचारिक निबंधकार म्हणजे समाजभास्कर होत. "सत्यान्वेषणात गढून गेलेले संशोधक व तत्त्वचिंतक हे कोणत्याही समाजाचे डोळे होत."[४] असा गौरव प्रा. सरदार या निबंधकारांचा करतात. जीवनातील विविध घडामोडींचे, त्यातील अवरोधांचे आणि उफाळांचे, त्यातील अगतिक प्रवृत्तींचे आणि प्रागतिक प्रवृत्तींचे विश्लेषण करून, समाजजीवनाच्या या विवक्षित स्वरूपाचे दृश्यादृश्य अंतःसूत्र स्पष्ट करून उज्ज्वल भविष्याच्या प्रकाशवाटा समाजापुढे अंथरण्याचे कार्य हा निबंधकार करीत असतो.

**घटना**

वैचारिक निबंधाला विषयाची मर्यादा नाही पण त्याच्या पृष्ठांच्या आवाक्यासंबंधी काही संकेत आहेत. या मर्यादित अवकाशात निबंध एखाद्या विषयाचा त्याची प्रज्ञा पोचेल तिथपर्यंत वेध घेतो. त्याला पूर्णत्व असते त्या विषयापुरते निबंधकाराने आपले सर्वांगीण चिंतन निबंधात मांडलेले असते. शोधप्रबंध आणि प्रबंध यांचीही प्रतिज्ञा त्या विषयाच्या अनुषंगाने संभवणाऱ्या सत्यापर्यंत पोचणे हीच असते. पण शोधप्रबंध आणि प्रबंध यांना त्या विवक्षित विषयासंबंधी इतर लेखकांनी केलेल्या चिंतनाचे आधार घेत, उपलब्ध चिंतनाचे खंडन–मंडन करीत विषयासंबंधी आपल्याला जाणवणाऱ्या नव्या सत्यापर्यंत जावे लागते. निबंध हे बहुतांशी मुक्त चिंतन असते. प्रकट चिंतन असते. त्या त्या विषयासंबंधी उपलब्ध असलेले चिंतन अध्याहृत मानून, त्या चिंतनाचा खंडनमंडनात्मक परामर्श न घेता स्वतंत्रपणे आपली भूमिका निबंधकार मांडू शकतो. असे बहुतांशी वैचारिक निबंधाच्या संदर्भात घडत असले तरी वैचारिक निबंध आपल्या मर्यादित आवाक्यात शोधप्रबंधाच्या किंवा प्रबंधाच्या संशोधनपद्धतीचा अवलंब करूनही सिद्ध होऊ शकतो.

४. गं. बा. सरदार, **प्रबोधनातील पाऊलखुणा**, (संपा), निर्मलकुमार फडकुले, पुणे, १९७८, पृ. १

अर्थात गद्याचे (१) वैचारिक गद्य व (२) ललित गद्य हे विभाग पडतात. वैचारिक गद्याचे निबंध, शोधप्रबंध आणि प्रबंध असे विषयाच्या प्रकृतीच्या, आवाक्याच्या आणि क्वचित लेखनपद्धतीच्या अनुषंगाने उपविभाग पडू शकतात.

**वैचारिक निबंधाची रचनातत्त्वे**

वैचारिक निबंध ही एक गंभीर घटना असते. तत्त्वप्रतिपादन किंवा नवमतप्रतिपादन ही या निबंधाची प्रतिज्ञा असते. समाज, राजकारण, धर्म, अर्थकारण, शिक्षण, साहित्यकारण यांच्यात मूलगामी परिवर्तन या ध्यासाने आणि भौतिकवादी दृष्टीने निबंध वाचकाच्या विवेकशक्तीला आवाहन करीत असतो. "एक विचारबीज मनात येताच त्याविषयी सर्व माहिती संकलित करणे, तिचे वर्गीकरण करणे, मग तिची व्यवस्थित रचना करणे व त्यावरून शेवटी निष्कर्ष काढणे या पद्धतीने मानवी मनात ग्रंथ तयार होतो. तसा तो तयार झाल्यावर विषयाचे महत्त्व, त्याची कारणे, त्याचे पूर्वरूप, सध्याचे रूप, रूढ समज, वास्तव स्थिती, विरोधी विचार, तुलना, आक्षेप, खंडन, मंडन, इतर पंडितांचे त्याविषयी विचार ऐतिहासिक दृष्टीतून परीक्षण, अन्वयव्यतिरेक पद्धतीने तपासणी, उपायचिंतन इत्यादी विविध अंगांनी त्याचा-त्या बीजाचा-वटवृक्ष तयार करणे ही निबंधरचना होय. तिचे लेखन करताना उपक्रम, उपसंहार यावर कटाक्षाने लक्ष ठेवणे आणि उपहास, उपरोध, व्याजोक्ती, वक्रोक्ती, उपमा दृष्टान्तादी अलंकार, इतिहासातील प्रमाणे, कार्यकारणमीमांसा, संस्कृत, मराठी, इंग्रजी, अवतरणे, सुभाषिते, अनेकविध न्याय, म्हणी, पंचतंत्र, इसापनीती, यासारख्या ग्रंथांतील गोष्टी यांनी मूळ विषयाचे प्रतिपादन सजवणे या सगळ्याला शैली म्हणतात."[५] अशी वैचारिक रचनाप्रक्रिया सांगता येईल. स्वतंत्र, समावेशक बुद्धी, विशुद्ध व्यापक दृष्टी, समाजाचे खोल, मूलगामी अवलोकन, जीवनप्रणालींचे सूक्ष्म भेदक विश्लेषण, उत्कर्षापकर्षकारक प्रवृत्तींचे अचूक, समतोल मूल्यमापन, प्रखर, प्रगमनशील तत्त्वचिंतन,

५. पु. ग. सहस्रबुद्धे, **महाराष्ट्र संस्कृती**, पुणे, १९७९, पृ. ७७१

उन्नतिपथाचे दूरदर्शी: धीट दिग्दर्शन, स्वमताचे साधार, सप्रमाण विवेचन, समर्पक, साक्षेपी लेखन या सगळयांतून-या सगळयांच्या समवायातून- सशक्त, सुंदर निबंध सिद्ध होतो. गतानुगतिकता, पुराणप्रियता यांचा त्याग करून निर्लेप अंत:करणाने, निर्मल मनाने, नव्या हितकारक गोष्टींचे स्वागत करण्याइतके औदार्य ज्या बुद्धीत असते, नव्या तत्त्वज्ञानांचा उद्दाम उद्रेक पाहूनही विस्मित किंवा स्तिमित न होण्याइतके धैर्य ज्या दृष्टीत असते, नवनव्या तत्त्वज्ञानांच्या व त्यांच्या स्वीकारामुळे लाभणाऱ्या अमृत-फळांच्या संदर्भात स्वत:च्या राष्ट्राच्या अंतर्बाह्य प्रकृतीची चिकित्सा,-मीमांसा करण्याची अपार तळमळ ज्या अवलोकन विश्लेषणाच्या मुळाशी असते...त्या विवेचन-लेखनातून सिद्ध होणारा निबंध समर्थ व सुंदर व्हावा, इतकेच नाही तर एका अपूर्व तेजाने विलसावा हे अगदी स्वाभाविक होय."[६] वैचारिक निबंध हा याप्रकारे माणसाला उन्नत-निर्दोष जीवनाकडेच घेऊन जाणारा असला पाहिजे. त्याने प्रतिगामित्वापासून समाजाला दूर नेले पाहिजे. स्वातंत्र्य-समता-बंधुता-न्याय व बुद्धिप्रामाण्य या पंचशीलाशी त्याची बांधिलकी असली पाहिजे. **स्थितिशीलतेचे, अंधश्रद्धांचे, विषमतेचे समर्थन करणारा निबंध 'अविचार' सांगत असल्यामुळे वैचारिक निबंध ठरू शकणार नाही.** अपरिहार्यपणे वैचारिक निबंधातील विचार समाजाला मागे नेणारा रस्ता सांगत नसतो. तो मूठभरांच्या हिताची प्रतिगामी वकिली करीत नसतो. तर बहुजनहिताय-सुखाय हीच वैचारिक निबंधातील विचाराची प्रतिज्ञा असते. समाजाला दैववादी बनविणारे, बहुसंख्यांना गुलाम करणाऱ्या धर्माची, संस्कृतीची, परंपरांची महती गाणारे, सडलेल्या मानवतामारक मूल्यांची भक्ती शिकवणारे 'अविचार' पुरस्कारणारे लेखन वैचारिक निबंध ठरणार नाही. निबंधाला लेखकाच्या व्यक्तित्वाची महानता लाभते. लेखक जेवढा बुद्धिवादी, पुरोगामी आणि समतापूजक तेवढा वैचारिक निबंध मोठा होतो. मराठीप्रमाणे निबंध म्हणून ओळखले जाणारे इतर लेखन मूठभर उच्चांचे हित पाहणाऱ्या प्रतिगामी शक्तींची सेवाचाकरी करीत असते.

---

६. उनि. **समाजचिंतन.** पृ. १०-११

वैचारिक निबंधाच्या व्याख्या

निबंध म्हणजे एकत्र मांडणे होय. मुद्दे, विचार सुसूत्र मांडणे म्हणजे निबंध. 'गोवलेला विषय' असा निबंध या संस्कृत शब्दाचा धात्वर्थ दिला जातो. 'एखाद्या विषयाच्या सांगोपांग विवेचनाचा लेख' असे सरस्वती शब्दकोश सांगतो. तर 'कोणताही विषय न्याय्य रीतीने उद्घाटणे आणि त्याची यथाशक्ती जुळणी करून जे वर्णन करणे तो निबंध होय' असे मराठी ज्ञानप्रसारकाचे म्हणणे आहे. मराठी लेखकांनी दिलेल्या काही महत्त्वाच्या व्याख्या अशा–

(१) "प्रौढ, प्रगल्भ व्यक्तित्वाचा, सखोल, सकस, विचारांच्या रूपाने, समुचित, समर्थ शैलीच्या माध्यमातून झालेला अर्थगर्भ, आवाहन-क्षम आविष्कार म्हणजे निबंध होय."[७] –वि. स. खांडेकर

(२) "साधारणपणे एखादा विचार किंवा एखादा मुद्दा सुसंगतपणे ज्यात मांडलेला असतो, त्याला निबंध म्हणावयास हरकत नाही."[८]

–अळतेकर

(३) "तर्कशुद्ध रीतीने केलेली, बुद्धीला आवाहन करणारी, आपले सिद्धान्त साधार, सप्रमाण मांडणारी, इतिहास, अनुभव, अवलोकन यांच्या पायावर उभारलेली विचारप्रधान रचना, असा याचा अर्थ येथे अभिप्रेत आहे. ही रचना वीसपंचवीस पृष्ठांपर्यंत असली तर हल्ली आपण तिला निबंध म्हणतो."[९] –डॉ. सहस्त्रबुद्धे

वैचारिक निबंध जीवनाच्या सर्व क्षेत्रांतील आविष्कारांचे, सर्व क्षेत्रातील परिवर्तनाचे नेतृत्व करतो. याअर्थी सर्व जीवनक्षेत्रांसाठी तो महापुरुष असतो. तो समाजाला गतिशास्त्र देतो आणि त्याच्या प्रगतीला नीतीशास्त्र देतो. श्रेष्ठ, निबंधरचना ही सुंदर व समर्थ माणसाच्या रचनेचे सौंदर्यशास्त्र देते. प्रगतीकारक काय आणि प्रगतीमारक काय ते समाजाचा क्रांतदर्शी डोळा असलेला हा वैचारिक निबंध सांगतो.

७. तत्रैव. पृ. १०

८. म. मा. अळतेकर, मराठी निबंध, नागपूर, १९६३. पृ. ५

९. उनि. महाराष्ट्र संस्कृती. पृ. ७६९

### इंग्रजी निबंध

मॉन्तेन (१५३३ ते १५९२) या फ्रेंच निबंधकाराला पाश्चात्य जग आद्य वैचारिक निबंधकार मानले. त्याने पुढे ललित निबंधही लिहिले. मॉन्तेनचा गंभीर वैचारिक निबंध बेकनने (१५६१–१६२६) आणि ललित निबंध अब्राहम काउलीने इंग्रजीत नेला. बेकननंतर जॉन्सन, (१७०९–१७८४) मेकॉलि इत्यादी थोर वैचारिक निबंधकार मानले जातात. या निबंधकारांचा वैचारिक निबंध शास्त्रीय प्रगमनशील दृष्टी, नवविचार-प्रवर्तन, मांडणीतील तर्कशुद्धता या गुणांनी मंडित झाला होता.

### मराठी निबंध

वरील गुणांनी मराठीतील लोकहितवादी, फुले, आगरकर, राजवाडे, आंबेडकर, पु. ग. सहस्रबुद्धे, लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. गं. बा. सरदार या निबंधकारांचा वैचारिक निबंध खऱ्या अर्थाने मंडित झाला आहे.

मराठीत वैचारिक निबंध आणि ललित निबंध यांच्या स्वरूपांविषयी काही गफलत झालेली आहे असे या संदर्भात झालेल्या लेखनावरून वाटते. वैचारिक निबंधाची प्रकृती आणि प्रतिज्ञा निराळी आहे. ललित निबंधाची प्रकृती वैचारिक निबंधापेक्षा वेगळी आहे. ललित निबंधकार आणि वैचारिक निबंधकार यांच्या व्यक्तित्वात खूप अंतर असते. अनेकदा त्यांच्या प्रतिज्ञा, त्यांचे हेतू सारखे वा जवळपास येणारे असू शकतात पण दोन्ही निबंधप्रकारांची मांडणी निरनिराळी असते. दोघांची घटनाच वेगवेगळी असते. एक निखळ बुद्धिशक्तीला आवाहन करतो. दुसरा भावशक्तीला आवाहन करतो. क्वचित ललित निबंध बुद्धिशक्तीला आवाहन करू शकत असला तरी त्याच्या आवाहनाची पद्धती, प्रकृती आणि त्यांत समाविष्ट होणारे विचारेतर भावानुभवादी घटक त्याला विशुद्ध विचारनिष्ठ, तर्कानुमानप्रधान विश्लेषणपर-वस्तुनिष्ठ अशा वैचारिक निबंधापासून वेगळे करतात. तर्कशक्तीला व विचारसौष्ठवाला उपकारक एवढ्या लालित्याचे ,वैचारिक निबंधाला वावडे नाही. पण लालित्य ही वैचारिक निबंधाची प्रतिज्ञा नव्हे.

मराठीतील वैचारिक निबंध अपरिहार्यपणे महाराष्ट्रातील समाज-प्रबोधनाचा, येथील क्रांतीप्रक्रियेचा उद्गाता असलाच पाहिजे. समाजाच्या प्रगतीला अपाय करणाऱ्या श्रद्धा आणि भारतीय भूतकाळातील मूठभरांच्या हिताच्या निष्ठा यांचे आधुनिक जीवनमूल्यांच्या व येथील पीडितांच्या उत्थानाच्या काळात तुणतुणे वाजविणारे लेखन वैचारिक निबंध म्हणवून घेऊ शकणार नाही. मराठीतील वैचारिक निबंधाच्या क्षेत्रात लोकहितवादी फुले-आगरकर यांचे १९२० पर्यंतच्या काळात अधिराज्य आहे तर १९२० नंतरच्या काळावर डॉ. आंबेडकर ह्यांचे निबंधकर्तृत्व मध्यवर्ती आहे. सत्यान्वेषी बुद्धी व सारासार विचारशक्ती जागृत करणे ही लोकहितवादींच्या निबंधांची प्रतिज्ञा आहे. फुल्यांचा निबंधही लोकहितवादींच्या निबंधासारखा लढाऊ आणि या समाजातील विषमतेच्या नावाने चौफेर हल्लाबोल करणारा आहे. तर्कशुद्धता, बुद्धिवाद आणि दाहकता ही आगरकरी निबंधाची वैशिष्टये आहेत. राजवाडयांचा निबंधही अनोख्या प्रज्ञेचा विलास करतो. या सर्वच गंभीर निबंधकारांची प्रकृती उग्र आहे. त्याचे आवाज तापलेले आहेत. 'कठीण शब्द या धोंडयांनी' ते हाणाहाण करीत आहेत. पुढे आंबेडकर-सहस्रबुद्धे-तर्कतीर्थ-सरदार यांचेही निबंध अधिक विस्तृत आवाक्याचे व धीरगंभीर होताना दिसतात. मराठीतील वैचारिक निबंध प्रारंभापासूनच अन्यायाविरुद्ध विद्रोह पुकारत आला आहे. पुढच्याही काळात जीवनात सर्व क्षेत्रांमधील अवरोधांशी त्याने आपल्या शक्तिशाली बोलांनी निकराचे भांडण सुरू ठेवलेले आहे. या देशातील ९५ टक्के उपेक्षितांच्या उज्ज्वल भवितव्याचे स्वप्न पाहणारा निबंध लोकप्रिय होणे शक्य नव्हते. उलट या समाजातील पाच टक्क्यांच्या भूतकाळाची आरती करणारा निबंध लोकप्रिय झाला. त्यामुळे मराठी निबंधाचे नुकसान कमी झाले पण समाजाचे नुकसान मात्र भयंकर झाले. "लोकहितवादींची परंपरा जर महाराष्ट्रात चालली असती तर आपले सामाजिक प्रश्न आजच्या इतके सोडविण्याला कठीण होऊन बसले नसते. पण दुर्दैवाने टिळक-चिपळूणकर परंपरा टाळयांच्या कडकडाटात पुढे

आली व लोकहितवादींची धिम्मी व कार्यक्षम परंपरा मागे पडली. याचे परिणाम आजवर महाराष्ट्राने भोगले आहेत व अजूनही त्यातून त्याची सुटका झाली नाही."[१०] या म्हणण्याची अन्वर्थकता कोणीही अजमावून पाहू शकतो. लोकहितवादी--फुले--आगरकर या मराठीतील सूर्यकुलाच्या निबंध-कार परंपरेत १९२५ नंतरच्या काळात आंबेडकरांचे निबंधकर्तृत्व केंद्रवर्ती महत्त्वाचे मानायला हवे.

**भारतीय समाजक्रांतीचे अपर्यायी तत्वज्ञान**

एकोणिसाव्या व विसाव्या शतकात भारताला परिवर्तनाची दृष्टी देणारे, प्रबोधनाचे नवे तत्त्वज्ञान देणारे जे थोडे प्रज्ञाभास्कर झाले त्यात डॉ. आंबेडकरांचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागेल. या युगप्रवर्तक विचारवंताला भारतीय समाजक्रांतीचे जिवंत 'दर्शन' झाले होते आपल्या प्रबोधनाचा वारसा पाठीशी घेऊन हा विचारवंत भारतीय जीवनावर अहोरात्र क्रांतिकारी विचारांचा घणाघाती मारा करीत होता आंबेडकर या विलक्षण तत्त्वज्ञापुढे भारतीय जीवनाने भयंकर पेच टाकला होता. त्याला या जीवनाने स्वस्थ बसून नुसतेच तत्त्वज्ञान निर्माण करण्याचे कार्य करू दिले नाही तर त्याला अत्यंत मरणक्रूर प्रसंगातून नेणारे जनतेचे लढेही लढवावे लागले. आंबेडकरांमधला विचारवंत आंदोलनांच्या आगीत निखाऱ्यांप्रमाणे फुलला आणि त्यांच्यामधला आंदोलनकार विचारांच्या महायुद्धात विजयी पराक्रमासारखा झळाळून निघाला. यामुळेच त्याच्या विचाराला 'वादाचे' महिमान प्राप्त झाले. अभिनव, स्वतंत्र आणि क्रांतिकारी जीवनप्रणालीची मौलिकता या विचाराला प्राप्त झाली.

आधुनिक भारताला ज्या प्रकारच्या तत्त्वज्ञाची गरज होती तो तत्त्वज्ञ आंबेडकरांच्या रूपाने या देशाला मिळाला. आधुनिक भारतात या तत्त्वज्ञाला पर्याय नाही. भारतीय समाजसंस्थेच्या क्रॉनिक आजारांना आंबेडकरांइतके समर्पक उत्तर जगाजवळ नाही. 'परंतु यासम हा' या

---

१०. भी. रा. आंबेडकर, '**बहिष्कृत भारता**'तील डॉ. आंबेडकरांचे स्फुट लेख (संपा. रत्नाकर गणवीर) नागपूर, १९८१ पृ. १५३.

कोटीतील हा तत्त्वज्ञानी आहे. एखादा विचारवंत समाजकारणाच्या आणि राजकारणाच्या वादळात आपले विचारवंतपणच बेमीत हरवून बसला असता पण आंबेडकरांनी या देशाच्या क्रांतीचे त्यांच्या प्रज्ञेने पाहिलेले तत्त्वज्ञान भारतीय जीवनाच्या रणभूमीवरील युद्धात आंदोलनांच्या रूपाने उभे केले. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान समाजक्रांतीच्या एकमेवाद्वितीय प्रतिज्ञेने प्रत्यक्ष आंदोलनात क्रांतिवीर झालेले आहे. जीवनाच्या सर्व गोठलेल्या अंगांवर नवा प्रज्ञाप्रकाश टाकून त्यांना क्रांतीप्रवृत्त करणारे तत्त्वज्ञान या देशाला आंबेडकरच देऊ शकले. भारतीय समाजाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आंबेडकर समजून घेण्याला पर्याय नाही या देशातील खऱ्या आमूलाग्र परिवर्तनाच्या सर्वंकष लढ्याचे अनन्य स्फूर्तिनिधान केवळ आंबेडकर होऊ शकतात. या देशाच्या प्रकृतीत जाणकाराने चिंताग्रस्त व्हावे इतका बिघाड झाला असून त्याचे जगणे, जगणे म्हणण्याच्या योग्यतेचे उरलेले नाही तेव्हा त्याला क्रांतिविचाराचे औषधपाणी दिल्याशिवाय दुसरा इलाज नाही. यासाठी लोकहितवादी, फुले, आगरकर इत्यादी प्रबोधनकारांनी या देशाला आधुनिकतेचे नवे रसायन जबरदस्तीने पाजले. आंबेडकर या परंपरेमधलेच समाजपंडित आहेत. प्रबोधनकाराला लोकांच्या गतानुगतिक भावनांना कुरवाळून चालत नाही. इष्ट असेल ते बोलणार आणि योग्य असेल ते करणार हा बाणा त्याचा असावा लागतो. 'सत्यासाठी माझी शब्दविवंचना' किंवा 'तुका म्हणे सत्य सांगे येवोत रागे येतील ते' ही त्याची प्रतिज्ञा असावी लागते. असा मनुष्यच नव्या समाजाचा शिल्पकार ठरतो. नव्या जीवनाचा जनक ठरतो आंबेडकर या त्यांच्या प्रज्ञाकर्तृत्वामुळे नव्या भारताचे रचनाकार ठरले.

बुद्धानंतर आपल्या देशाची वैचारिक वाटचाल थांबली. नवविचारांची निर्मिती बंद झाली. इंग्रजी राजवट येईपर्यंतच्या काळात हा देश मुख्यत्वे अध्यात्माचा, प्रारब्धाचा आणि निवृत्तीचा; जीवन पांगळे करणारा बेभान पोवाडा गात होता. हजारो वर्षे स्वर्ग-परलोक यांच्या स्वप्नांनी या देशाच्या आयुष्यात दयनीय गोंधळ घातला होता. या काळात काही परकीय राजवटी आल्या पण ही समाजसंस्था 'रक्षणीय गा सर्वथा'

अशीच राहिली. श्रुतिस्मृतिपुराणांनी गोठवलेली ही समाजसंस्था इंग्रजी राजवट येईपर्यंत अपरिवर्तनीय रूपात थांबून होती. पण इंग्रजी राजवटीनंतर त्यात मूलगामी स्थित्यंतरे होऊ लागली. आपल्या सुधारकांनी इंग्रजी राजवटीचे गोडवे गाईले त्याचा हा संदर्भ आहे. इंग्रजी राजवटीचे व सुधारकांचे मोल हजारो वर्षे गुलामगिरीचा शाप भोगावा लागल्याशिवाय कळायचे नाही.

**आंबेडकरांचे असाधारणत्व**

हजारो वर्षे गती हरवलेल्या भूमीत नवा भारत निर्माण करण्यासाठी ज्यांनी अहोरात्र प्रयत्नांची पराकाष्ठा केली त्यात आंबेडकरांचे स्थान अनन्यसाधारण आहे. हा आपला प्रबोधनकार या देशाच्या संविधानाचा सन्माननीय शिल्पकार आहे. त्याहूनही विशेष म्हणजे भारतीय समाजातील मूलभूत बदल कायदेशीर मार्गाने घडविणे, भारतीय समाजाला प्रगतीकारक असण्याचे व मानव्याप्रत जाण्याचे ध्येय देणे हे उद्देश असलेले हिंदू कोडबिल त्यांनी तयार केले. भारतीय संविधान, हिंदू कोडबिल, लोकशाही, सजाजवाद, बुद्धधम्म या त्यांच्या प्रज्ञाप्रकर्षाने या देशात नवा मनू सुरू झाला असे मानले जाते.

डॉ. आंबेडकर हे एका अंतहीन संघर्षाचे नाव आहे. त्यांचे आयुष्य "धम्मराज्य" स्थापन करताना प्रखर प्रज्ञासूर्य झाले. या समाजव्यवस्थेतील कमाल विषमतेचा, तुच्छतेचा आणि अपमानाचा जीव रक्तबंबाळ होईपर्यंत त्यांनी अनुभव घेतला होता. विविध अपमानांनी दाह झालेल्या डोळ्यांनी त्यांनी आपल्या समाजाचे अवलोकन केले. विषमतेचे हलाहल पचवीत त्यांच्या प्रज्ञेने भारतीय समाजात निघालेले माणुसकीचे दिवाळे पाहिले. इंग्रजी राजवट पाश्चात्य ज्ञान–विज्ञान घेऊन इथे येते. आधुनिक मूल्यांची रुजवात होऊन एका प्रबोधनाची प्रक्रिया इथे अर्धे पाऊण शतक चालू राहते. डॉ. आंबेडकर हे ज्या समाजात वावरत असतात तो समाज विसाव्या शतकातला पाठीशी एक प्रबोधन घेऊन उभा असलेला समाज असतो. तरीही काही वरवरचे दर्शनी बदल सोडले तर हा समाज मनुष्यता फुलविण्यास अजूनही असमर्थ समाज आहे हेच त्यांच्या

अनुभवास येते. सामाजिक विषमता, आर्थिक विषमता आणि अशा सर्वच जहरी विषमतांचे फडेनिवडूंग हिंदू धर्माने आणि उच्चवर्णियांनी पोसलेले असतात. परिणामी येथील समाज, समाज म्हणून अस्तित्वात असण्याची आपली योग्यताच गमावून बसलेला असतो. व्यक्तीला व्यक्ती म्हणून अस्तित्वात असणे इथे हजारो वर्षे अशक्य झालेलं असते. हे राष्ट्र त्यामुळे अर्धांगवायू झाल्याप्रमाणे दुबळे आणि निकामी झालेले असते. इथे वर्णांची उतरंड होती आणि या वर्णांची उपवर्गवारी म्हणून जातींची उतरंड होती. अस्पृश्य, स्त्रिया, आदिवासी, भटके हे सर्वच इथल्या निर्दय सामाजिक गुलामगिरीचे अगतिक बळी होते. इथे माणूसकी मोडून पडली होती. न्याय इथे मरून पडला होता. समता, स्वातंत्र्य, बंधुता, विज्ञान या मूल्यांची इथे सर्व शक्ती पणाला लावून राख केली गेली होती. बुद्धिवादाला इथे भयंकर अपमानित बहिष्कृत केले गेले होते. ही समाजसंस्था मनुष्यता जन्माला घालण्याच्या दृष्टीने केवळ वांझ झाली होती आणि माणुसकी मारणाऱ्या हत्यारांची श्रेष्ठ जीवनमूल्ये म्हणून येथील मूठभर उच्चवर्णीय पूजा करीत बसले होते. आंबेडकरी जीवनदर्शन आणि हे जीवनदर्शन प्रत्यक्षात साक्षात करू पाहणारी आंदोलने वरील दुराग्रही, हटवादी व अमानुष जीवनमूल्यांच्या दिंडीत रंगलेल्या समाजवास्तवाच्या संदर्भात साकार होतात.

मनुष्याचे अर्थपूर्ण अस्तित्व व न्यायाधिष्ठित समाज हे आंबेडकरवादाचे ध्येय आहे. त्यासाठी कुणीही केली नाही त्या खोलात जाऊन त्यांच्या मुख्यत्वे इंग्रजी लेखनातून त्यांनी भारतीय समाजसंस्थेची कठोर मीमांसा केली आणि या देशातील समग्र उपेक्षितांच्या बंधमुक्तीचे तत्वज्ञान सिद्ध केले. सांसदीय लोकशाही व राज्य समाजवाद यांच्या सेंद्रिय संयोगातून त्यांचा लोकशाही समाजवाद साकार होतो. जागतिक पातळीवरही आंबेडकरांची ही मांडणी नवी ठरते. अध्यात्माशी पूर्ण फारकत घेऊन त्यांनी हा समाजवाद निखळ बुद्धिप्रामाण्यवादावर उभा केला आहे. नास्तिक बुद्धाचा बंधुत्व हीच नीती सांगणारा धम्म नास्तिक आंबेडकरांनी या समाजवादाशी जोडून दिला.

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ज्या समाजजीवनात नांदतात ते जीवन सामाजिक लोकशाही होय. असे असले तरी अमर्याद स्वातंत्र्याने समतेचा नाश होतो आणि निर्भेळ समता स्वातंत्र्याला वाव ठेवीत नाही. समतेवाचून स्वातंत्र्य आले म्हणजे मूठभर लोकांचे अनेकांवर राज्य येते. स्वातंत्र्यावाचून समता म्हणजे व्यक्तीच्या स्वयंप्रेरणेचा नाश होय. बंधुभाव नसेल तर स्वातंत्र्य आणि समता यांची वाढ होणार नाही. स्वातंत्र्य आणि समता यांची पायमल्ली होऊ नये यासाठी संरक्षण म्हणून कायदा हवा असतो, पण कायदा स्वातंत्र्य आणि समता यासंबंधी होणाऱ्या उल्लंघनाविरुद्ध हमी देऊ शकत नाही. म्हणून बंधुतेला फार उच्च स्थान द्यावे लागते. अनिर्बंध स्वातंत्र्य व निर्भेळ समता याविरुद्ध बंधुभावनेचेच संरक्षण आहे. या बंधुतेचेच दुसरे नाव मानवता असून धम्माचे ही ते दुसरे नाव आहे. कायदा निधर्मी असल्याने एखाद्याला तो मोडता येतो पण बंधुता अर्थात मानवता हा पवित्र धम्म आहे अशी सामाजिक लोकशाहीची रूपरेषा बाबासाहेबांनी मांडलेली आहे.

डॉ. आंबेडकरांच्या मते लोकशाही हा केवळ शासनप्रकार नसून ती एक जीवनप्रणाली आहे. सामाजिक न्यायाच्या ध्येयाशी प्रतिबद्ध असलेली लोकशाही त्यांना राजकीय लोकशाही, सामाजिक लोकशाही, आर्थिक लोकशाही अशा सर्व जीवनक्षेत्रांना बंधुत्वाने नियंत्रित करणाऱ्या जीवन पद्धतीच्या रूपात त्यांना प्रतीत झाली आहे. बंधुता हाच धम्म. बंधुता हीच नीती. तेच सर्व जीवनसत्वाचे जीवनसत्व होय असे त्यांना वाटते.

सामाजिकदृष्ट्या आपला समाज मागल्या हजारो वर्षांमध्ये श्रेणीयुक्त विषमता या तत्त्वावर आधारलेला आहे. त्यातून येथील अन्यायग्रस्त मानवतेला मुक्त करण्यासाठी बाबासाहेब लोकशाही समाजवादाची मांडणी करतात आणि येथील सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, वाङ्मयीन अशा सर्व क्षेत्रांची पुनर्रचना होणे त्यांना अत्यंत निकडीचे वाटते.

भारतात समाजवादाचा प्रश्न आर्थिकतेपेक्षा मूलत: सामाजिक आहे त्यामुळे व्यक्तीची प्रतिष्ठा व व्यक्तीची सामाजिक जबाबदारी यात सम-

तोल साधण्यासाठी आणि चातुर्वर्ण्य व जातीरचना निकालात काढण्यासाठी बाबासाहेब राज्य समाजवादाची प्रस्थापना करतात. शेती, विमा व उद्योग-धंदे यांचे राष्ट्रीयीकरण आणि बंधुता व बुद्धिप्रामाण्य यातून त्यांचे चिंतन साकार होते.

आंबेडकरी समाजवादानुसार राज्यातील सर्वच उत्पादनसाधने राज्याच्या मालकीची होतात. घटनेच्या कायद्यात त्याची तरतूद असावी हे मांडून सत्ताधारी पक्ष या अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप करू शकणार नाही याची काळजी ते घेतात. समाजवाद स्थापन करण्याची जबाबदारी ते संसदेवर-लोकप्रतिनिधींवर सोपवीत नाहीत. मार्क्सप्रमाणे समाजवादाच्या स्थापनेच्या प्रक्रियेतील एक कडी म्हणून आंबेडकर हुकुमशाहीला मान्यता देत नाहीत. "It is only by this one can achive triple object, namely, to establish Socialism, retain Parliamentary Democracy and avoid Dictatorship." अशी त्यांची मांडणी मार्क्सपेक्षा प्रकृतितः वेगळी ठरते. परिवर्तनाची अधिक हमी देणारी ठरते. साम्यवाद ही मार्क्सची अंतिम व्यवस्था तर लोकशाही समाजवाद ही आंबेडकरांची अंतिम व्यवस्था ठरते. संसद आणि कामगार या दोन्ही घटकांना भारता-सारख्या देशात सार्वभौमत्व द्यायला ते तयार नाहीत. कारण जातीमनस्क बहुसंख्येचे शासन लोकशाही ठरत नाही. विद्यमान राज्यघटना 'राक्षसांचे आश्रयस्थान' झालेलं आहे असे म्हणूनही त्यांनी राज्यघटनेवरच विश्वास टाकला कारण येथील सामान्य–उपेक्षित मनुष्य क्रमाने घटनेला राबविणारा होऊ शकतो हे आहे. विद्यमान सांसदीय लोकशाहीत भांडवलदार आणि प्रतिगामी यांचेच प्रतिनिधी बहुसंख्य असल्याने संसदही समाजवादी समाज निर्माण करू शकत नाही, त्यामुळे श्रीमंतांची अर्थसत्ताच काढून घ्यायला हवी नि दुसऱ्या बाजूने बुद्धिप्रामान्यवादी व विज्ञाननिष्ठ दृष्टी समाजात निर्माण करावी त्यामुळे संसद उपेक्षितांच्या हिताची होईल. घटनेच्या मार्गाने आंबेडकर हा समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि विज्ञाननिष्ठ जीवनप्रणालीचा प्रयोग या परंपरावादी, जातीवादी आणि अंधश्रद्ध देशात करू इच्छितात.

सामाजिक व आर्थिक विषमतेने गलितगात्र केलेला या देशातील माणूस उन्नत व्हावा, राष्ट्रजीवनात तो समरस व्हावा, त्यामुळेच राष्ट्र खऱ्या अर्थाने स्वतंत्र होईल. जात, वर्ण आणि संप्रदायविहीन सामाजिक बंधुता प्रत्यक्षात आणणे, समाजातील सर्व घटकांमध्ये सुसंवाद निर्माण करणे म्हणजे राष्ट्रवाद होय असे बाबासाहेबांना वाटते. राष्ट्रवाद धर्म-निरपेक्ष आणि बुद्धिप्रामाण्यवादी असावा. प्रतिगामित्वाची पुनरुज्जीवनाची सोय त्यात असू नये. लोकसंख्येच्या बहुत्वावरून राष्ट्राला एखाद्या धर्माचे नाव देऊ नये असा धर्मवाद व राष्ट्रवाद अत्यंत विघातक असतो. तो राष्ट्रवादी पिसाटपणा होय. कोणताही धर्म या राष्ट्राचे धर्मनिरपेक्ष, बुद्धि-प्रामाण्यवादी, सुधारणावादी रूप शबलित करणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. राष्ट्रवादाच्या नावाखाली जुन्या विषमसमाजसंस्थेचे पुनरुज्जीवन करणे इष्ट नव्हे असे आंबेडकरवादाचे म्हणणे आहे. या राष्ट्राच्या ऐक्याची काळजी हा या प्रबोधनकाराच्या चिंतनाचा केंद्रबिंदू आहे या राष्ट्राच्या अभंगतेची व उज्ज्वल भविष्याची मांडणी करणारे आंबेडकर म्हणाले होते. "आज जर राष्ट्राला कोणत्या गोष्टीची गरज असेल तर ती जनतेच्या मनात एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याची होय. आपण प्रथम भारतीय असून नंतर हिंदू, मुसलमान, सिंधी वा कानडी अशी भावना निर्माण करण्यापेक्षा आपण प्रथमतः भारतीय व नंतरही भारतीयच आहोत अशी भावना निर्माण केली पाहिजे. हा आदर्श दृष्टी-समोर ठेवायचा असेल तर ज्यामुळे संकुचित प्रांताभिमानाची व पक्षाभि-मानाची वाढ होईल अशा सर्व गोष्टी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत." हे विसरू नये शिवाय भारताच्या एकात्मतेला दुभंगवून टाकणारी गोष्ट म्हणजे परंपरावाद. ते म्हणाले होते, 'भारतीय व्यक्ती दोन विरोधी ध्येय-वादांनी नियंत्रित होत आहे.' राज्यघटनेच्या प्रस्तावातील ध्येयवाद व धर्माचा सामाजिक ध्येयवाद हे त्यांना परस्परविरोधी वाटतात. कारण राजकीय ध्येयवादाने स्वातंत्र्य समता, व सदभाव या जीवनमूल्यांना मान्यता मिळाली तरी प्रचलित सनातनी वृत्तीच्या ध्येयवादामुळे ती व्यवहारात

नाकारली गेली आहेत. हे राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गातील मोठे संकट त्यांना वाटते.

## प्रबोधनातील अनन्य स्थान

आपल्या प्रबोधनात आंबेडकरांचे कार्य सर्व दृष्टींनी अनन्यसाधारण महत्त्वाचे आहे. आपल्या प्रबोधनातील जोतिराव फुल्यांची आंदोलनशक्ती त्यांनी पुढे नेली. आधुनिक भारतातील बुद्धिवादाचे अध्वर्यु असलेल्या प्राचार्य आगरकरांचा अज्ञेयवाद त्यांनी जडवादापर्यंत–नास्तिकतेपर्यंत नेऊन पोचविला. आगरकर अनेक कारणांनी ग्रंथातच राहिले पण आंबेडकरांनी बुद्धिवादाला आंदोलनाचे प्रकाशनपीठ प्राप्त करून दिले. त्यांच्या कर्तृत्वामुळे इथे निरिश्वरवाद चळवळ झाला. जडवाद मासमुव्हमेंट झाला. एम. एन. रॉय यांनी रॅडिकल ह्युमॅनिझम मांडला. आंबेडकरांच्या लोकशाही मानवतावादात रॅडिकल ह्युमॅनिझमसकट समाजिक्रांतीच्या सर्वच अंगोपागांचे पूर्णप्रकाशन झाले आहे फुल्यांसकट सर्वच प्रबोधनकारांना ईश्वर वा धर्म यांच्यापासून प्रबोधनाला वेगळे करता आले नाही. सामाजिक नीती आणि धर्मश्रद्धा या भिन्न गोष्टी आहेत. सामाजिक व्यवहारातील धर्माचे वर्चस्व झुगारून द्यावे असे आगरकर म्हणतात पण व्यक्तिगत जीवनात ते धर्माला मान्यता देतात. यासंदर्भात आपल्या प्रबोधनाला आंबेडकरांचे अनन्यसाधारण योगदान आहे. ते धर्मनिष्ठ वा अध्यात्मनिष्ठ प्रबोधनकार नाहीत. आंबेडकरांनी धर्म व धम्म या दोन गोष्टी भिन्न मानल्या, धर्म ईश्वर, आत्मा, स्वर्ग, कर्मविपाक मानतो. धम्म असे काहीच मानत नाही. धम्म म्हणजे ऐहिक पातळीवरची समता–स्वातंत्र्य–बंधुतेची नीती होय. धम्म हे समाजरचनेचे इहवादी–बुद्धिप्रामाण्यवादी तत्त्वज्ञान होय. त्यात पूजा–भक्ती. अंधश्रद्धा असा कोणताच दैवी पसारा नाही. हा जडवादी नैतिकविचार आहे. या अर्थाने आंबेडकरांनी धर्मत्याग–धर्मसंस्थात्याग केला. ते धर्मविहीन झाले. आपल्या प्रबोधनाला त्यांनी धर्मविहीनतेत उभे केले. त्यांच्या भूमिकेनुसार त्यांनी 'धर्माचा' स्वीकार केला नाही. धम्मस्वीकार केला. म्हणून धम्मस्वीकाराच्या घटनेला धर्मांतर म्हणता येत नाही. लोकहितवादी–फुले

यांच्या धर्मनिष्ठ प्रबोधनाला आंबेडकरांनी धर्मविहीनतेपर्यंत व आगरकरांच्या अज्ञेयवादाला निरीश्वरवादा–जडवादापर्यंत आणून पोचवले. आंबेडकरांपाशी पहिल्यांदा आपले प्रबोधन कोवळेपणा विसर्जित करून वयात आले. प्रगल्भ झाले. आपल्या प्रबोधनातील आंबेडकरांचे हे स्थान 'परंतु यासम हे' असेच आहे.

## विश्वविचारपरंपरेत आंबेडकर

विसाव्या शतकातील क्रुद्ध बुद्ध वाटावेत असे आंबेडकरांचे वादळी व्यक्तिमत्व आहे. विश्वविचारपरंपरेत उभी करता येतील अशी प्रज्ञावंत माणसे आपल्याकडे कमीच आहेत. भारताचे जगाला सर्वश्रेष्ठ योगदान म्हणून बुद्धाचा स्वीकार जगाने केला. आधुनिक भारतात जागतिक कॅनव्हास डोळ्यापुढे ठेवून विचार करणारी रॉय–आंबेडकर अशी मोजकीच माणसे आहेत. लोकशाही जगातील विद्यमान घटनांपेक्षा बाबासाहेबांची मनुष्यनिर्माणाची घटना अत्यंत आगळी आहे. तो एक मौलिक नैतिक सिद्धांत आहे, सर्वच माणसांचे भवितव्य त्यात सुरक्षित आहे. हुकुमशाहीविहीन लोकशाही समाजवाद, बुद्धिप्रामाण्यवादावर अधिष्ठीत असलेली बंधुता हीच नीति सांगणारा धम्म, अनिर्बंध मालमत्तेचा अधिकार रद्द ठरविण्याची तरतुद आणि समाजवाद घटनेत एकजीव करणारी नवी योजना हे आंबेडकरी क्रांती विचाराचे रसायन आहे. मूल्यात्मक परिवर्तनाशी जगाला जोडणारे, शांतता आणि संरक्षण यांच्याशी प्रतिबद्धता सांगणारे, इतरांना मारक ठरणाऱ्या माणसाच्या लालसेला बंधुत्वाचा नैतिक लगाम घालणारे, घटनेद्वारे जीवनाची उपेक्षितांच्या हिताची अर्थव्यवस्था निश्चित करणारे लोकशाही जगातले हे पहिले अभिनव तत्त्वज्ञान आहे. मनुष्याच्या उन्नत जीवनाचा विचार जागतिक पातळीवरही डॉ. आंबेडकरांनी विद्यमान विचारवंतांच्या पुढे नेलेला आहे. विश्व जीवनविचाराला किंवा जग बदलू पाहणाऱ्या ज्ञानपरंपरेला डॉ. आंबेडकरांचे हे नवे निराळे योगदान आहे.

## आंबेडकरांचा वृत्तपत्रप्रपंच

डॉ. आंबेडकरांचे लेखन प्रामुख्याने इंग्रजीतून झालेले आहे. हे लेखन निबंध, शोधप्रबंध आणि प्रबंध अशा विविध प्रकारांमध्ये बसणारे आहे.

इंग्रजी लेखक म्हणून डॉ. आंबेडकर मॉन्तेन, बेकन, जॉन्सन या परंपरेतले अत्यंत महत्वाचे इंग्रजी वैचारिक निबंधकार आणि प्रबंधकार ठरतात. भारतीय इंग्रजी निबंधकारांमध्ये आणि प्रबंधकारांमध्येही त्यांचे स्थान अग्रभागीच मानावे लागते. मराठीतही त्यांनी विपुल लेखन केले आहे. हे मराठी लेखन त्यांच्या इंग्रजीतील अतिविपुल लेखनाच्या तुलनेने अल्प ठरते एवढेच.

डॉ. आंबेडकरांचे अग्रलेख, स्फुटलेख आणि पत्रे याप्रकारचे सर्व लेखन मुख्यत्वे त्यांनी स्वत: काढलेल्या व चालविलेल्या वृत्तपत्रांमधून झालेले आहे. क्वचित इतर मराठी वृत्तपत्रांमधूनही झालेले आहे. डॉ. आंबेडकरांनी अनुक्रमे पुढील वृत्तपत्रे सुरू केली आणि चालविली (१) मूकनायक १९२०, (२) बहिष्कृत भारत, १९२७, (३) जनता १९३०, (४) प्रबुद्ध भारत, १९५६ (प्रबुद्ध भारत हे ५६ साली जनता पत्रानेच धारण केलेले नाव आहे.)

**मूकनायकाची जन्मकथा**

१९१७ साली विविध जातीजमातींच्या मतदानाच्या अधिकाराच्या संदर्भात काही कर्त्या व्यक्तींच्या साक्षी काढण्यासाठी शासनाने साऊथबरो कमिशन नेमले होते. या कमिशनच्या निमित्ताने अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांसाठी झगडण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. त्यांना अस्पृश्यांचे म्हणणे जगाच्या वेशीवर टांगण्यासाठी आपल्याजवळ नेहमीसाठी एखादे साधन असावे असे वाटले. 'पंखाशिवाय जसा पक्षी त्याप्रमाणे समाजात विचार-प्रवृत्त करण्यासाठी वृत्तपत्राची गरज असते' हेही त्यांना तीव्रपणे जाणवत होते, आणि उपलब्ध वृत्तपत्रे तर विशिष्ट जातींचीच चाकरी करणारी, अस्पृश्यांवर अन्यायच बहुतांशी करणारी याचा अर्थ वृत्तपत्राविना अस्पृश्य समाज अनाथ होता. त्याच्याजवळ विलक्षण अशा करुण कहाण्या होत्या पण या सर्व गोष्टी शब्दांशिवाय बेघर होत्या. त्या अंधारात रानोमाळ भटकत होत्या. त्यांना वाचा नव्हती. अस्पृश्य युगेयुगे मुका होता. त्या या मूक समाजाच्या वेदना व विद्रोह प्रकट करण्यासाठी एखाद्या प्रकाशनपीठाची गरज होती. ३१ जानेवारी १९२० रोजी या ऐतिहासिक आवश्यकतेतून

'मूकनायक' या पत्राचा पाक्षिकाच्या रूपात जन्म झाला. मूक अशा अस्पृश्यांचे नायकपण—नेतेपण आपण स्वीकारल्याचेच जणू या आंबेडकर नावाच्या वादळाने मूकनायक काढून १९२० साली जाहीर केले. मूकनायकाने आंबेडकरांच्या पुढील घणाघाती चळवळीची नांदीच जणू म्हटली. आंबेडकरी क्रांतीचळवळीची भूपाळी मूकनायकाने गायली. राजर्षि शाहू महाराजांच्या आर्थिक सहकार्यामुळेच आंबेडकरांना हे करता आले.

मूकनायकाची जन्मप्रतिज्ञा बहिष्कृतांचे उत्थान हीच होती. त्यामुळे पहिल्या अंकाच्या संपादकीयातच ही जन्मप्रतिज्ञा अशी व्यक्त झाली—

"आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही. परंतु मुंबई इलाख्यात निघत असलेल्या वृत्तपत्रांकडे पाहिले असता असे दिसून येईल की, त्यातील बरीचशी पत्रे विशिष्ट अशा जातीचे हितसंबंध पाहणारी आहेत. इतर जातींच्या हिताची पर्वा त्यांना नसते. इतकेच नव्हे तर, केव्हा केव्हा त्यांना अहितकारक असेही त्यातून प्रलाप निघतात. अशा वृत्तपत्रकारांना आमचा इशारा एवढाच की, कोणतीही एखादी जात अवगत झाली तर तिच्या अवनतीचा चट्टा इतर जातीत बसल्याशिवाय रहाणार नाही. समाज ही नौकाच आहे. ज्याप्रमाणे आगबोटीत बसून प्रवास करणाऱ्या उतारूने जाणूनबुजून इतरांचे नुकसान करावे म्हणून म्हणा किंवा आपल्या विनाशक स्वभावामुळे म्हणा जर का इतरांच्या खोलीस छिद्र पाडले तर सर्व बोटीबरोबर त्यालाही आधी किंवा मागाहून जलसमाधी ही घ्यावीच लागणार आहे. त्याचप्रमाणे एका जातीचे नुकसान केल्याने, अप्रत्यक्ष नुकसान करणाऱ्या जातीचेही नुकसान होणार यात बिलकूल शंका नाही. म्हणूनच स्वहितसाधू पत्रांनी इतरांचे नुकसान करून आपले हित करावयाचे पढतमूर्खाचे लक्षण शिकू नये."

ही त्याची भूमिका पुरेशी बोलकी आहे. त्यात वृत्तपत्रांच्या नैतिकतेचा, त्यांच्या माणुसकीचा आग्रह आहे. वृत्तपत्रांनी संकुचित होऊ नये, सर्वजनकल्याणाची भूमिका त्यांनी घ्यावी हा आशय स्पष्ट करणारे आंबेड-

कर वृत्तपत्राच्या नैतिकतेची घटनाच मांडत होते. वृत्तपत्र सुधारणाहृदयी असावे हा त्यांचा विचार वृत्तपत्रांनी मनीमानसी जपण्यासारखा आहे.

मूकनायकाचे ध्येयधोरण स्पष्ट करण्यासाठी त्यावर बिरुदावली छापली जात असे. ती मोठी अर्थपूर्ण होती.

काय करू आता धरूनिया भीड । नि:शंक हे तोंड वाजविले ॥१॥
नव्हे जगी कोणी मुकियाचा जाण । सार्थक लाजोनी नव्हे हित ॥२॥

तुकारामाच्या या ओळी त्यांनी बिरुदासाठी निवडाव्या यात केवढे तरी औचित्य आहे. वृत्तपत्राचे 'मूकनायक' हे नावही त्यांना 'नव्हे जगी कोणी मुकियाचा जाण' या चरणावरून सुचले आहे हे निश्चित.

१९२३ साली मूकनायक बंद पडले. लोकसेवा करायची, वृत्तपत्र चालवायचे तर पैसा हवा. पैशासाठी उद्योग हवा. म्हणून बॅरिस्टरीचा अभ्यास करण्यासाठी बाबासाहेब विलायतेला गेले व मूकनायकाची वाताहत झाली.

**बहिष्कृत भारत**

राजकीय, सामाजिक व आर्थिक अशा सर्व जीवनक्षेत्रातील हक्कांसाठी डॉ. आंबेडकरांना वृत्रपत्राची तीव्र गरज वाटत होतीच आणि ह्या गरजे-पोटीच '३ माहे एप्रिल सन १९२७' साली 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक त्यांनी काढले. या पाक्षिकाचे ते स्वत: संपादक होते.

दुसऱ्या अंकापासून बहिष्कृत भारतावर बिरुदावली म्हणून ज्ञान-देवांच्या पुढील ओव्या उद्‌धृत केलेल्या असत. ओव्या अशा–

"आता कोदंड घेऊनि हाती । आरूढ पां इये रथी ।
देई आलिंगन वीरवृत्ती । समाधाने ॥

जगी कीर्ति रूढवी । स्वधर्माचा मानु वाढवी ।
इया भारापासोनि सोडवी । मेदिनी हे ॥

आता पार्था नि:शंकु होई । या संग्रामा चित्त देई ।
एथ हे वाचूनि काही । बोलो नये ॥"

या ज्ञानेश्वरीच्या तिसऱ्या अध्यायातील अनुक्रमे १८९, १९० व १९१ क्रमांकाच्या ओव्या. 'आता केवळ संग्राम. संग्रामाशिवाय दुसरे काहीही नाही.' अशी युद्धप्रेरणा आंबेडकर प्रारंभापासून अस्पृश्यांमध्ये चेतवीत आहेत.

खूप लोक वर्गणीदार झाले नाहीत. कायमची आर्थिक तरतूद करणे बाबासाहेबांना शक्य झाले नाही. त्यामुळे अंक अनियमित निघू लागले. सर्व मजकूर बाबासाहेब स्वत: लिहीत असत. या सर्व व्यापातापामुळे बहिष्कृत भारत १५-११-१९२९ रोजी बंद पडले. बहिष्कृत भारताचे एकूण ३४ अंक निघाले. त्यातला ४-१-२९ चा अंक वजा जाता सर्व अंकात अग्रलेख आहेत. शिवाय 'आजकालचे प्रश्न', 'प्रासंगिक विचार' या सदरांमध्ये त्यांनी स्फुट लेख लिहिले. ३१ अंकामध्येच असे स्फुटलेखन त्यांनी केले असून अशा स्फुटलेखांची संख्या १४५ आहे. अनुक्रमे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 'बहिष्कृत भारता'तील अग्रलेख' व 'बहिष्कृत भारतातील डॉ. आंबेडकरांचे स्फुटलेख, श्री. रत्नाकर गणवीर यांनी संपादित केल्यामुळे अभ्यासकांची मोठी सोय झालेली आहे.

पहिल्या अंकाच्या संपादकीयात आंबेडकर म्हणतात-सुधारणेचा कायदा अमलात आला आहे. इंग्रजांच्या हातची सत्ता काही प्रमाणात वरिष्ठ हिंदी लोकांच्या हाती गेली आहे. बहिष्कृत वर्गाची प्रतिनिधींच्या बाबतीत मुळीच दाद न लावता ज्याप्रमाणे एखाद्या जनावराला त्याचा निर्दय धनी कसाबाच्या स्वाधीन करतो, त्याचप्रमाणे बहिष्कृत वर्गाच्या लोकांना त्यांच्या मायबाप सरकारने वरिष्ठ हिंदी लोकांच्या स्वाधीन केले आहे...अस्पृश्यांची स्थिती सहा वर्षापूर्वीपेक्षा आज जास्त शोचनीय आहे. ही शोचनीय स्थिती जगजाहीर करून होत असलेली हेळसांड टाळावयाची असेल व घडत असलेल्या अन्यायापासून व जुलुमापासून बचाव करावयाचा असेल तर वृत्तपत्राची जरूरी सहा वर्षापूर्वीपेक्षा आज अधिक तीव्र आहे... बहिष्कृत वर्गाच्या लोकांना जर त्यांना संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी मिळाले नाहीत, तर त्यांच्या उन्नतीची इतिश्री झाली असेच समजावे. कारण ब्रिटिश सरकारचे नि:पक्षपाती धोरण आमच्या वरिष्ठ समाजा-

करून ठेवले जाईल, इतकी त्यांची मनोभूमिका शुद्ध व सात्त्विक बनलेली नाही. हा घोर प्रसंग टाळावयाचा असेल, तर आतापासूनच चळवळीला सुरवात केली पाहिजे,..." ही युद्धगर्जना करीत बहिष्कृत भारत समाजक्रांतीच्या युद्धभूमीवर पदार्पण करतो. बहिष्कृत भारत अल्पायुषी ठरले पण या अल्पकाळातही त्याने या काळच्या वर्तमान समाजाचे कठोर मंथन केलेले आहे. या पत्रातील निबंधानीच आमूलाग्र समाजक्रांतीच्या प्रकाशरेषा प्रवर्तित केल्या महाराष्ट्राचे नभोमंडळ हलवून सोडले.

**जनता**

या पत्राचा २४ नोव्हेंबर १९३० रोजी प्रथम अंक प्रकाशित झाला. संपादक श्री. देवराव विष्णु नाईक हे अस्पृश्यांच्या उत्थानाच्या चळवळीत सहभागी असलेले कार्यकर्ते होते. कारण आता राजकीय व सामाजिक कामांच्या व्यापामुळे आणि ग्रंथलेखनाच्या व्यापामुळे डॉ. आंबेडकरांना वृत्तपत्राला वेळ देता येणे शक्य नव्हते. जनता प्रारंभी पाक्षिक होते. ३१ ऑक्टोबर १९३१ मध्ये ते साप्ताहिक झाले.

बिरुदावली म्हणून मूकनायकावर तुकारामांच्या अभंगातील ओळी, बहिष्कृत–भारतावर ज्ञानेश्वरांच्या ओव्या तर जनतेवर **"गुलामाला तू गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करून उठेल"** हे वाक्य येते.

जनतेत त्यांनी सर्व निकडीचे प्रश्न चर्चिलेच पण जनतेतून विशेष म्हणजे त्यांनी विलायतेहून लिहून पाठविलेली पत्रे प्रकाशित झाली आहेत.

१९५५ पर्यंत जनता सुरू होते. त्याचे संपादक वेळोवेळी बदलले. कधी त्यात अनियमितपणा निर्माण झाला पण तरी ते खूप दिवस टिकले. ४ फेब्रुवारी १९५६ रोजी जनतेचे नामकरण प्रबुद्ध भारत असे करण्यात आले. बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर १९६१ साली प्रबुद्ध भारत बंद पडले.

डॉ. आंबेडकरांचे संशोधनपर, पांडित्यपूर्ण, एकूणच विश्वविचाराला नवे आयाम देणारे सर्जनशील वैचारिक लेखन इंग्रजीमधून झाले. ती त्यांच्या प्रज्ञेची विश्वमुशाफिरी होती. ते यासंदर्भात विश्वविचारविश्वाचे सन्माननीय सभासद ठरतात. आपल्या इंग्रजी लेखनातून डॉ. आंबेडकर

सगळ्यांशी जगाशी बोलत होते. सगळ्या जगाशी वादत–संवादत होते. सगळ्या जगापुढे भारतातील बहिष्कृतांच्या कैफियती ते मांडत होते. भारतीय शोषणव्यवस्थेने भारतभूमीत सगळ्या जगाला अशक्य असा शोषणाचा प्रयोग कसा शतकानुशतके केला त्याचे स्वरूप ते सगळ्या जगापुढे उलगडून दाखवीत होते तर मराठी लेखनातून ते महाराष्ट्रातील बहिष्कृत भारताशी आणि त्याला बहिष्कृत करणाऱ्या सवर्ण भारताशी वादत–संवादत होते. कधी विव्हळ होऊन, कधी कुरवाळून तर कधी संतापून ते बोलत होते. कधी विजा कोसळाव्या तसे, कधी धबधबा कोसळावा तसे तर कधी आकाश कोसळावे तसे कोसळत होते. भारतीय समाजाची जमिन समपातळीत अंथरू इच्छित होते. समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय व विज्ञाननिष्ठा पोटी वागवणाऱ्या "धम्माचे" राज्य ते स्थापू इच्छित होते. या मराठीतील लेखनानेच त्यांना मराठीतील थोर निबंधकार या गौरवाचे धनीपण दिले. मराठीतील वैचारिक निबंधाच्या समीक्षेने त्यांचा लेखक म्हणून, निबंधकार म्हणूनही कुठे चुकून उल्लेख केला नसला तरी आगरकरांनंतरचे ते मराठीतील सर्वश्रेष्ठ निबंधकार ठरतात. विसाव्या शतकातील आपल्या सांस्कृतिक जीवनातील आंबेडकर ही मध्यवर्ती व्यक्ती मानूनच भारताच्या विसाव्या शतकाचा विचार समर्पकरित्या करता येऊ शकेल.

---

# २

# डॉ. आंबेडकरांचा समाजविचार

"लेनिन हिंदुस्थानात जन्मला असता तर प्रथम त्याने जातीभेद व अस्पृश्यता यांना साफ गाडून टाकले असते व तसे केल्याखेरीज क्रांतीची कल्पना त्याने मनातही आणली नसती." (ब. भा. ४-१२-२९).

–डॉ. आंबेडकर

---

समाज हे डॉ. आंबेडकरांच्या सर्वच चिंतनाचे मध्यवर्ती केंद्र आहे. राजकीय, आर्थिक, शैक्षणिक असा सर्व विचार ते 'समाज'-संस्थेच्या संदर्भातच करतात.

१. "सर्व समाजात अत्यंत जरठ असा हा हिंदूसमाज आज अनेक वर्षांच्या परकीयांच्या माऱ्यामुळे हादरून गेला आहे...तथापि, आपल्याला कोणता रोग झाला आहे व आपण पदोपदी का पडतो याचा उलगडा अजूनही त्याला पूर्णपणे झाल्याचे दिसत नाही."[१]

२. "हिंदू समाज फ्रांसच्या बर्बून राजघराण्याप्रमाणे काही शिकत नाही व काही विसरत नाही. (Learns nothing and forgets nothing) ...वेळ पडेल त्याप्रमाणे वाटेल तशी तडजोड करणे आणि आलेली वेळ कशीबशी मारून नेणे हा हिंदू समाजाचा जन्मस्वभावच आहे.

(१) ब. भा. अग्रलेख, २१-१२-२८

शा लवचिकपणामुळेच ' महापुरे झाडे जाती । तेथे लव्हाळे वाचती ' या न्यायाने तो आतापर्यंत टिकून राहिला.''[२]

३. " इतर राष्ट्रे मेली पण आमच्या वर्णाश्रम धर्मामुळे आम्ही जगलो, अशी फुशारकी मारणाऱ्या लोकांनी आपण जगलो ते कसे जगलो, याचा कधी विचार केला आहे काय ?...एक मानवाचे जिणे आहे. दुसरे किडयाचे जिणे आहे...नरकातल्या किडयाप्रमाणे ज्यांनी हजारो वर्षे घालविली, त्यांना मानवाच्या जिण्याची काय चाड आहे ?''[३]

४. हिंदू समाजात ज्या मूर्खपणाच्या व घाणेरडया समजुती दृढमूल झाल्या आहेत, ज्यांच्यामुळे हिंदू समाज विस्कळीत व दुर्बल बनलेला आहे त्या समजुती व त्यांना अनुसरून असलेल्या चालीरीती यांच्याकडे लक्ष द्यावयाचे नाही आणि भलत्याच गोष्टीला नसते महत्त्व देऊन आकाश पाताळ एक करायचे हा काळाचा व उत्साहाचा शुद्ध दुरुपयोग होय.''[४]

याप्रकारे हिंदूसमाजाचे स्वरूप डॉ. आंबेडकर भेदकपणे मांडतात. वर्णव्यवस्था, परंपरावादी वृत्ती, आत्मपरीक्षणाचा व भवितव्याकडे पाहण्याचा अभाव यामुळे हिंदूसमाजाने आत्मघात करून घेतला. हा त्यांचा निष्कर्ष लक्षणीय आहे.

हजारो वर्षे या समाजाला हे रूप राहिले याला कारण ब्राह्मण्य.

**ब्राह्मण्य म्हणजे काय ?** : डॉ. आंबेडकर ब्राह्मणद्वेष्टे होते असा आरोप केला जाऊ शकेल पण त्याआधी यासंदर्भातील त्यांची भूमिका नीट तपासून बघायला हवी. महाड सत्याग्रहात कोणाही ब्राह्मण जातीतील गृहस्थास सामील करू नये ही अट जेधे-जवळकर या ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी घातली तेव्हा आपल्या सामिलकीच्या भूमिकेचे त्यांनी स्पष्टीकरण केले ते असे : " आम्ही ब्राह्मणांच्याविरुद्ध नाही ही गोष्ट आम्ही जाहीर करू इच्छितो. आमचा कटाक्ष ब्राह्मण्यावर आहे. ब्राह्मण लोक आमचे वैरी नसून ब्राह्मण्यग्रस्त लोक आमचे वैरी आहेत असे आम्ही जाहीर समजतो. या

(२) तत्रैव १२-४-२९, (३) तत्रैव ३-६-२७, (४) तत्रैव १२-८-२७.

भावनेने प्रेरित झाल्यामुळे ब्राह्मणग्रस्त ब्राह्मणेतर हा आम्हाला दूरचा वाटतो व ब्राह्मण्यरहित ब्राह्मण आम्हास जवळचा वाटतो."[५] अर्थात हे ब्राह्मण्य म्हणजे काय तर इतरांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत हे दाखविण्याची मनोवृत्ती. ब्राह्मण्य म्हणजे ब्राह्मण नव्हे. "इंपिरियालिझम, सोशालिझम, बोल्शेविझम, कॅपिटलिझम वगैरे संप्रदायांप्रमाणे ब्राह्मण्य हा एक संप्रदाय आहे." (ब. भा. ४-११-२७). कोणत्या ना कोणत्या इतर जातीपेक्षा आपली जात श्रेष्ठ आहे ही भावना म्हणजे खरे तर ब्राह्मण्य. आंबेडकर म्हणतात : "ब्राह्मण्याची व्याख्या कोणी कशीही करो; जन्मजात उच्च नीच भाव हीच ब्राह्मण्याची खरी व्याख्या आहे."[६] या ब्राह्मण्याच्या विध्वंसनासाठी ब्राह्मण लोकांनी पुढे यावे असे आंबेडकरांना वाटते. ब्राह्मण येणार नसतील तर इतरांनी हे कार्य करावे, कोणासही या जबाबदारीतून सुटता यायचे नाही. कारण ब्राह्मण्य हे सर्व लोकांमध्ये पसरले आहे "ब्राह्मण्य हे सर्वव्यापी परमेश्वराप्रमाणे हिंदुस्थानातील स्थिरचर सृष्टी व्यापून उरले आहे. बरेचसे अस्पृश्य, असंख्य ब्राह्मणेतर व अगणित ब्राह्मण ज्ञानत: अज्ञानत: या ब्राह्मण्याचे उपासक आहेत. ब्राह्मण, ब्राह्मणेतर व अस्पृश्य या ब्राह्मण्याने भरलेल्या गाडग्यांच्या उतरंडी आहेत."[७] एका अर्थी ब्राह्मण्य हा अहंकाररोग होय. वर्णसंस्था व जातीसंस्था हा या समाजाला लागलेला विषमज्वर होय. ही 'ग'ची बाधा होय या ब्राह्मण्याचा जन्म अर्थात ब्राह्मण वर्गातूनच झाला. आंबेडकर म्हणतात, "ब्राह्मण्याच्या अमंगल गंगेचा उगम ब्राह्मण वर्गातूनच झाला असला तरी तिच्या पुढे मोठे व खोल होत गेलेल्या पात्रातून अनेक लोक वाहून जावयास लागले तर उगमाचे लोक तिचा प्रवाह थांबवीत नाहीत, एवढ्यावरून मध्यावर राहणाऱ्या लोकांनी देखील बांध घालू नये यास न्याय म्हणता येईल काय ?"[८] असा ब्राह्मणेतर बंधूंना ते सवाल करतात. रिडल्स इन हिंदूइझम या वादळी ग्रंथातही ते या ब्राह्मण्याने ज्या बहुसंख्यांना गुलाम केले त्यांना बुद्धिप्रामाण्यवादाच्या ताकदीने त्या गुलामीतून बाहेर पडण्याचा महामार्ग दाखवीत आहेत.

(५) तत्रैव १-७-२७, (६) तत्रैव १-७-२७; (७) तत्रैव १-७-२७.
(८) तत्रैव १-७-२७.

यी ब्राह्मण्यांने हा देश दुर्बळा केला. राष्ट्राला त्याने वर्णा–जातीत तोडले. परस्परात अविश्वास व विषमता निर्माण केली. समाजाचे प्रवाहित्व मारले. आंबेडकर म्हणतात. "ब्राह्मण्यापासून हिंदू समाजाचे किती अपरिमित नुकसान झाले आहे हे सर्वास कळून चुकले आहे. या ब्राह्मण्यामुळे ब्राह्मणेतर जनतेस विद्येची द्वारे बंद करण्यात येऊन त्यांना अडाणी ठेवण्यात आले. वेदांसारखे धार्मिक ग्रंथसुद्धा वाचण्याची बंदी करण्यात आली. 'जातीशिवाय गती नाही,' या आकुंचित तत्वज्ञानाचे अमंगल जीवन जनतेस पाजून अखिल जनतेच्या मनोभावना अनुदार करण्यात आल्या. श्रेष्ठ व कनिष्ठ हा भेदभाव जन्मावरून ठरून वैयक्तिक उन्नतीला व सुधारणेला अवश्य लागणारा अवसर नाहीसा करण्यात आला. विधीपुढे यत्न विफल आहे, या शिकवणीने सर्वांची गती खुंटवून टाकली. धर्मभोळेपणा वाढवून खऱ्या धर्माचे ज्ञान होऊ दिले नाही. सोवळ्या–ओवळ्याच्या व शिवाशिवीच्या कल्पना पसरवून माणुसकीसारख्या अमोल वस्तूचा धिक्कार करण्यास शिकविले."[९] वर्षानुवर्षे या ब्राह्मण्याने जनतेच्या आत्म्याला गुलाम केले. स्वाभिमानासारख्या आत्मिक संपत्तीचे हरण केले. असे असले तरी ब्राह्मणेतरांनी ब्राह्मण्याविरुद्ध त्याच्या उगमापासून लढे दिलेले आहेत. पूर्वी जातीभेद व गुणभेद यापैकी कोणत्याही पद्धतीने गट पाडले तरी ते सारखेच पडत "कारण, जाती जशा जन्माने श्रेष्ठ तशा गुणानेही श्रेष्ठ असत व जन्माने कनिष्ठ तशा गुणानेही कनिष्ठ असत...कनिष्ठ मानलेल्या जाती गुणानेही कनिष्ठ राहिल्या याचे मुख्य कारण असे की, त्यांना गुणवान होण्याची कायदेशीर बंदी करण्यात आली होती...पण इंग्रजी आमदानीत या बंदीचा साफ उच्छेद होऊन गेल्यामुळे समाजाची पूर्वीची घडी बिघडून गेली व ब्राह्मणाच्या पोटी गुणहीन शुद्रवृत्तीची संतती आणि शूद्रांच्या पोटी गुणवान ब्राह्मणवृतीची संतति जन्माला येऊ लागली. अशापरी गुणाचा आणि जातीचा प्रत्यक्ष विरोध उत्पन्न झाला. हा विरोध नष्ट करण्यास ब्राह्मण्याचा नायनाट होणे अगदी अवश्य आहे."[१०] याप्रकारे समाजाच्या पुनर्घटनेसाठी, आमूलाग्र परिवर्तना-

(९) तत्रैव १–७–२७, (१०) तत्रैव १–७–२७,

साठी या ब्राह्मण्याचा आपल्या समाजाच्या सर्व स्तरांमध्ये झालेल्या प्रसाराचा बिमोड झाला पाहिजे असे डॉ. आंबेडकरांना वाटते त्यात चूक काहीही नाही.

**जातीसंस्था देशबुडवी**

बोटीतील एका माणसाने इतरांचे नुकसान करण्यासाठी बोटीला छिद्र पाडले तर जलसमाधीपासून त्याचीही सुटका नसते. तसेच जातीसंस्थेचे आहे. बोटीप्रमाणे अख्खा देशच बुडतो. तसे आपल्या देशात झाले आहे. स्वार्थासाठी इतरांना बुडवण्याच्या प्रक्रियेत बुडवणाराही तरला नाही असे इतिहास सांगतो. सर्वत्रच कुंठा निर्माण झाली. जातीमुळे हिंदूसमाज खिळखिळा झाला. समाजात एकी होणे अशक्य झाले. परकेपणामुळे कितीही अन्याय्य असो स्वजातीचा फायदा व इतर जातीचे नुकसान हीच नीती पाळण्यात येते. त्यामुळे जातीद्वेषाचा अग्नी विझत नाही. स्वराज्याविषयी कोणाला तळमळ वाटत नाही. जातींमुळे माणसे हिंदूतून परधर्मात जाऊ शकतात, हिंदूधर्मात येऊ शकत नाहीत. सामाजिक सुधारणा करणे अशक्य झाले. हिंदू राष्ट्र केवळ गुलामांचे राष्ट्र म्हणून जगले. नेत्यांनी जगविले म्हणून हिंदू जगले. आंबेडकर म्हणतात, " हिंदू राष्ट्र जगले, यात त्याचा पराक्रम नसून ज्या लोकांनी त्याला जिंकले त्यांचा शहाणपणा आहे "[११] एवढेच नव्हे तर " आम्ही जगलो याचे कारण आम्ही शास्त्राप्रमाणे वागलो हे नसून आम्हास आमच्या शत्रूंनी ठार मारले नाही हेच होय. शास्त्राप्रमाणे वागून जर काही झाले असेल तर ते हेच की इतर राष्ट्रांपेक्षा आम्ही जास्त हतबल झालो व कोणाविरुद्ध दोन हात करून जय संपादन करण्याइतकी कुवत आमच्यात राहिली नाही."[१२] असे सर्व अनर्थ एका जातीसंस्थेने केले असे डॉ. आंबेडकर सांगतात. आंबेडकरांची ही समाजमीमांसा ऐतिहासिक पुराव्यांवर सर्वस्वी खरी उतरणारी मीमांसा आहे. जातिसंस्थेमुळे या देशाचे काय फायदे झाले त्याचे वर्णन ब्राह्मणी पांडित्य करीत असते पण इथे देश म्हणजे कोण ? असा फुल्यांप्रमाणे प्रश्न विचारायला हवा. हिंदूंनी जन्मजात

(११) तत्रैव २१-१२-२८. (१२) तत्रैव २१-१२-२८.

जातिसंस्थेचा महान प्रयोग केल्याबद्दल मनुष्य जातीने हिंदूचे कृतज्ञ राहिले पाहिजे[१३] असे सावरकर (१९३१ साली) म्हणतात तर आमच्या देशाला काही एक झाले नाही. त्याची नाडी अद्याप साफ चालत असून शरीर प्रकृतीस म्हणण्यासारखा काही एक विकार नाही असे चिपळूणकर म्हणतात तेव्हा यांचा देश कोणता ? त्या महान प्रयोगाने भले कोणाचे झाले ? याचा विचार वरील मंडळींना सुचणे कठीण आहे.

**जातींची निर्मिती** : बाबासाहेब म्हणतात, "ऋग्वेद काळानंतर जेव्हा ब्रह्मदेव बाळंत झाला तेव्हाच ब्राह्मण जातीवाचक करंटी कारटी जन्मास आली व त्यांनी आपल्याभोवती प्रथमतः तटबंदी केली. ही तटबंदी झाल्याबरोबर ब्राह्मणब्राह्मणेतर हा भेदभाव जन्मास आला व गुणभेद विभागणः ते तत्त्व अजिबात गाडले जाऊन त्याच्याऐवजी जातीभेद विभागशः हे तत्त्व प्रस्थापित करण्यात आले."[१४] आणि ब्राह्मणेतरातीलही इतर गटांनी आपली वेगवेळ्या ऋषींपासून उत्पत्ती सांगून आपले वेगळेपण दृढ केले व ब्राह्मणवर्गाप्रमाणे दरेक वर्गाने आपल्या भोवती तट बांधण्यास सुरवात केली एवढेच नव्हे तर प्रत्येकाने आपले श्रेष्ठत्व सांगायचा सपाटा सुरू केला.

**तीन वर्ग** : ब्राह्मण, ब्राह्मणेतर व बहिष्कृत असे तीन वेगळे वर्ग[१५] हिंदु धर्मियांचे त्यांनी पाडले आहेत. ब्राह्मणाला वाटते आपण भूदेव आहोत. सर्व मानवांचा जन्म आपल्या सेवेसाठी आहे. याप्रकारे हा वर्ग इतरांकडून सेवा करून घेत मेवा खात आहे. आपल्या जातीचा पहिला मान राखून ठेवण्याची धडपड हा वर्ग करतो. ब्राह्मणेतर म्हणजे क्षत्रिय, वैश्य म्हणविणारे लोक. ब्राह्मणांनी यांना नेहमीच शूद्र मानले आणि बहिष्कृत म्हणजे अस्पृश्य. ब्राह्मण, ब्राह्मणेतर अशीच भाषा बोलण्याची रूढी पडली होती आणि बहिष्कृतांचे पुन्हा अस्तित्वच नाकारण्यात आले होते तेव्हा आंबेडकरांनी बहिष्कृतांचे अस्तित्व ठळकपणे पुढे मांडले.

---

(१३) वि. दा. सावरकर, **जात्युच्छेदक निबंध** मुंबई, १९८२, पृ. २५, (१४) जनी ब. भा. १–७–२७, (१५) मूकनायक प्रथमांक ३१–१–२०.

बाबासाहेबांनी म्हटले आहे. "हा देश केवळ विषमतेचे माहेरघर आहे...हिंदू धर्मीयात असलेली ही विषमता जितकी अनुपम आहे तितकीच ती निंदास्पदही आहे...हिंदू समाज हा एक मनोरा आहे व एक एक जात म्हणजे त्याचा एकएक मजला होय. ...या मनोऱ्यास शिडी नाही आणि म्हणून एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे त्याच मजल्यात त्यांनी मरावे. खालच्या मजल्यातला इसम मग तो कितीही लायक असो त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातला माणूस मग तो कितीही नालायक असो त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची कोणाची प्राज्ञा नाही...जातीजातीत असलेल्या या उच्चनीच भावना गुणावगुणांच्या पायावर झाल्या आहेत असे नाही. उच्च जातीला मग तो कितीही अवगुणी असो तो उच्च म्हणावयाचा; तसेच नीच जातीत जन्मलेला मग तो कितीही गुणी असो तो नीचच राहावयाचा !"[१६] अशी या जाती-संस्थेची पोलादी अपरिवर्तनशीलता व माणूसकीला काळीमा लावणारे अन्याय्य स्वरूप ते मांडतात.

**अस्पृश्यता** : जगात केवळ हिंदूधर्मात त्रिकालिक अस्पृश्यता असून या बहिष्कारातून बाहेर पडण्याचा मार्ग हिंदूधर्माने ठेवला नाही. ही जन्मजात अस्पृश्यता हिंदुस्थानाशिवाय कोठेही नाही. हे डॉ. आंबेडकरांना हिंदूधर्माचे भयानक वैशिष्ट्य वाटते.

अस्वच्छता व अभक्ष्यभक्षण यामुळे सवर्ण हिंदू या लोकांना आम्ही अस्पृश्य मानतो असे म्हणतात पण अस्पृश्यांमधील जे लोक स्वच्छ राहतात व अभक्ष्यभक्षण करीत नाहीत त्यांनाही अस्पृश्यच का मानले जाते ? अभक्ष्यभक्षण करणाऱ्या मुस्लिमांना अस्पृश्य म्हणण्याची छाती हे का दाखवीत नाहीत ? अशी मीमांसा करून बाबासाहेब म्हणतात– "अस्पृश्यता ही एक लोकांची लहर आहे...तुम्हाला अस्पृश्य मानतो म्हणून तुम्ही अस्पृश्य, या स्पृश्य लोकांच्या लहरीशिवाय अस्पृश्यतेला दुसरे कारण..."[१७] बाबासाहेबांना दिसत नाही. अस्पृश्यता ही गुलाम-

(१६) तत्रैव २१–१–२०, (१७) उनि. ब. भा. २०–५ २७.

गिरीच आहे. काहींना अस्पृश्य ठरवायचे, घाणेरडी कामे त्यांच्यावर लादायची, त्यांचे शिक्षण बंद करायचे. त्यांना कोणतेच काम द्यायचे नाही. "...हे प्रकार जसे गुलामगिरीच्या इतिहासात तसेच या देशातील अस्पृश्यतेच्या इतिहासातही दिसून येतात."[१८] पण अस्पृश्य मानले गेलेले लोक मानववंशशास्त्रदृष्ट्या सवर्णांहून वेगळे नाहीत. अस्पृश्यतेने "उच्चवर्णीय म्हणविणाऱ्या लोकांच्या मनातली न्यायविषयक भावना नष्ट करून टाकली आणि खुद्द अस्पृश्यांचीही विचारशक्ती नाहीशी केली. धर्माच्या दडपणाखाली बहिष्कृतांचा स्वाभिमान नष्ट झाला. त्यांना आपल्या माणुसकीच्या हक्कांचा विसर पडला."[१९] पेशवाईमध्ये रस्त्यात थुंकल्याने रस्ता अपवित्र होईल म्हणून अस्पृश्यांच्या गळ्यात मडके, व त्यांच्या पावलांनी विटाळलेली धूळ वाहून जावी म्हणून कमरेला काट्याचा खराटा व ओळखता यावे म्हणून हातात काळा दोरा बांधावा लागे[२०] ज्याने हे पशुत्व त्यांच्यावर लादले ते हिंदुत्व अस्पृश्यांना शाप आहे. असे आंबेडकर म्हणतात

अस्पृश्यता हा हिंदूधर्मावर मोठा कलंक आहे असे गांधीजी म्हणाले होते. पण आंबेडकर म्हणतात, "हा आमच्यावरील कलंक आहे, अशी आमची जाणीव झाल्यामुळे तो धुवून काढण्याचे पवित्र कार्य आता आमचे आम्हीच स्वीकारले आहे."[२१] आणि हा कलंक गरज पडली तर आपल्या रक्तानेही तो आम्ही धुवून काढू. अशा संतप्त भाषेत त्यांनी अस्पृश्यता निमूलनाची निकड व्यक्त केली आहे अस्पृश्यता इंग्रजी शासन नष्ट करू शकत नाही. तशी त्याची इच्छा नाही. हिंदूधर्मियांचीही तशी इच्छा नाही तेव्हा या संतापाच्या भरातच ते 'मुसलमान व्हा"[२२] असे बोलून जातात. इतर कोणताही धर्म वा समाज अंगिकारल्याने अस्पृश्यता नष्ट होऊ शकत नाही. मुसलमानांना हिंदू घाबरतात त्यामुळे अस्पृश्यांना ते मुसलमान होण्याचा सल्ला देतात.

---

(१८) तत्रैव २९-७-२७(१९) तत्रैव २९-७-२७, (२०) तत्रैव १६-११-२८. (२१) तत्रैव २२-४-२७, (२२) तत्रैव १५-३-२९,

निराळी मंदिरे बांधून, सहभोजने करून येथील अस्पृश्यता नष्ट होईल असे त्यांना वाटत नाही. मिश्रविवाहाने हे होऊ शकते असे त्यांचे मत होते म्हणून खान–मालिनी विवाहाचे समर्थन त्यांनी केले.

इंग्रजी राज्य इथे आणण्यात अस्पृश्यांचा वाटा आहे. याचा अर्थ अस्पृश्यतेने या देशास धुळीस मिळविले आहे. पण यापेक्षा अधिक लांच्छनास्पद सत्य "अस्पृश्यांनी देशद्रोह केला; ही गोष्ट वाईट झाली असेल, पण त्याचे पातक ज्यांनी मानवद्रोह केला त्यांच्यावर आहे."[२३] या शब्दात ते बोलून दाखवितात त्यामुळे ज्या स्वराज्यात अस्पृश्यांना समानतेचे हक्क मिळणार नसतील त्या स्वराज्याचा अर्थ आंबेडकर विचारतात. साधे माणुसकीचे हक्क देण्यास स्वराज्यपूर्व काळात जे लोक तयार नाहीत ते स्वराज्य मिळाल्यावर माणसकीला कसे काय जागतील असा रास्त प्रश्न आंबेडकरांना पडतो.

**वतनदारी आणि बलुतेदारी** : अस्पृश्य म्हणजे गुलाम, पशू. त्याला अमलदाराची कोणतीही कामे केव्हाही बिनबोभाट करावी लागत. त्याच्या घरच्या कोणत्याही वयाच्या स्त्रीपुरुषाला ती करावी लागत. टांग्यामागे, घोड्यामागे दिगार घेऊन धावावे लागे. ही वेठबिगार होय. हीच गावकी. याविरुद्ध बोलण्याला धर्मविरोधी वर्तन मानले जात असे.

म्हारकीच्या कामासाठी महारांना (१) इनाम जमीन, (२) बलुते आणि (३) नक्त पगार अशा तीन प्रकारांनी मुशाहिरा मिळत असे. "कोणतीही वतनी मालमिळकत असल्यास ती व वंशपरंपरेचा हुद्दा व त्यासंबंधी हक्क व अधिकार ही मिळून वतन होते, अशी वतन या शब्दाची व्याख्या..."[२४] आहे. पाटील, कुलकर्णी व महार ही तीन वतने होती. अस्पृश्य मात्र सर्वांचा सांगकाम्या ठरला. सर्व गावाचा मोफत नोकर ठरला. खळी तयार करणे, मेलेली गुरे ओढणे, मयताचा सांगावा देणे, मयताची लाकडे नेणे, लग्नात इंधन फोडणे.[२५] अशी सवर्णांची सर्व कामे त्याला करावी लागत.

---

(२३) तत्रैव २१ डिसें. २८, (२४) तत्रैव २–९–२७, (२५) तत्रैव २–९–२७.

या महार वतनाने महार स्वाभिमानशून्य झाले, त्यांची महत्त्वाकांक्षा साफ मेली, व ते गेल्याशिवाय महारांची सुधारणा शक्य नसल्याने महार वतन नष्ट व्हावे असे आंबेडकरांना वाटते. बलुते आणि नक्त पगार रद्द करून इनामी जमिनी कायम ठेवाव्या, त्यावर कर बसवावा असा बाबासाहेबांनी सांगितलेला उपाय त्यावेळी काही अस्पृश्यांनाही मान्य झाला नाही. वतनदारी ही गुलामी आहे त्यामुळे विरोध असला तरी "गुलामगिरीत पडलेल्या लोकांची गुलामगिरी सक्तीने का काढण्यात येऊ नये" (ब. भा ४-११-२७) असे अस्पृश्यांच्या अनुषंगाने पण या देशातील परंपरांच्या गुलामांच्याही डोळयात झणझणीत अंजन घालणारे महावाक्य आंबेडकर लिहून जातात.

बलुते ही वतनातच समाविष्ट असलेली बाब होय. कारू म्हणजे बलुते. नारू म्हणजे अलुते. हे गावकऱ्यांची दैनंदिन कामे काही मोबदला घेऊन करतात. बलुतेदाराला मिळणाऱ्या मोबदल्याला बलुते व अलुतेदाराला मिळणाऱ्या मोबदल्याला अलुते म्हटले जाते. सुतार, लोहार, महार, मांग, कुंभार, चांभार, परीट, न्हावी, भट, मुलाणा, गुरव आणि कोळी हे बारा बलुतेदार गावगाड्यातले जुने प्रमुख हक्कदार होत. तर तेली, तांबोळी, साळी, माळी, जंगम, कलावंत, डौरी, ठकार, घडशी, तरांळ, सोनार आणि चौगुला हे बारा अलुतेदार म्हणजे गावगाड्यातले दुसऱ्या क्रमांकाचे हक्कदार होत.

आंबेडकर म्हणतात, "महारांचा मुशाहिरा बलुत्याच्या रूपात देण्यात येत असल्याकारणाने महार वतनाला अत्यंत घाणेरडे व किळसवाणे स्वरूप आले आहे. बलुते म्हणजे पगार, मुशाहिरा, किंवा नोकरीचा मोबदला असा जो महारांचा व रयतेचा समज व्हावयाचा तो तसा न होता, बलुते म्हणजे भीक आणि महार म्हणजे भिकारी असा उभय पक्षांचा ग्रह होऊन बसला..."[२६] त्यामुळे अस्पृश्यांना अपमानाचे, पशूचे जिणे शिव्या खात, तिरस्कार झेलत जगावे लागते. त्यामुळेच हे महारवतन नष्ट झाले पाहिजे यासाठी आंबेडकर आकाशपाताळ एक करतात.

(२६) तत्रैव १६-९-२७.

यांप्रकारे हिंदूधर्मातील अस्पृश्यता, जातीव्यवस्था, या सर्वांच्या पाठीशी असलेली धार्मिक अंधश्रद्धा आणि ब्राह्मण्य यांच्या निर्मूलनाचे एक तत्त्वज्ञान आंबेडकर मांडतात. वरील गोष्टींनी या देशाला कसे धुळीस मिळविले हे सप्रमाण सिद्ध करून त्याची विघातकता सांगतात, वरील गोष्टींच्या जन्मकथा कथन करतात, समाजावरील त्यांचे दुष्परिणाम सांगतात आणि मनुष्याच्या, राष्ट्राच्या उज्ज्वल जगण्यासाठी वरील गोष्टींच्या निर्मूलनाची अत्यंत तीव्र शब्दात निकड आणि उपाययोजना सांगतात. हा विचार मांडताना आपल्या विषमतेच्या सुरुंगावर उभ्या असलेल्या समाजसंस्थेची कठोर मीमांसा ते करतात. या विश्लेषणात इतिहासमीमांसेची एक मर्मदृष्टी आहे. बुद्धिप्रामाण्यवाद, समता, स्वातंत्र्य व बंधुतेचे या देशातील अवमानसत्र संपावे या ध्येयाने मांडले गेलेले हे सामाजिक विचार देशाच्या उज्ज्वलतेचे सौंदर्य उरात वागविणारे बंडखोर विचार आहेत.

---

# ३

# डॉ. आंबेडकरांचे धार्मिक विचार

"हिंदू समाजात धार्मिक सुधारणेखेरीज सामाजिक सुधारणा होणे शक्य नाही," (ब. भा. १५-३-२९)

डॉ. आंबेडकर

---

१४ आक्टोबर ५६ पर्यंत डॉ. आंबेडकर हिंदूधर्मीय होते. तसेच पाहिले तर त्यांच्या मनाने १९२८-२९ पासूनच हिंदूधर्माचा त्याग केला होता. १९२९ सालीच त्यांनी म्हटले आहे "...तुम्हाला धर्मांतरच करावयाचे असेल तर मुसलमान व्हा! तुम्हाला मोक्षासाठी धर्मांतर करावयाचे नाही"[१] पण ही भूमिका घेण्यापूर्वीच्या नजिकच्या काळात आणि याही काळात बाबासाहेब "स्पृश्य हिंदूकडून कितीही हालअपेष्टा भोगाव्या लागल्या तरी आपण हिंदू धर्म सोडणार नाही."[२] आपण हिंदु धर्मात सुधारणा घडवून आणू, आपण प्रोटेस्टंट हिंदू आहोत, "शक्यतोवर हिंदू-धर्मात राहावयाचे आणि आपल्या बहिष्कृत बंधुनाही त्या धर्मात ठेवा-वयाचे..."[३] अशी भूमिका घेताना दिसतात.

---

(१) भी. रा. आंबेडकर : **ब. भा. अग्रलेख** (१५ मार्च, २९) (संपा), रत्नाकर गणवीर १९७६ नागपूर, पृ. २८०. (२) धनंजय कीर, **डॉ. बाबासाहेब आंबेडकर,** दु. आ. १९७७ मुंबई, पृ. १५४ वरून उद्धृत (३) उनि. **ब भा. अग्रलेख,** २९-७-२७.

याच काळात इस्लाम, शिख अशा धर्मांचाही मोह हिंदुधर्मियांच्या कोडगेपणामुळे त्यांना झालेला आहे. १९३५ साली त्यांनी येवले मुक्कामी (जि. नासिक), 'दुर्दैवाने मी अस्पृश्य जातीत जन्मास आलो हा काही माझा अपराध नाही. परंतु मरताना मात्र मी हिंदू म्हणून मरणार नाही.' अशी जाहीर घोषणा केली. याच सुमारास नवीन आणि स्वतंत्र धर्म स्थापन करण्याच्या संदर्भातही त्यांना काही नेत्यांनी विनंती[४] केली होती. पुढे हे सर्वच पर्याय नाकारतात आणि १९५६ साली बुद्ध धम्माचा स्वीकार ते करतात. बुद्धा अँड हिज धम्मामध्ये धर्म आणि धम्म या दोन बाबींची जमिन–अस्मानाइतकी असलेली भिन्नता विशद करून सांगतात. धर्म व धर्मसंस्था त्याग करतात धर्मविहीन बुद्धधम्म घेतात. वरील परिच्छेदांमध्ये त्यांच्या मनाने केलेला प्रवास आपल्या प्रबोधनाच्या पार्श्वभूमीवर मोठा लक्षणीय ठरणारा आहे.

**धर्म आणि हिंदुधर्म.** यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः. म्हणजे ज्याच्या योगाने अभ्युदय म्हणजे ऐहिक उत्कर्ष व मोक्षप्राप्ती होते तो धर्म. ही व्याख्या उद्धृत करून आंबेडकर तिची समीक्षा करतात. बहिष्कृत लोकांवर डोके वर काढतास येऊ नये, बुद्धिमत्ता व लायकी दाखवण्याची संधीच लाभू नये अशी बंधने लादलेली असताना त्यांना ऐहिक उत्कर्ष कसा होईल ? आणि मोक्षाचा मार्ग मोकळा असून उपयोग काय ? "निःश्रेयस म्हणजे मोक्ष. तो पाहिला कोणी व कसा आहे ? त्याची प्राप्ती शूद्रांना अतिशुद्रांना झाली तरी उच्च वर्गीयांचे काय जेणारयांचे ? शिवाय त्यातही मेख आहे ! त्रैवर्णिकांची सेवाचाकरी करण्यानेच शूद्रांना व अतिशूद्रांना मरणोत्तर सद्गती मिळेल असे धूर्त शास्त्रकारांनी लिहून ठेवलेले आहे. याचा अर्थ असा की, तुम्ही जिवंत असता आमच्या गुलामगिरीत राहा, नरकवास भोगा म्हणजे मेल्यावर तुम्हाला स्वर्गप्राप्ती होईल !"[५] अशा धर्माविषयी बहिष्कृतांना प्रेम कसे वाटेल असा सवाल आंबेडकर करतात.

---

(४) उनि. धनंजय कीर पृ. २७१, (५) उनि. **ब. भा. अग्रलेख,** २९–७–२७.

**तत्त्व व व्यवहार :** समतेच्या दृष्टीने बाबासाहेब १९२७ च्या सुमारास ख्रिस्ती व इस्लाम या धर्मांच्या तुलनेने हिंदूधर्माचे वैशिष्ट्य सांगतात. "माणसे ईश्वराची लेकरे आहेत. एवढ्यावरच न थांबता ती ईश्वराचीच रूपे आहेत असे मोठ्या निर्भीडपणे हिंदु धर्म सांगत आहे जेथे सारीच ईश्वराची रूपे आहेत तेथे कोणी उच्च कोणी नीच असा भेदभाव करणे शक्य नाही, हे त्या धर्माचे एक महाओजस्वी तत्त्व आहे...समानतेचे साम्राज्य स्थापन होण्यास यापेक्षा दुसरा मोठा आधार सापडणे कठीण दिसते"[६] हे बाबासाहेबही गौरवाच्या भावेन सांगतात पण त्यांना ख्रिस्ती व इस्लामी राष्ट्रात असलेल्या सामाजिक समतेचा मात्र हिंदूसमाजात मागमूस का नाही, एवढेच नव्हे तर समतेला हिंदु लोक विरोध करतात. अमानुष विषमता पाळतात, "तुम्ही आम्ही एक आणि कंठाळिला मेख", हे का घडावे असा त्यांना प्रश्न पडतो. ते म्हणतात या मूळ खऱ्या हिंदू धर्माची ओळख हिंदनाही नाही. त्यांच्यामते "कोणत्याही धर्माचा आचारात्मक भाग त्या धर्माच्या तत्त्वज्ञानावरच अधिष्ठित असला पाहिजे, हे विसरता कामा नये, तसे जर नसेल तर त्या धर्माला अंतिम ध्येय नाही असेच म्हणावे लागेल. समाजाचा आचारात्मक धर्म जर त्या समाजाच्या विचारात्मक धर्माच्या नांगरास जखडलेला नसेल तर तो समाज होकायंत्राशिवाय समुद्रात लोटून दिलेल्या एखाद्या जहाजाप्रमाणे कोठे वहात जाईल व कोणत्या खडकावर आदळेल याचा नेम नाही"[७] अशी तत्त्व व व्यवहाराची एकसंधता सांगतात. आणि तत्त्वाप्रमाणे आचार न करता केवळ तत्त्वांची महती हिंदू गातात तेव्हा "तत्त्वज्ञान काय चाटावयाचे आहे ? व्याकरणाने भूक थांबत नाही व काव्यरसाने तहान शमत नाही, अशा अर्थाची संस्कृत भाषेत जी म्हण आहे ती धर्मातील तत्त्वज्ञानालाही लागू आहे"[८] असा मूलकुठारा सवाल करतात.

**धर्म व माणूस :** धर्मासाठी माणूस की माणसासाठी धर्म हा प्रश्न नेहमी विचारण्यात येतो त्याचे मोठे सुरेख उत्तर बाबासाहेब देतात. ते

(६) तत्रैव २२-४-२७. (७) तत्रैव २२-४-२७. (८) तत्रैव, १५-३-२९

म्हणतात नीतिशुद्ध आचरण ठेवण्याच्या जबाबदारीच्या दृष्टीने व एकंदर समाजाच्या हिताच्या दृष्टीने माणूस धर्मासाठी आहे.

पण "धर्माच्या नावावर खपणाऱ्या अधर्मासाठी, विशिष्ट वर्गाच्या गुलामगिरीत खपण्यासाठी, पिढ्यान्‌पिढ्या अन्याय व जुलूम सोसण्यासाठी माणसाचा जन्म आहे किंवा एखाद्या वर्गाचे अस्तित्व आहे असे मात्र केव्हाही म्हणता येणार नाही"[९] असे असेल तर माणसासाठी धर्म आहे असे म्हटले पाहिजे असे डॉ. आंबेडकर सांगतात. प्रत्येकाला नीतीने वागून ऐहिक उन्नती करण्यासाठी धर्माचे साह्य व्हावे. धर्माने जात पाहून व्यक्तीशी वागू नये. 'नियमन मनुजासाठी मानव–नसे नियमनासाठी जाणा' असे कवी केशवसुतांनी म्हटले होते. त्यासंदर्भातही आंबेडकरांच्या प्रज्ञेची झेप कशी दूर गेली आहे ते बघायला हवे.

**समाज, संस्कृती व लोक :** असे मानले जाते की अस्पृश्य हे या देशातील हिंदू आहेत. डॉ. आंबेडकर हिंदुत्ववाद्यांच्या या समजुतीला आव्हान देतात. सहभोजन व सहपरिवार हे विधी जर अस्पृश्य व हिंदू यांच्यात चालत नाहीत तर अस्पृश्य हे हिंदूच ठरू शकत नाहीत. स्पृश्य व अस्पृश्य यांच्यात कोणताही दुवा नाही. साधा सहवासही नाही. हे दोन्ही समाज एका संस्कृतीखाली वा धर्माखाली वाढले असले तरी त्यांना एका समाजाचे म्हणता यायचे नाही. त्यांच्या मते "...संस्कृती आणि समाज या दोन गोष्टी अगदी भिन्न आहेत. एका समाजाची संस्कृती एकच असते हे खरे, परंतु एका संस्कृतीचे लोक ते एकाच समाजाचे घटक हा नियम सर्वत्र लागू पडणार नाही."[१०] युरोपात एका ख्रिस्ती संस्कृतीखाली फ्रेंच, जर्मन, इंग्लिश, इटॅलियन असे भिन्न समाज येतात. तसे स्पृश्य व अस्पृश्य हे समाज भिन्न आहेत. स्पृश्य हिंदूंनी अस्पृश्यांना कधीही आपलेपणाने वागविले नाही. हिंदूधर्म सोडायची भाषा अस्पृश्य करतात तेव्हा हिंदू लोक अस्पृश्यांना तुम्ही हिंदूच आहात असे सांगतात. तेव्हा आंबेडकर त्यांना वरीलप्रमाणे अस्पृश्यांचे निराळेपण सांगतात. पुढे जाऊन अस्पृश्य मुळात नागवंशीय होते. बुद्धधम्माचे अनुयायी होते असे ते सांगतात.

---

(९) तत्रैव २९-७-२७. (१०) तत्रैव १६-११-२८

**धर्म व अंधश्रद्धा :** "धर्माने माणसाला देवदूत बनविले पाहिजे, परंतु तसे न होता धार्मिक कलहामुळे धर्माच्या योगाने माणसाचे माणूसपण जाऊन त्याला पशुपण येत आहे."[११] कारण दुराग्रह, दुराभिमान, ग्रंथ-प्रामाण्य, अंधश्रद्धा व अज्ञ समजुती यांनी ग्रासून टाकल्याने धर्म व सारासार विचारात फारकत झालेली आहे. "मेलेल्या माणसांची मढी व मेलेल्या माणसांचे विचार यांच्यावरच सध्याची रणे मानलेली आहेत...सत्य कोपऱ्यात रडत बसले आहे."[१२] ढोंगी लोकांसाठी अशी स्थिती आवश्यक असते असे ते सांगतात.

**हिंदू धर्म व इतर धर्म :** जगातील सर्वच धर्मात गरीब-श्रीमंत, ज्ञानी-अज्ञानी असे भेद सामान्यत: दिसतातच. "ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे भेद हिंदू धर्मातच आहेत असे नाही. ते ख्रिश्चन व मुसलमान धर्मातही दिसून येतात."[१३] अस्पृश्यतेचीही कल्पना हिंदूधर्माप्रमाणे यहुदी व पारशी अशा धर्मातही असल्याचे ते सांगतात. पण ओवळे असणे, प्रेताला शिवणे, रक्तस्राव होणे इत्यादी कारणांमुळे यहुदी धर्मात व मृताला शिवणे, विटाळशी स्त्रीस व वरील अस्पृश्यास स्पर्श करणे या कारणामुळे पारशी धर्मात मनुष्य अस्पृश्य होतो. पण त्या धर्मात अस्पृश्यांचा वर्ग निर्माण झाला नाही. हिंदूधर्मात अस्पृश्यांचा वर्ग निर्माण झाला व अस्पृश्यता चिरंतन ठरली. इतर धर्मात ती तात्कालिक ठरली, त्या बहिष्कारातून मुक्त होण्याचा मार्ग त्या धर्मांनी ठेवला. हिंदूधर्मात असे का झाले नाही ? हिंदूधर्मात आहे त्याप्रमाणे पिढीजात अस्पृश्यता, वर्ण व जाती या बाबी इतर धर्मात नाहीत. हिंदूधर्मात इतर धर्मातल्याप्रमाणे गुणभेदानुसार विषमता आहे आणि या धर्माचा विशेष असा की त्यात जन्मजात विषमताही आहे. हिंदू-धर्मात अशी दुहेरी विषमता आहे. "...धनभेदानुरूप वर्गीकरण केले तर श्रीमंत व गरीब असा गुणभेद सर्व समाजात होऊ शकतो; पण इतर समाजात जशी येथे या भेदाची मर्यादा संपते तशी ती हिंदू धर्मात संपत नाही. हिंदू समाजात या भेदाला आणखी पुढे एक शेपूट शिल्लक राहते.

---

(११) तत्रैव १२-८-२७ (१२) तत्रैव १२-८-२७ (१३) तत्रैव १-७-२७.

श्रीमंत ब्राह्मण व श्रीमंत महार, ब्राह्मण मजूर व महार मजूर असा जसा दुसरा भेदभाव करता येतो तसा भेदभाव करावयास अन्यत्र कोठेच वाव सापडत नाही."[१४] हीच गोष्ट त्यांनी Annihilation of Caste मध्ये सांगितली आहे. "जातिसंस्था ही निव्वळ श्रमविभाग नाही तर तो श्रमिक-विभाग आहे. सुधारलेल्या समाजात श्रमविभाग निःसंशय पाहिजे, पण कुठल्याही सुधारलेल्या समाजात श्रमविभागाबरोबर श्रमिक विभागा-सारखे पोलादी चौकटीत अनैसर्गिक विभाग पहावयाला सापडणार नाहीत. श्रमविभागापासून श्रमिकविभाग फार निराळा आहे. जातिसंस्था पुन्हा केवळ श्रमिकविभाग नाही तर ती वंशपरंपरांत आहे. एका जातीपेक्षा दुसरी जात उच्च अशा तऱ्हेचा क्रमवार दर्जा ठरलेला आहे. कुठल्याही देशात श्रमविभागाबरोबर श्रमिकांचा दर्जा ठरलेला नाही आहे."[१५] याप्रकारे घडले याला कारण हिंदुधर्म. त्याने या विभागणीला दिलेले पावित्र्य. पाश्चात्य जगात गुलामगिरीला धर्माचा आधार नाही. "परंतु इकडे समाजशास्त्र व धर्मशास्त्र ही एक असल्यामुळे राजरोस धर्माच्या आधारावर अस्पृश्यतेची गुलामगिरी निर्माण करता आली. धर्मामध्ये ही बात्र घुसडली गेल्यामुळे ती वज्रलेप बनली."[१६] खाण्यापिण्यापासून सर्व संदर्भातच हिंदू धर्माचे नियम आहेत. "जातिभेद हा हिंदू धर्मामध्ये एक और प्रकार आहे. दुसऱ्या कोणत्याही धर्मात ही अजब चीज सापडावयाची नाही. आणि जातिभेदातही अस्पृश्यता हा जो प्रकार आहे, त्याला तर जगात दुसरीकडे कोठेच तोड सापडावयाची नाही. सामाजिक भेद इतरत्र असतील आणि अस्पृश्यतेचे पर्यायही इतरत्र सापडतील परंतु हिंदू समाजात त्या भेदावर व अस्पृश्यतेवर धर्म्माचा शिक्का बसलेला आहे!"[१७] त्यामुळेच "हिंदू समाजात धार्मिक सुधारणेखेरीज सामाजिक सुधारणा होणे शक्य नाही."[१८]

---

(१४) तत्रैव १–७–२७ (१५) हिंदु धर्म म्हणजे काय, Annihilalion of caste चे भाषांतर. डी. के. पोखर्णीकर. पोखर्णा. जि. सांगली, १९६२ पृ. २७ (१६) उनि. ब. भा. अग्रलेख, २९–७–२७ (१७) तत्रैव १५–३–२९ (१८) तत्रैव १५–३–२९.

असे महासत्य हिंदू समाजाच्या सुधारणेच्या संदर्भात डॉ. आंबेडकर सांगतात.

**नवी देवळे व अस्पृश्यता :** काळा राम मंदिर प्रवेशाची चळवळ बाबासाहेबांनी केली. मंदिर प्रवेशाची चळवळ बाबासाहेबांना ईश्वर–वा मोक्ष यासाठी आवश्यक वाटत नाही. ते म्हणतात, "अस्पृश्यांना देवळात जावयाचे आहे ते केवळ त्यांना स्पृश्यांच्या बरोबरीने आपला हक्क बजावयाचा आहे म्हणून "[१९] त्यामुळेच अस्पृश्य मंदिर प्रवेशासाठी प्रयत्न करतात म्हणून त्यांच्यासाठी निराळी देवळे बांधणारांना ते 'मूर्खांचा कपू म्हणतात. अशी बेवकूफ कामे हाती घेणाऱ्या संस्था नसलेल्या परकरल्या असे त्यांना वाटते. अस्पृश्याला साकाराशी वा निराकाराशी, सगुणाशी वा निर्गुणाशी अशा कुणा एकु 'गोविंदुशी' अगदी काही एक कर्तव्य नाही. त्यामुळे निराळया देवळांची कल्पना डॉ. आंबेडकरांना केवळ पोरकटपणाची वाटते.

**धर्मांतराचे विचार :** १९२७ च्या सुमारापासून डॉ. आंबेडकरांच्या डोक्यात धर्मांतराचे विचार सुरू होते. बुद्धिप्रामाण्यवादही मनात पक्का होता. हिंदूधर्म अस्पृश्यांचा अभ्युदय करू शकणार नाही याची त्यांना खात्री होती. म्हणूनच "अस्पृश्यतेचे शक्य तितक्या लवकर निवारण न झाल्यास अस्पृश्य समजले जाणाऱ्या लोकांनी धर्मांतराचा मार्ग स्वीकारावा..."[२०] असे प्रतिपादन याच काळात त्यांनी केले आहे. हिंदु धर्मात राहून वाजवी हक्क मिळणार नसतील तर ते परधर्माचा स्वीकार करूनही आम्ही मिळवू, असे ते ठणकावून सांगतात. माणसामाणसात पंक्तिप्रपंच करणारा, अस्पृश्यांना कोणताही अपराध नसताना गुन्हेगारापेक्षाही वाईट वागवणारा, जनावरांनाही मिळणाऱ्या सवलती त्यांना लाभू न देणारा धर्म धर्मच नव्हे "तशा धर्माला 'धर्म' हे नावच योग्य नव्हे "[२१] असा निर्णय ते घेतात. "आम्हाला समाजात समान हक्क पाहिजे आहेत ते आम्ही शक्यतोवर हिंदुसमाजात राहून आणि

(१९) तत्रैव ३–६–२७. (२०) तत्रैव २९–७–२७. (२१) तत्रैव २९–७–२७.

जरूर तर कवडीमोल ठरलेल्या हिंदुत्वावर लाथ मारून मिळविणार आहो आणि हिंदुत्वावर पाणी सोडण्याची पाळी आली तर अर्थातच आम्ही देवळांच्या वाटेला जाणार नाही..."[२२]

धर्माने समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या नीतीसाठी जगावे. कोणाच्याही उन्नतीच्या आड धर्माने येऊ नये. माणसे वर्णात वाढू नयेत. न्याय सर्वांना सारखा असावा. धर्माने अस्पृश्यता पुरस्कारू नये. धर्माने मनुष्य निर्माण करावा. धर्माने दुराग्रह, अंधश्रद्धा, ग्रंथप्रामाण्य, भ्रम पसरवू नयेत. मानवी जीवनाच्या सौंदर्याचे व सामर्थ्याचे सत्य धर्माने मार्गदर्शक तत्त्व म्हणून माथी मिरवावे. ही धर्मासंबंधींची त्यांची भूमिका अधिक प्रगल्भ होत जाते, ईश्वर स्वर्ग यांचे अस्तित्व त्यांनी सुरवातीपासूनच नाकारले आहे. १९५६ साली त्यांनी बुद्ध धम्म स्वीकारला. बुद्धा अँड हिज धम्मात त्यांनी धर्म व धम्म यांची परस्परविरोधी रूपे विशद केली आणि अनिश्वरवादी अशा नास्तिक आणि बंधुत्वालाच धम्म मानणाऱ्या ऐहिक नीतीधम्माचा त्यांनी अंगिकार केला. अस्पृश्यता निर्मूलनाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या बुद्धाच्या धम्माचा त्यांनी स्वीकार केला. असे करून धर्म व धर्मसंस्था त्याग त्यांनी केला. ते पहिले धर्मविहीन क्रांतीकारक ठरले.

---

(२२) ब. भा. स्फुट लेख ३–४–२७.

# ४

# डॉ. आंबेडकरांचे राजकीय विचार

> "दलित वर्गाच्या हाती सत्ता गेली की ही चातुर्वर्ण्य-जन्य विषमता धुळीला मिळालीच असे समजावे. आजवर ती टिकली याचे कारण राजसत्तेचा तिच्यावर कधीच मारा झाला नाही. राजसत्तेची तिच्यावर नेहमीच कृपा होती."
> (ब. भा. १-२-२९)
>
> —डॉ. बाबासाहेब आंबेडकर

---

बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका आद्यंती समाजक्रांतीकारकाची आहे. लोकशाही समाजवाद हे त्यांच्या जीवनाचे ध्येय आहे. लोकशाही ही त्यांच्यालेखी सर्वजनहिताय-सुखाय अशी जीवनप्रणाली आहे. आर्थिक लोकशाही, सामाजिक लोकशाही, शैक्षणिक लोकशाही, वाङ्मयीन लोकशाही यांच्याप्रमाणेच राजकीय लोकशाही हासुद्धा त्यांच्या लोकशाही समाजवादाचा एक सेंद्रिय असा घटक ठरतो.

त्यांच्या इंग्रजी लेखनाच्या तुलनेने मराठी लेखनातील राजकीय विचारांचे प्रमाण अल्प आहे असेच म्हटले पाहिजे. त्यांचा हा राजकीय लोकशाहीचा विचार सामाजिक, आर्थिक इत्यादी सर्व लोकशाही विचाराचा अविभाज्य भाग म्हणूनच लक्षात घ्यावा लागतो. त्यांचा हा राजकीय विचार स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योतर अशा दोन भिन्न कालखंडांशी निगडीत आहे.

**इंग्रजी राजवटीचे स्वागत आणि समीक्षा**

इंग्रजी राजवटीने आपल्या देशात प्रबोधनाला जन्म दिला. या राज-वटीमुळे काही वाईटही घडले असेल पण एतद्देशीय राजवटीतही ते कितीतरी अमानुषपणे घडत होते. इंग्रजी सत्ता प्रस्थापित होण्याच्या घटनेला मार्क्सने 'खरीखुरी सामाजिक क्रांती,' म्हटले. फुल्यांना 'समाज-परिवर्तनासाठी ही पर्वणी मोलाची वाटली.' या देशात आमूलाग्र सुधारणा होण्यासासाठी 'ईश्वराने या देशात इंग्रजांची प्रेरणा केली आहे असे लोकहितवादींना वाटले. तर "ब्रिटिशांचे हिंदुस्थानातील आगमन हे या देशाला वरदान मानावे लागेल."[१] असे डॉ. आंबेडकरांना वाटले. अर्थात इंग्रजी राजवटीच्या दुष्परिणामांचीही नोंद त्यांनी केली.

इंग्रजी राजवट इथे आल्यामुळेच आपल्या समाजात बौद्धिक जागृती घडून आली. इंग्रजी वाघिणीचे दूध प्यावयास मिळाल्यामुळेच लोकांमध्ये नवा उत्साह, नवे तेज व नवी स्फूर्ती निर्माण झाली. या राजवटीमुळेच आपल्याकडील पूजनीय दुष्ट सामाजिक रूढी व चालीरीतींबद्दल तीव्र निषेधभाव लोकमानसात निर्माण झाला. या राजवटीबरोबर आलेल्या आधुनिक मूल्यांमुळे आपल्या जीवनमूल्यांचे पुनर्मूल्यन सुरू झाले. अनेक रूढींची विघातकता लक्षात आली. पुनरुत्थानाच्या मार्गावर पाऊल पडले ते केवळ या राजवटीमुळे. सर्वांस समान राज्यपद्धती व सर्वांस समान न्यायपद्धती यांचा फार मोठा लाभ भारताला झाला. याप्रकारे इंग्रजी राजवटीमुळे आपल्या समाजात घडून आलेल्या मूलभूत स्थित्यंतराची नोंद बाबासाहेबांनी घेतली आहे.

इंग्रजी राजवटीमुळे आपल्या परलोकनिष्ठ, दैववादी, वर्णवादी व अंधश्रद्ध समाजात इहवाद, व्यक्तिस्वातंत्र्यवाद व बुद्धिप्रामाण्यवाद ही आधुनिक जीवनमूल्ये आली. ही मूल्ये चार्वाकाच्या-बुद्धाच्या काळात या देशात होतीच. पुढे त्यांचा कपटाने उच्चवर्णियांनी प्रभाव कमी केला व आपल्या हिताची आध्यात्मिक जीवनमूल्ये सन्माननीय केली. पण इंग्रजी

---

(१) एम. एल. कोसारे, **विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास,** नागपूर १९८४, पृ. १६१ वरून उद्धृत.

राजवटीमुळे ही मूल्ये नवे नवे ज्ञान-विज्ञान संदर्भ घेऊन इथे आली आणि आपल्या अद्भुत समाजसंस्थेचा गड कोसळू लागला. ही राजवट पूर्वकाळात वर्चस्व भोगणारांना संकट वाटली. कारण तिचे ते गुलाम झाले व त्यांचे या देशातील गुलाम स्वतंत्र होण्याची प्रक्रिया सुरू झाली. बाबासाहेब म्हणतात. "...ब्रिटिश राजसत्ता स्थापित होऊन इंग्रजी शिक्षणाचा प्रसार झाला. ख्रिस्ती मिशनऱ्यांचे काम या देशात जोराने चालू झाले. या गोष्टी इतर हिंदूंना आपत्तीप्रमाणे वाटत असल्या तरी आम्हा बहिष्कृतांच्या सुदैवानेच त्या घडून आल्या असे आम्ही समजतो. नाहीपेक्षा बहिष्कृत वर्गाला आजचे दिवससुद्धा पाहावयास मिळाले नसते. त्यांना आपली दुःखे बोलून दाखविण्यास वाचाही प्राप्त झाली नसती."[२] पेशवाई, हिंदूधर्मशास्त्र आणि येथील उच्चवर्णियांचे हेतू लक्षात घेता बाबासाहेबांचे हे विधान खोटे आहे असे कोणीच म्हणू शकणार नाही.

बाबासाहेबांनी ब्रिटिश सत्तेचे दुष्परिणामही तेवढ्याच तडफदारपणे सांगितले. (१) ब्रिटिश सत्तेखाली भारतीय लोक एकप्रकारे खुजे होताहेत. (२) ब्रिटिश सत्तेचे धोरण या देशात उद्योगधंदे व व्यापार यास चालना न देण्याचे होते. (३) हा देश ब्रिटनच्या मालाची खुली बाजारपेठ रहावी हे सत्तेचे धोरण होते. (४) परिणामी देश दरिद्री झाला व ग्रामीण व गरीब यांना त्याची झळ पोचली. (५) येथील जमीनदार व भांडवलदार यांच्या शोषणापासून येथील जनतेला सत्तेने वाचविले नाही. (६) समाज-विघातक अमानुष रूढींना सत्तेने हात लावला नाही. (७) अस्पृश्यता व जातीभेद निर्मूलनासाठी सत्तेने काही केले नाही. अस्पृश्यांना पोलीस, पलटण इत्यादी खात्यात भरती करण्यासाठी काही केले नाही उलट १८९२ साली सैन्यातून त्यांना कमी केले. (८) व्हाईसरॉयच्या मध्यवर्ती कार्यकारी मंडळात अस्पृश्य प्रतिनिधी घेतला नाही. (९) या महाधूर्त इंग्रजांनी दलित जनतेला वर न येऊ देण्यासाठी चातुर्वर्ण्यातील श्रेष्ठ जे

---

(२) ब. भा. अग्रलेख. २९-७-२७, (संपा. रत्नाकर गणवीर) नागपूर, १९७६. पृ. १३०

ब्राह्मण त्यांच्यावरच राजकीय सत्तेची खैरात केली. (१०) इंग्रजांनी दलितांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढविले नाही.

बाबासाहेबांनी या देशात विषमतेचे विष पसरवणाऱ्या हिंदूधर्माविषयी व ब्राह्मणांविषयी अत्यंत परखड शब्दात लिहिले. पण इंग्रजी राज्य टिकून राहावे ही भावना त्यांनी दलितांमध्ये निर्माण होऊ दिली नाही. जितके हक्क मिळविता येतील तितके इंग्रजांकडून मिळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला पण इंग्रजी सत्ता इथे चिरंतन असावी ही स्वातंत्र्यद्रोही भूमिका त्यांनी कधीच घेतली नाही. बाबासाहेब अस्सल देशभक्त आहेत पण ते सुधारक, समाजक्रांतीकारक देशभक्त आहेत. राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीत त्यांनी–ज्या सुप्त हेतूने उच्चवर्णीय लोक राजकीय स्वातंत्र्याची मागणी करीत होते त्यामुळे–भाग घेतला नाही. पण स्वातंत्र्याच्या चळवळीला त्यांनी विरोध कधी केला नाही. स्वातंत्र्याचे त्यांनी मनापासून स्वागतच केले. "आपल्या बहुतेक लोकांना स्वराज्य ही फार मोठी आपत्ती वाटते. असे वाटणे स्वाभाविक आहे. या समाजावर त्यांच्याच देशबांधवांनी जे जुलूम, दमन व अन्याय केले आहेत त्याचे भयावह चित्र त्यांच्यासमोर उभे राहते आणि स्वराज्यात त्याचीच पुनरावृत्ती घडणार अशी भीती त्यांना वाटते. परंतु तुम्ही भूतकाळाला क्षणभर विसरले आणि ज्यात श्रेष्ठ वर्गाकडून जनतेला संरक्षण मिळण्याच्या दृष्टीने आवश्यक सवलतींची तरतूद केलेली आहे असे स्वराज्याचे चित्र समोर आणले तर तुम्हास दिसून येईल की तुम्हास वाटते त्याप्रमाणे स्वराज्य ही भयावह आपत्ती नसून ते अशाप्रकारचे राज्यशासन राहील की त्यात या देशाच्या राज्यशासनाचे जे सूत्रधार राहतील, इतर गोष्टी समान असता त्यात तुमचा समावेश होण्याची संधी तुम्हास प्राप्त होऊ शकते. भूतकाळातील दारुण निराशेने पछाडले जाऊ नका. तुमचा निर्णय घेताना कोणाचीही भीती बाळगू नका अथवा कोणाच्याही आमिषाला बळी पडू नका. तुम्ही आपल्या हितसंबंधाचा विचार करा म्हणजे स्वराज्य हे आपले ध्येय तुम्हास मान्य होईल."[३] ही बाबासाहेबांची भूमिका लक्षात घेतली

(३) उनि. **विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास,** पृ. १६३ वरून उद्धृत.

तर बाबासाहेब राजकीय स्वातंत्र्याच्या विरोधी तर नव्हतेच उलट ते स्वातंत्र्यवादी होते ते दलितांमध्ये स्वातंत्र्यनिष्ठ मनोवृत्ती निर्माण करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते असे दिसते.

**स्वराज्याची मीमांसा**

स्वराज्याविषयी सर्वांना आस्था वाटत नाही याचे करण वरील स्थितीत आहे. स्वराज्य हा दलितांनाही जापला जन्मसिद्ध हक्क वाटण्यासाठी ही समाजरचना बदलली पाहिजे लो. टिळक बहिष्कृत समाजात जन्माला आले असते तर 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.' अशी गर्जना न करता 'अस्पृश्यता नष्टमूल करणे हे माझे कर्तव्य आहे.' असेच खात्रीने म्हटले असते पण 'परदु:ख शीतल' या(अ)न्यायाने उच्चवर्णियांना अस्पृश्यतेचे काहीही वाटत नाही.[४] असे डॉ. आंबेडकर म्हणतात. "आपल्या देशाला स्वातंत्र्य असू नये, आपला देश कायमचा पारतंत्र्यात राहावा असे इच्छिणारा एकही स्वदेशाभिमानी माणूस सापडणार नाही. स्वातंत्र्याच्या ध्येयासंबंधाने सर्वांना सहानुभूती वाटणे स्वाभाविक आहे." पण असे असले तरी केवळ राजकीय स्वातंत्र्याचा विचार त्यांना सामाजिक स्वातंत्र्याशिवाय अपूर्ण वाटतो. या बाबतीत ते लोकहितवादी, फुले आणि आगरकर यांचे सवाई वारस ठरतात. ज्या राजकीय स्वातंत्र्यात सामाजिक, आर्थिक असे सर्वांगीण स्वातंत्र्य असेल त्या राजकीय स्वातंत्र्याच्या विरोधी बाबासाहेब नव्हते तर जे राजकीय स्वातंत्र्य केवळ उच्चवर्णियांच्या हिताच्या दिशेने जात होते त्याच्या ते विरोधी होते. त्यानी म्हटलेच आहे की 'स्वराज्य म्हणजे आमच्यावर राज्य होणार' आणि 'इंग्रजी राज्यात ज्यांची बात्त सहन होत नव्हती, त्यांची लात सोसावी लागणार.' त्यामुळेच स्वराज्य म्हणजे "...एखाद्या जनावराला त्याचा निर्दय धनी कसाबाच्या स्वाधीन करतो, त्याप्रमाणे बहिष्कृत वर्गाच्या लोकांना त्यांच्या मायबाप सरकारने वरिष्ठ हिंदी लोकांच्या स्वाधीन केले आहे."[५] असे होऊ नये असे डॉ. आंबेडकरांना वाटते. कारण "इंग्रज बोलून चालून परके त्यांनी काही केले नसेल तर त्यांच्यावर रुसण्याचा कोणालाही हक्क नाही...पण

(४) उनि. ब. भा. अग्रलेख, २९-७-२७. (५) तत्रैव ३-४-२७,

ज्या गोष्टी निव्वळ लोकमतावर अवलंबून आहेत, ज्या घडवून आणण्यास कायदा नको अशा कोणत्या गोष्टी तुम्ही केल्या आहेत ?"[६] असा सवाल त्यांनी आपल्या उच्चवर्णियांना केला आहे. त्यामुळे "महाराष्ट्रातील राष्ट्रीय पुढारी तर कुटिलांचा कंपू !"[७] असे त्यांना वाटते. "ब्रिटिश सरकारचे नि:पक्षपाती धोरण आमच्या वरिष्ठ समाजाकडून ठेवले जाईल इतकी त्यांची मनोभूमिका शुद्ध व सात्त्विक बनलेली नाही. हा घोर प्रसंग जर टाळावयाचा असेल, तर आतापासूनच चळवळीस सुरवात केली पाहिजे."[८] इंग्रजी सत्तेचे शैक्षणिक धोरण उदार होते. विविध क्षेत्रात त्यांनी विविध शिष्यवृत्त्या, सवलती दिल्या होत्या. एक इहवादी प्रबोधन इथे त्यांनी सुरू केले होते, त्यामुळे "स्वराज्य कोणाचे व ते कशासाठी हे कळल्याखेरीज या तत्त्वाची री आम्ही तरी ओढू शकत नाही." असे जे १४-२-१९२० च्या मूकनायकात म्हटले होते त्याचे कारण येथील मनुप्रामाण्यवादी समाजरचना होय असे त्यांना वाटते. व्यक्ती विकासासाठी स्वातंत्र्याची मागणी करणाऱ्या वरिष्ठांनी देशातील अस्पृश्यांसाठी आजवर काय केले ? हा वर्ग तर येथील उच्चवर्णीचा गुलाम आहे. याप्रकारे बाबासाहेब या देशातील बहिष्कृतांच्या बंधविमोचनाशी स्वराज्याला जोडतात... जातीयता, दारिद्र्य, अस्पृश्यता आणि सर्व प्रकारची विषमता स्वराज्यात राहणार नाही, मिळणारे राजकीय स्वातंत्र्य मूठभर उच्चवर्णियांचे न राहता ते सर्वांसाठी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिकही स्वातंत्र्य कसे होईल यासाठी बाबासाहेबांची प्रज्ञा प्रयत्न करीत होती असे दिसते, त्यामुळे प्रथम कंपनी सरकारच्या व पुढे इंग्रजांच्या सैन्यात भरती झालेल्या दलितांनी इंग्रजांना हा देश जिंकण्यास मदत केली याचे दु:ख ते करतात पण १९२९ साली पुणे येथील पर्वती सत्याग्रहाच्या निमित्ताने व इतरही अनेक निमित्तांनी जे अत्याचार दलितांवर होत होते, त्याना साधे माणुसकीचे हक्कही द्यायला सवर्ण तयार नव्हते ते पाहून बाबासाहेबांना वाटले हे लोक स्वराज्य मिळाल्यावर दलितांना काय न्याय देतील ? अस्पृश्यांची गुलामगिरी

(६) तत्रैव १६-११-२८, (७) तत्रैव १६-११-२८, (८) तत्रैव ३-४-२७.

कायम ठेवण्याकरिताच जर स्वराज्य मिळविण्याची खटपट असेल तर अशा खटपटीला जितकी विघ्ने आणता येतील तितकी विघ्ने आणणे हे अस्पृश्य वर्गातील दरेक व्यक्तीने आपले कर्तव्यकर्म म्हणून समजले पाहिजे. आज अस्पृश्यांना हक्क देण्यास जर स्पृश्य लोक तयार झाले असते तर आमच्या कल्याणाबद्दल त्यांना आस्था आहे असा विश्वास ठेवून स्वराज्याच्या दोऱ्या त्यांच्या हातात जाऊ देण्यास अडथळा करा असा उपदेश कोणी केला नसता परंतु जे लोक आज आम्हाला साधे माणुसकीचे हक्क देण्यास तयार नाहीत ते उद्या स्वराज्य मिळाल्यानंतर आमची माणुसकी ओळखतील व स्वतःच्या माणुसकीला जागतील असे मानणारा एकही अस्पृश्य नाही "[९] असे स्वराज्याला अमानुष आशय येण्याची चिन्हे दिसायला लागली तेव्हा ते संतापून म्हणतात. १९२७ मध्ये कॉंग्रेसने संपूर्ण स्वराज्याचे ध्येय-जाहीर केले होते. तर पं मोतीलाल नेहरू कमिटीने ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्याची शिफारस केली. बाबासाहेब साम्राज्यांतर्गत स्वराज्याचे पुरस्कर्ते आहेत. त्याचे एक कारण व्यवहारात राष्ट्रांना थोडेसे पारतंत्र्य स्वीकारावे लागते हे व दुसरे स्वातंत्र्य राखता येण्याबद्दलची साशंकता. देशाच्या आजूबाजूच्या मुस्लिम राष्ट्रांकडून त्यांना स्वातंत्र्य धोक्यात येईल असे वाटते. शिवाय चीन व जपान-कडूनही त्यांना हा धोका वाटतो. अस्पृश्यतेच्या निर्मूलनावर मुसलमान होण्याचा इलाज सांगणारे आंबेडकर पुढे आपल्या देशात हिंदू व मुसलमान हे दोन समाज नव्हेत, दोन राष्ट्रे नांदत आहेत असे सांगतात. इस्लामधर्म व्यक्तिस्वातंत्र्य व समता यांच्या विरोधी आहे. मुसलमानात आत्यंतिक धार्मिक कर्मठपणा असून भारतीय राष्ट्रवादाशी त्यांना अगदी कमी जवळीक असल्याने पुढे लोकसंख्येची अदलाबदल करून त्यांना काही भूभाग तोडून द्यावा असे त्यांना वाटते. देशाच्या सरहद्दीवर [illegible]त व्याला असलेले मुसलमान म्हणजे "स्वतंत्र झालेल्या हिंदुस्थानचे [illegible]ल-आहेत "[१०] त्यांनी शत्रूला न अडविता सहाय्य केले किंवा तटस्थ राहिले तर "घरच्याच सहाय्याने आत आलेला शत्रू घर करून राहणार."[११]

(९) तत्रैव १५–९–२९, (१०) तत्रैव १८–१–[illegible], (११) तत्रैव १८–१–२९.

हे उघड आहे. मुसलमान ब्रिटिशांशी एकनिष्ठ होते. आता ते स्वातंत्र्यवादी बनले आहेत. ते स्वातंत्र्याच्या आवडीमुळे नसून मुसलमानी साम्राज्याच्या चौकटीत या देशाला जखडण्यासाठी होय. मुसलमानांच्या मतांच्या आधारावर स्वातंत्र्याची चळवळ सुरू करू इच्छिणाऱ्या गांधींच्या संदर्भात "ईश्वर करो आणि म. गांधीपासून या देशाची सुटका होवो !"[१२] असे ते वरील धोका ध्यानात घेऊनच म्हणतात "ज्यात आमच्या देशाचे अकल्याण आहे त्यात आमचेही अकल्याण आहे अशी आमची भावना असाल्यामुळे ही जोखीम आम्ही आमच्या शिरावर घेतली आहे."[१३] असे वरील भूमिकेच्या परखडपणाच्या संदर्भात ते सांगतात. त्यात राष्ट्रहित हे प्रथमस्थानी आहे हे लक्षणीय आहे.

### क्रांतीकडे नेणारी लोकशाही

आंबेडकरांची लोकशाही म्हणजे केवळ शासनप्रकार नव्हे, तो क्रांतीकारी जीवनमार्ग आहे. 'एक व्यक्ती एक मूल्य' असे तिचे स्वरूप आहे. आर्थिक सामाजिक, शैक्षणिक वाङ्मयीन व राजकीय लोकशाही, हे, निर्दोष जीवनाचे सेंद्रिय घटक होत. सहजीवनाची ती पद्धत होय. लोकशाही म्हणजे समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय होय. विज्ञाननिष्ठा म्हणजे लोकशाही होय. लोकशाही म्हणजे "धम्मराज्य" होय. लोकशाहीला भ्रष्ट करणाऱ्या गोष्टींचा निर्देश करून "जेथे दरेक व्यक्ती परस्परात व्यवहार करताना आपल्या तोलाने वागू शकते व दुसऱ्याच्या जाळ्यात न सापडता आपले हितसंबंध अबाधित राखू शकते तेथेच पूर्ण लोकशाही नांदत असते..."[१४] अशी लोकशाहीची व्याख्या ते करतात. हुकुमशाही टाळण्यासाठी विभूतीपूजा टाळावी व समर्थ विरोधी पक्ष असावा. पारंपरिक समाजरचना टाळून उपेक्षितांना सत्ताप्राप्ती करून देणे, ग्रामीणांना राष्ट्रीय जीवनात सामावून घेणे यात त्यांना लोकशाहीचे रूप दिसते.

### राष्ट्रीय एकात्मता आणि भाषा

डॉ. आंबेडकर राष्ट्रीय एकात्मतेचे कट्टर पुरस्कर्ते आहेत. सर्व राष्ट्राला एक भाषा हवी. अनेक भाषांमुळे राष्ट्र एकात्म झाले नाही. असे

(१२) तत्रैव १८-१-२९, (१३) तत्रैव १५-७-२७

त्यांनी राष्ट्रीय एकात्मतेच्या उत्कट हेतूनेच म्हटले. पुढे त्यांनी भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार केला तोही लोकशाहीला आवश्यक असलेला एकजिनसीपणा निर्माण होण्याच्या खात्रीनेच होय.

पण मुसलमानांनी सुचविलेली व "नेहरू कमिटीने मान्य केलेली प्रांतरचना भाषावारीच्या तत्त्वावर केली नसून ज्याप्रमाणे काही ठिकाणी मुसलमानांची दाढी हिंदूंच्या हातात आहे त्याप्रकारे इतर ठिकाणी हिंदूंची शेंडी मुसलमानांच्या हातात जाईल या तत्त्वानुसार करण्यात आलेली आहे."[१४] असे या राष्ट्रपुरुषाने स्पष्ट म्हटलं. एवढेच नव्हे तर "नेहरू कमिटीच्या योजनेत हिंदुंना धोका आहे. इतकेच नव्हे तर हिंदुस्थानवरही अरिष्ट येणार आहे..."[१५] कारण हा देश मोठा पेचात सापडला आहे. एका बाजूने चीन व जपानचे कडे आहे तर दुसरीकडून टर्की, पर्शिया व अफगाणिस्थान या मुसलमानी राष्ट्रांचे कडे आहे. त्यामुळे "या देशाला फार जपून वागले पाहिजे"[१६] असे मोठ्या कळकळीने आंबेडकर म्हणतात.

डॉ. आंबेडकरांचे राजकीय विचार हे भारतीय समाजसंस्थेला मानवतावादाच्या अधिष्ठानावर उभे करणारेच विचार आहेत. भारतीय समाजसंस्थेचे परिवर्तन हाच त्यांच्या सर्व विचारांचा स्थायीभाव आहे. ही समाजसंस्था हजारो वर्षे अमानुष जीवन मूल्यांनी निःसत्त्व व पोकळ झालेली आहे. या देशातील उपेक्षितांना माणुसकी व न्याय मिळण्यासाठी ही समाजसंस्था सर्वस्वी बदलून टाकल्याशिवाय त्यांना गत्यंतर दिसत नव्हते. त्यांचा राजकीय विचार बंधुत्व या धम्मविचाराचा एक सेंद्रिय घटक आहे.

राष्ट्र स्वतंत्र व प्रगमनशील राहावे, घातक रूढींनी त्याला दुबळे करू नये, येथील माणुसकी उज्जवल व्हावी, इथे मनुष्य उपेक्षिला जाऊ नये ही आंबेडकरांच्या राजकीय विचाराची ध्येयवत्ता आहे. मानवत्वाची प्रतिष्ठा

---

(१४) तत्रैव १८-१-२९, (१५) तत्रैव १८-१-२९ (१६) तत्रैव १८-१-२९.

उन्नत करणे. दीन-दलितांच्या मनात अस्मितेचे व "बहिष्कृत वर्गानि राजकीय हक्कांच्या बाबतीत जागरूकता दाखविली पाहिजे व त्याकरिता निकराने भांडले पाहिजे." (ब. भा. १६ मे २९) असे प्रखर भान जागे करणे हा त्यांच्या राजकीय विचारांना लागलेला ध्यास आहे.

त्यांचा राजकीय विचार या देशाच्या उज्ज्वलतेसाठी साकार होतो. तो राष्ट्राला प्रेरणा देतो. सावध करतो. येथील समाजाला ताठ उभे राहायला, मानवतेची उपासना करायला सांगतो. दुर्बल घटकांच्या उत्थानाशी या विचाराची उत्कट बांधिलकी आहे. मनुष्यत्वाचा व राष्ट्राचा विकास ही प्रतिज्ञा असलेला हा राजकीय विचार एकूण 'मानवताशाही'चाही गंभीर, मौलिक आणि कळकळीचा विचार ठरतो.

५

# डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार

"आर्थिक स्वातंत्र्यासाठी झगडा करणाऱ्या लोकांविरुद्ध संपत्तीचा दुरुपयोग करणे हा धर्म आहे काय?"
(बहिष्कृत भारत : २३-१२-२७)-डॉ. आंबेडकर

---

डॉ. आंबेडकरांचे सर्वांगीण आणि मूलभूत अर्थचिंतन त्यांच्या The Evolution of Provincial Finance in India, The Problem of Rupee आणि States and Minorities या ग्रंथांमधून मुख्यत्वे सिद्ध झाले आहे. या अर्थचिंतनाने डॉ. आंबेडकरांना जागतिक कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ म्हणून मान्यता मिळवून दिली आहे.

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही नैतिक मूल्ये ज्या समाजात आहेत ते जीवन म्हणजे लोकशाही होय. डॉ. आंबेडकरांच्या मते लोकशाही हा केवळ शासनप्रकार नव्हे. लोकशाही हे 'सर्वजनहिताय-सर्वजनसुखाय' अशा समाजसंस्थेचेच नाव आहे. ती मानवतावादी जीवनप्रणाली होय. माणसाच्या संपूर्ण प्रतिष्ठेच्या ध्येयाने स्पंदित झालेली लोकशाही त्यांना राजकीय लोकशाही, सामाजिक लोकशाही आणि आर्थिक लोकशाही अशा समग्र जीवनांगांना बंधुत्वाने नियंत्रित करणाऱ्या जीवनपद्धतीच्या रूपात भावली होती. राजकीय लोकशाहीकडून सामाजिक व आर्थिक लोकशाहीकडे जाणे हे ध्येय त्यांनी भारतीय समाजापुढे ठेवले. कारण सामाजिक व आर्थिक लोकशाहीशिवाय राजकीय लोकशाही खऱ्या अर्थाने अस्तित्वात असू शकत

नाही. श्रेणीयुक्त विषमतेतून येथील शोषितांना मुक्त करण्याचा एक विवेकनिष्ठ उपाय असे बाबासाहेबांच्या लोकशाही समाजवादाचे स्वरूप आहे. श्रीमंत–गरीब, उच्च–नीच, मालक–मजूर अशी भेदावर आधारलेली समाजरचना अन्याय्य आहे. ती बदलण्यासाठी या देशातील अर्थव्यवस्थेची पुनर्रचना केली पाहिजे असे डॉ. आंबेडकरांचे आग्रही प्रतिपादन आहे. उद्योगधंदे, शेती व विम्याचे राष्ट्रीयीकरण याद्वारे त्यांनी ही पुनर्रचना सांगितली. जाती आणि वर्ग यांनाही या मार्गाने मोडीत काढता येते. व्यक्तीची प्रतिष्ठा व व्यक्तीची सामाजिक जबाबदारी यात समतोल निर्माण करता येतो हे त्यांनी सांगितले. घटनेद्वारे आंबेडकर या देशातील उपेक्षितांच्या हिताची अर्थव्यवस्था निश्चित करू पाहत होते. लोकशाही समाजवाद ह्या ध्येयवादाचे त्यांची आर्थिक लोकशाहीची संकल्पना हे एक अंग होय.

बहिष्कृत भारताच्या आर्थिक स्वातंत्र्याची बाजू डॉ. आंबेडकर घेतात. संपत्तीचा उपयोग शोषितांना दडपण्यासाठी व त्यांचे बंधमुक्तीचे लढे चिरडण्यासाठी होऊ नये. बाबासाहेब म्हणतात," संपत्ती ही राष्ट्राच्या भरभराटीस मोठी कारणीभूत अशी वस्तू आहे. या दृष्टीने तिचा संग्रह करणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु संपत्तीचा उपयोग गरीब प्रजेस जखडून ठेवण्याकडे आणि आपली प्रौढी व वर्चस्व वाढविण्याकडे जेव्हा संपत्तीवान करतात..."[१] तेव्हा तिला "आसुरी संपत्ती" म्हणायला हवे. संपत्तीचा उपयोग गोरगरिबांना दारिद्र्याच्या खाईत लोटण्यासाठी करणे हे आसुरी कृत्य होय. त्यामुळे राष्ट्राचा घात होईल. राष्ट्रातील संपत्ती दुर्बल घटकांसाठी कशी वापरली जाते त्यावरून त्या संपत्तीची महत्ता ठरते. आणि "आर्थिक स्वातंत्र्यासाठी झगडा करणाऱ्या लोकांविरुद्ध संपत्तीचा दुरुपयोग करणे..."[२] हा धर्म नव्हे असे येथील धर्माचा देखावा करीत निर्लज्जपणे शोषण करणाऱ्या दांभिक लोकांना ते ठणकावून बजावतात. येथील चिमूटभर भांडवलदारांच्या हातात देशाच्या आर्थिक नाड्या आहेत. सामान्य जनता त्यामुळे आर्थिकदृष्ट्या पशूपातळीवरचे जिणे जगत आहे. भयानक

(१) भी. रा. आंबेडकर, **बहिष्कृत भारतातील अग्रलेख** :(२३–१२–२७) संपादक रत्नाकर गणवीर, नागपूर १९७६, पृ. १९४. (२) तत्रैव २३-१२-२७.

आर्थिक दरी या देशात निर्माण झाली आहे म्हणून बाबासाहेबांनी States and Minorities मध्ये उद्योग, शेती आणि विमा यांचे राष्ट्रीयीकरण पुरस्कारले. राज्य समाजवाद मांडला. या मार्गाने देशातील आर्थिक संतुलन साधेल साधेल, आर्थिक अमानुष विषमता नष्ट होईल ही खात्री त्यांना होती.

**अस्पृश्यांना स्वतंत्र करणारा अर्थविचार :**

अस्पृश्यांच्या स्वातंत्र्याची चळवळ स्पृश्य समाज बहिष्काराने दाबण्याचा प्रयत्न करतो. पण अस्पृश्यांची उपजीविका स्पृश्यांच्या हातात आहे ते त्यांचा आश्रय बंद करू शकतील. पण अस्पृश्यांच्याही हातात काही शस्त्रे आहेत. बाबासाहेब बहिष्काराचे शस्त्र त्यामुळे बहिष्कार टाकणाऱ्यावरही कसे उलटवता येते ते सांगताना म्हणतात, "बहिष्काराने जर शत्रूला धाक बसतो, असे असेल तर त्याच्यासारखे इतरास वठणीवर आणण्याचे दुसरे महान शस्त्र नाही. परंतु त्या शस्त्राची अशी विचित्र गती आहे की, त्याच्या माऱ्याने शत्रूंबरोबर स्वतःलाही घाव होतो."[३] पण खरे तर असे आहे की अस्पृश्य समाज परोपजीवी नाही. स्पृश्य समाज त्याचे पोषण करतो हे खोटे आहे. विनिमयावर आधारलेल्या समाजात कोणी कोणावर उपकार करीत नसतो. मी तुला चाकरी दिली, तू काही माझ्यावर उपकार करीत नाहीस असे धनी नोकराला दिमाखाने म्हणेल पण पण तू सुद्धा माझ्यावर उपकार करीत नाही असे नोकर धन्याला ठासून सांगू शकतो. बहिष्कार टाकल्याने मालकही कसे हवालदिल होतील हे सांगताना बाबासाहेब म्हणतात– "धन्याने संबंध तोडला तर नोकर हवालदिल होतील, पण नोकराने संबंध तोडला तर जवळ पैका असूनही धन्याची कुचंबणा होईल. एकूण एकाला दुसऱ्याची जरूरी भासते...[४] स्वार्थावर उभा असलेला हा संबंध सहज तोडता येत नाही असेच स्पृश्य व अस्पृश्य यांच्यासंबंधी म्हणता येते. अस्पृश्य स्पृश्यांची नोकरी त्यांना उपकृत करण्यासाठी करितो असे म्हणत नाही. तशी त्यांना आपण पोसतो अशी स्पृश्यांनीही घमेंड मारू नये. या संबंधात स्वार्थ आहे. "एकमेकांवाचून अडते म्हणून दोघेही परस्पराव-

(३) तत्रैव २३-१२-२७. (४) तत्रैव २३-१२-२७,

लंबी आहेत. अशा व्यवस्थेने सांधलेल्या लोकांना परस्परावर बहिष्कार टाकणे शक्य नाही व टाकलाच तर तो फार दिवस टिकणे अशक्य आहे."[५] याप्रकारे आपल्या शक्तीची जाणीव डॉ. आंबेडकर अस्पृश्यांना करून देतात.

पण असे असले तरी साधन संपन्नांशी मुकाबला करताना गरिबांना जड जाते. 'समर्थाशी द्वंद्व बांधुनी मग कोठे तगावे?' अशी भ्रांत पडते. म्हणून अस्पृश्यांनी स्वावलंबी व्हावे. अस्पृश्यांनी "...वतनी नोकरी अजिबात सोडून द्यावी. म्हणजे एका दमात स्पृश्याधीन व स्पृश्यावलंबी झालेली महार प्रजा आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होईल."[६] असे ते सांगतात. असे झाले तर भीष्म, द्रोण व शल्य पांडवांची बाजू सत्याची असून केवळ अर्थदास्यामुळे कौरवांच्या बाजूने लढतात. युधिष्ठिराजवळ 'अर्थस्य पुरुषो दासो...', मनुष्य अर्थाचा (पैशाचा) गुलाम आहे अशी खजील कबुली देतात. तसे म्हणण्याची पाळी अस्पृश्यांवर येऊ नये म्हणून त्यांनी वतन-मुक्त होणे आवश्यक आहे पण असे झाले तर मांग, चांभार व भंगी या धंदेवाईक जाती असल्याने त्यांच्यावर गंडांतर यायचे नाही.

चांभार व ढोर या धंदेवाईक जाती आहेत. त्यांनी नवीन जोडे बांधावयाचे व जुने जोडे सांधावयाचे बंद केले तर स्पृश्यांचे चालणार नाही.

मांगांचेही तसेच आहे. दोऱ्या, दोरखंड व केरसुण्या करण्याचे त्यांनी बंद केले तर स्पृश्यांचे अडून बसेल. शिवाय बैलाला व मोटेला नाडा ही महत्त्वाची आयुधे त्यांच्या हातात आहेत.

भंगीही मनात आणले तर रोगाचे सत्र सर्व शहरात पसरवून ते वस्ती नामशेष करू शकतात.

महारांना काय तो स्वजातीचा धंदा नाही. या अर्थाने ते "अगदी शेवटच्या पायरीचे का होईनात पण राजपुरुषच आहेत."[७] ते केवळ सरकारी नोकरीवर अवलंबून असतात आणि स्पृश्य अधिकाऱ्यांच्या हाता-खालीच त्यांना काम करावे लागते त्यामुळे स्पृश्यांची खाजगी कामे ही

(५) तत्रैव २३-१२-२७,
(६) तत्रैव २३-१२-२७. (७) तत्रैव २३-१२-२७

त्यांना करावी लागतात. ती केली नाहीतर स्पृश्य त्याचे रेकॉर्ड खराब करतात. नोकरीबद्दल मिळणारा पगार स्पृश्य लोकांकरवी मिळतो. त्यांचा "पगार म्हणजे बलुते."[८] तर याप्रमाणे महार जमात स्पृश्यावलंबी झाली आहे. या स्पृशावलंबनामुळे त्यांचे किती भयानक शोषण होते त्याचे मोठे प्रत्ययकारी चित्र बाबासाहेबांनी काढले आहे. पगार प्रत्यक्ष शासनाने दिला तर हे शोषण थांबू शकते. पण वतन सोडले तर पोट कसे भरायचे या प्रश्नाचे उत्तर बाबासाहेबांनी पुढीलप्रमाणे दोन सूचनांद्वारे दिले आहे.
(१) महारांनी आपल्या निराळ्या वसाहती कराव्यात प्रत्येक गावात पाच दहा घरे महारांची असतात त्यामुळे त्यांना अन्याय भोगावा लागतो. त्यामुळे अनेक गावातील या दहा-पाच घराच्या महारांनी मिळून जेथे फॉरेस्ट जमिनी आहे तेथे वसाहत करावी. शेतीचे इथे भरपूर उत्पन्न त्यांना येईल, विकासाचे अनेक मार्ग मोकळे होतील. ते पाटील होऊ शकतील. किराणा मालाचे दुकान चालता येईल. शिवाय शिवाशिवीच्या अपमानापासून ते मुक्त होतील. शिवाशिवीमुळे लहान मुलांच्या मनात न्यूनगंड तयार होतो. त्यामुळे ते जीवनात कर्तृत्व करू शकत नाहीत. या वस्तीत मुले निर्भय वाढतील. ती मनाने दुबळी होणार नाहीत. पण असे घडण्यासाठी (१) सरकारची मदत व (२) गाव सोडण्याची महार जमातीची तयारी पाहिजे. याप्रकारे स्वतंत्र वसाहतीची संकल्पना मांडून बाबासाहेब अस्पृश्यांच्या मानसिक गुलामगिरीवरच आघात करीत होते.

(२) शक्य असेल त्यांनी शेती करावी, उरलेल्यांनी खादी विणणे व विकणे हा धंदा करावा. ती जर स्पृश्यांनी घेतली नाही तर सर्व महार लोकांनी खादी वापरावी. इतरांची खादी घेऊ नये. एवढे झाले तर हा धंदा महारांना पोट भरण्याची हमी देऊ शकतो. "महार लोकांना जर आपली माणुसकी मिळवायची असली तर त्यांनी रयतेच्या गुलामगिरीतून मुक्त झाले पाहिजे आणि त्यांना मुक्त व्हावयाचे असेल तर त्यांना वरील गोष्टी एक निश्चयाने करावयास पाहिजे."[९] असे त्यांनी निर्वाणीच्या शब्दात सांगितले.

---

(८) तत्रैव. २३-१२-२७. (९) तत्रैव २३-१२-२७

## खोती ही शेतकऱ्यांची गुलामगिरीच !

आपला देश कृषिप्रधान, खेड्यांचा. येथील बहुतांशी शेतकरी गरीब. त्याची स्थिती अत्यंत हलाखीची. पण खोतीची पद्धती मुख्यत्वे रत्नागिरी व कुलाबा या जिल्ह्यांमध्ये आहे त्यामुळे तेथील शेतकरी तडफ, स्वाभिमान, हिंमत इत्यादी गुण गमावून बसला आहे.

खोत : हा गावाचा छोटासा सुलतानच असतो. खोती घराण्यातील अनेकांमध्ये वाटलेली असते तेव्हा तर अनेक सुलतानांकडून शेतकऱ्याला छळ सोसावा लागतो. रयतवारी पद्धतीत फक्त सरकारी देणे द्यावे लागते. खोतीपद्धतीत सरकारी देण्याशिवाय खोतांनाही देणे द्यावे लागते. शिवाय नानाप्रकारे हे खोत कुळांकडून पैसे लुबाडतात. शिवाय दिल्याची कोणती पावती दिली जात नसल्याने कुळाची शेंडी सतत खोताच्या हातात असते. त्यामुळे केव्हाही, केवढीही बाकी खोत कुळाकडून वसूल करायला मोकळा असतो. ब्राह्मण खोत त्याचे फणस भोपळे ठेवीत नाही. मराठा मुसलमान खोत कोंबड्या बाकी ठेवीत नाही. शेतकऱ्याच्या घरचे सर्व खोताच्या मालकीचे असते ही तेथील 'धारेबंदीची खास पद्धती '[१०] होय. कुळाने कुरकुर केली तर खोत पोलीस पाटील असल्याने त्यांची गुरे कोंडवाड्यात घातली जातात.

शिवाय खाजगी जमिनींची लागवडही खोत या कुळांकडून वेठीने करून घेतात. "शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण मिळू नये यासाठी खोत हरप्रयत्न करीत असतात. कारण शेतकरी लिहावयास व वाचावयास शिकले तर आपली सुलतानी अशीच चालू देणार नाहीत याची त्यांना खात्री असते."[११] शिवाय तो इतरही सामाजिक जुलूम करतो. कुणब्याला लंगोटी नेसणे भाग पडते. त्याच्या बायकोला विशिष्ट पद्धतीनेच लुगडे नेसावे लागते. बाबासाहेब म्हणतात अस्पृश्य आणि हे जुलूमग्रस्त कुणबी हे समदु:खी आहेत. "माणुसकीला लांच्छनास्पद अशी ही गुलामगिरी या विसाव्या शतकात चालू असावी. ही खरोखरच हिंदी समाजाला मोठ्या

---

(१०) तत्रैव, ३-५-२९, (११) तत्रैव, ३-५-२९

शरमेची गोष्ट आहे."[११] असे ते संतापून म्हणतात. शेतकऱ्यांच्या शोषणाचा प्रश्न त्यांनी मानवी हक्काच्या पातळीवरून चर्चेला घेतला. खोती नष्ट व्हावी. गरीब शेतकरी स्वतंत्र व्हावा हा त्यामागचा ध्यास होता.

**शेतसाऱ्याचा प्रश्न**

त्याकाळी सरकारी शेतसाऱ्याचे प्रमाण शेतीउत्पन्नाच्या तुलनेत अधिक असल्याने शेतकऱ्यावर जुलूम होतो व उत्पन्न झाले नाही तरी त्याला शेतसारा भरावा लागतोच असे प्रश्न चर्चिले जात असत. पण बाबासाहेबांनी शेतीच्या उत्पन्नावर शेतसारा बसविणे अन्याय्य ठरविले. श्रीमंत शेतकरी व अल्पभूधारक गरीब शेतकरी शेकडा रु. २५ म्हणजे समप्रमाणात शेतसारा देतात यात बाबासाहेबांना आर्थिक विसंवाद दिसतो. त्यांच्या मते श्रीमंत शेतकऱ्याकडून घ्यावयाच्या शेतसाऱ्याचे प्रमाण अधिक असावे. गरीब शेतकऱ्याकडून कमी सारा घ्यावा. हीच पद्धती समतेची राहील. त्यांनी दुसऱ्या संदर्भात म्हटल्यानुसार "जेथे सर्व व्यक्ती समान आहेत तेथे काही व्यक्तींना असमानतेने वागविल्यास विषमता उत्पन्न होईल पण जेथे व्यक्ती असमान आहेत तेथे त्यांना सारख्या लेखून चालणे म्हणजे समताप्रस्थापनेच्या ध्येयाला विरोध करणे होय."[१३] दुसरे असे की त्यांनी गरीब शेतकऱ्यांच्या हिताखातर, त्याला शेतसाऱ्यातून सूट मिळवून देण्याच्या दृष्टीने "शेतसारा हा इन्कम टॅक्सच्या कायद्याखाली आणला पाहिजे."[१४] हाही नवा विचार मांडला. पुढे जाऊन सर्व शेतीचे त्यांनी राष्ट्रीयीकरण सांगितले. उद्योगधंद्यांची वाढ भांडवलदार करू शकणार नाही. तेव्हा शासनाने त्यांचा विकास करावा. त्याचे राष्ट्रीयीकरण करावे State and Minorities मध्ये त्यांनी आधुनिक ज्ञानविज्ञान डोळ्यापुढे ठेवून लोकशाही समाजवादाचे भव्य स्वप्न उभारले. आर्थिक लोकशाहीची पूर्ण मांडणी केली. ही मांडणी क्रांतीच्या वाटा चालण्याच्या दृष्टीने या देशाला अत्यंत फलदायी आहे. बाबासाहेबांचे हे अर्थचिंतन उपेक्षित–पीडित मानवतेच्या उत्थानाच्या प्रतिज्ञा उरात वागविणारे चिंतन आहे.

---

(१२) तत्रैव ३–५–२९ (१३) तत्रैव १–२–२९ (१४) भी. रा. आंबेडकर : "शेतसाऱ्याचा प्रश्न", केसरी २४–२–१९३९

## ६

# डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक विचार

"उपासमारीने शरिराचे पोषण कमी झाल्यास माणूस हीनबल होऊन अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणाचे अभावी निर्बुद्ध राहिल्यास तो जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो." (ब. भा. १५–७–२७)

—डॉ. आंबेडकर.

---

"खालच्या वर्गाची ज्याच्यामुळे प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागले, तो न्यूनगंड त्यांच्यापासून नाहीसा करणे, चालू समाज–पद्धतीमुळे जे त्यांचे जीवन लुबाडण्यात आले त्याचे त्यांच्या स्वतःच्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने काय महत्त्व आहे याची त्यांना जाणीव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज दुसऱ्या कशानेच हे साध्य होणार नाही. आमच्या सर्व सामाजिक दुखण्या-वर माझ्या मताप्रमाणे हेच औषध आहे." (जनता : २२ सप्टेम्बर, ५१)

शिक्षणाला दलितांच्या जीवनात असे मूलगामी स्थान देणारे आणि शिक्षणाला औषध मानणारे डॉ. आंबेडकर हे अनन्यसाधारण असे शिक्षण-महर्षी होते. शिक्षण हा त्यांच्या आयुष्याचा ध्येयवाद झाला होता. ज्ञान हे त्यांच्या आयुष्याचे प्रयोजन झाले होते. विद्या ही त्यांच्या आयुष्याची साधना झाली होती. शिक्षण ही शक्तींची शक्ती होय विद्या ही शस्त्रांचे शस्त्र होय. त्यामुळेच बाबासाहेबांचा समाजक्रांतीचा विचार शिक्षणापासून सुरू होतो. 'शिका, संघटित व्हा. संघर्ष करा' या त्रिशरणातील शिक्षण

प्रथम क्रमांकावर आहे. बाबासाहेबांच्या वरील महावाक्याने शिक्षणाची अनन्य महती गाऊन ठेवलेली आहे. तिचे महत्त्व आपल्या समाजाच्या विषमतेच्या इतिहासाच्या पार्श्वभूमीवर विशेषत्वाने लक्षात येते. आपल्या समाजात पूर्वी शिक्षणाचा अधिकार केवळ ब्राह्मण वर्णाला होता. बाकीच्या सर्वांना शिक्षणापासून वंचित राहावे लागले. हे हजारो वर्षे घडले. वर्णव्यवस्थेमुळे या स्थितीत कधी बदल झाला नाही. हे कोणत्या हेतूने झाले ते बाबासाहेब सांगतात : "पुरुषापुरुषात सर्वत्र स्पर्धा चालू आहे, तशी ती हिंदुस्थानातही चालू आहे. अशी स्पर्धा चालू नये म्हणून तर वर्णाश्रम धर्माची कल्पना अस्तित्वात आली अशी आमची ठाम समजूत आहे. ब्राह्मणाच्या पदाची अभिलाषा धरून क्षत्रियांनी त्यांच्यावर मात करू नये. क्षत्रिय होण्याची महत्त्वाकांक्षा धरून वैश्यांनी व शूद्रांनी त्यांच्यात झगडा करू नये, अतिशूद्रांनी तर देतील त्यावर आपले कार्य भागवावे, एकमेकांच्या पदाला एकमेकांकडून धक्का लागू नये व त्याचे पद अचल व अढळ राहावे वर्णाश्रम धर्माचा मुख्य हेतू आहे."[१] आणि मानवतेला अपमानित करणारी आणि या देशाला पांगळे करणारी अन्याय्य समाजरचना उलथून टाकायची असेल तर शिक्षण हे क्रांतीचे पहिले प्रकरण आहे असे बाबासाहेबांना वाटत असे. त्यामुळेच "शिका" पासून त्यांनी प्रारंभ केला कारण संघटनही त्याशिवाय नाही. संघर्षही नाही. "विद्येविना मति गेली; मतीविना नीति गेली; नीतीविना गति गेली ! गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले."[२] या देशात शिक्षणाअभावी शूद्रातिशूद्रांचा सर्वनाश कसा झाला ते फुल्यांना नेमके दिसले होते. बाबासाहेबांनाही हे सत्य दिसले होते. ते म्हणतात-" **उपासमारीने शरिराचे पोषण कमी झाल्यास माणूस हीनबल होऊन अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणाच्याअभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी**

---

(१) भी रा. आंबेडकर : **बहिष्कृत भारतातील स्फुटलेख,** संपा. रत्नाकर गणवीर, नागपूर, १९८१ पृ. ७६, (२) जोतीराव फुले : **महात्मा फुले : समग्र वाङ्मय,** संपा मालशे-कीर मुंबई, १९६९; पृ. १८९.

दुसऱ्याचा गुलाम बनतो."[३] त्यामुळेच शिक्षणापासून त्यांनी आपल्या क्रांती-कार्याला प्रारंभ केला. पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून दलितांमध्ये शिकण्याची जिद्द निर्माण केली सिद्धार्थ कॉलेज, मिलिंद कॉलेज आणि त्यांच्या नावाने महाराष्ट्रभर झालेली मुंबई, महाड, औरंगाबाद, नागपूर, ब्रह्मपुरी, चंद्रपूर इ. ठिकाणी सुरू असलेली महाविद्यालये असे शिक्षणाचे जाळे त्यांच्यामुळे पसरले. त्यांच्या शैक्षणिक कार्याने येथील बहिष्कृत समाज मनुष्यतेच्या व सुसंकृतपणाच्या वाटा चालू लागला. त्यांच्या शैक्षणिक विचारांनी परिवर्तनाची संघर्षशील प्रेरणा निर्माण केली.

शिक्षणाने परिवर्तन होते. जीवनाच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक अशा सर्वच अंगांमध्ये शिक्षणामुळे परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होते. ती वेगवान होते. नवी मूल्ये, नव्या जाणिवा, नवा समाज घडविणारी शक्ती म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. शिक्षणामुळे स्वत्व, सत्व आणि स्वातंत्र्याचे भान प्रखर होते. मानवी अस्तित्वाचा जन्म शिक्षणाच्या पोटी होतो पण हेच शिक्षण माणसाला मिळाले नाही आणि तो निर्बुद्ध राहिला तर तो 'जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम बनतो.' असे शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर अधोरेखित करतात.

शतकानुशतके शिक्षण हा ब्राह्मणांचा धंदा झालेला आहे. इतर जातीचा तो धंदा होऊ शकला नाही कारण ब्राह्मण शिक्षण घेतात. त्यांनाच शिक्षणाचे अधिकार धर्माने दिले आहेत. इतर वर्ग शिक्षण घेत नाहीत कारण परंपरेने त्यांना शिक्षणास बंदी घातली होती. शिक्षण घ्या म्हटले की अब्राह्मण लोकांकडून 'आम्हाला काय ब्राह्मण व्हावयाचे आहे?' असे उत्तर मिळते. आणि शिक्षण घ्यायची इच्छाही झाली तरी अब्राह्मणांची ही इच्छा गरिबीमुळे सफल होत नाही. शाळेत घातलेल्या मुलांचे दुहेरी ओझे आईबापावर पडते. तो मुलगा जे काम करीत असतो त्याबद्दल येणारा पैसा थांबतो. उलट त्यालाच आयते पोसावे लागते आणि

(३) भी. रा. आंबेडकर : **बहिष्कृत भारतातील अग्रलेख**, (१५-७-२७) संपा. रत्नाकर गणवीर, नागपूर १९७६ पृ. १२०.

एवढेच नव्हे तर शिक्षणासाठी खर्चही करावा लागतो. "म्हणजे शिक्षणाच्या पायी कमाईची आयात बंद होऊन खर्चाच्या निर्गतीला मात्र सुरुवात होते. यामुळे हातावर कमवून जीवित कंठणाऱ्या आईबापांना खर्चाचा बोजा झेपत नाही व म्हणून त्यांची प्रजा पिढ्यान्‌पिढ्या अज्ञानाच्या गर्तेत खितपत पडलेली असते..."[४] बाबासाहेबांना ही अवस्था कितीही क्षम्य असली तरी विघातक वाटते. वर्णांकित समाजात व्यक्तिस्वातंत्र्य नसते. अशा समाजात शेवटचा घटक वर्ण असतो. व्यक्ती तिथे अस्तित्वातच नसते. म्हणूनच अशा समाजाची प्रगती खुंटते. ते राष्ट्र दुबळे होते. व्यक्तिस्वातंत्र्य हे मूल्य केवळ व्यक्तीच्याच सर्वांगीण विकासाचे द्योतक नाही तर राष्ट्राच्याही उत्थानाचे द्योतक आहे. म्हणूनच बाबासाहेबांनी " व्यक्तिस्वातंत्र्याची आवश्यकता जर मान्य असेल तर दरेक व्यक्तीच्या ठायी आपले स्वातंत्र्य रक्षण करण्याची शक्ती उत्पन्न होणे अत्यंत जरूर आहे व ती शिक्षणाशिवाय उत्पन्न होऊ शकत नाही."[५] या शब्दात स्पष्ट बजावले आहे. शिक्षण या प्रकारे बाबासाहेबांच्या मते गुलामीच्या निर्मूलनाचे, आणि स्वातंत्र्याच्या संगोपनाचे शक्तिशाली हत्यार आहे. हे भान असल्यानेच १९३१ साली भागोजी कीरांनी रत्नागिरी येथे अस्पृश्यांसाठी वेगळे पतितपावन 'मंदिर' बांधले तेव्हा त्यातील गडबडी लक्षात घेऊन किरांनी आपला पैसा असा खर्च करण्याऐवजी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी खर्च करून सत्कारणी लावावा[६] असे त्यांनी म्हटले होते.

**शिक्षण आणि शासनाची जबाबदारी**

शैक्षणिक क्षेत्र शासनाच्या ताब्यात असावे. शिक्षणसंस्था शासनाने चालवाव्या असे बाबासाहेबांना वाटे. डॉ. परांजपे शिक्षणमंत्री असताना १९२० चा पंधराव्या कायद्यानुसार मुंबई शहरातील प्राथमिक शिक्षण मुंबई म्युनिसिपालिटीच्या ताब्यात देण्यात आले तर १९२३ च्या

(४) तत्रैव १५-७-२७ (५) तत्रैव १५-७-२७, (६) भी. रा. आंबेडकर, **बहिष्कृत भारतातील डॉ. आंबेडकरांचे स्फुट लेख**, संपा.- रत्नाकर गणवीर, नागपूर १९८१ पृ. १९०.

चौथ्या कायद्यानुसार जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण स्थानिक म्युनिसिपालिटया आणि लोकल बोर्डे यांच्याकडे सोपवून देण्यात आले. बाबासाहेबांना हा सर्वच प्रकार अत्यंत नादानपणाचा वाटला आहे. ज्या राजकारणी पुरुषाने हे केले त्याला ते खुळा म्हणतात. कारण शिक्षणाचे त्यामुळे वाटोळे होईल. शिक्षण क्षेत्रात भ्रष्टाचार माजेल. अस्थिरता आणि हुकुमशाही निर्माण होईल असे बाबासाहेबांचे मत होते. आज याचे प्रत्यंतर भोवती आपणास येतेच. प्राथमिक शिक्षण हा अस्पृश्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न असून त्यांनाच सर्वापेक्षा शिक्षणाची जास्त गरज आहे. पण अस्पृश्यांच्या शिक्षणाची प्रक्रिया शासनाच्या अख्त्यारीतून शिक्षण गेले तर थांबेल. कारण "**ही लोकल बोर्डे आणि म्युनिसिपालिटया म्हणजे** वर्णाश्रमवाद्यांच्या संस्था आहेत, कारण त्यांच्यात जो भरणा होणार तो ब्राह्मण्यग्रस्त अज्ञ जनतेचाच होणार. असे लोक अस्पृश्य जनतेच्या शिक्षणाची काळजी घेतील हे कशावरून सांगता येईल ?"[७] अतएव प्राथमिक शिक्षण लोकल बोर्ड व म्युनिसिपालिटया यांच्याकडून काढून घेण्यात यावे असे परखड शब्दात त्यांनी सांगितले. सार्वत्रिक शिक्षणाच्या कायद्याची योग्य अंमलबजावणी व सवलती या संदर्भात शिक्षणयंत्रणेवर शासनाची सत्ता असावी. सर्वांना शिक्षण मिळावे एवढेच नव्हे तर "मागासलेपणामुळे जर सवलती द्यावयाच्या तर जे जास्त मागासलेले त्यांना जास्त सवलती मिळावयास पाहिजे." (ब. भा. अग्रलेख : १५-७-२७) "जेथे सर्व लोक सारख्या सपाटीत असतील तेथे त्यांना सारख्या रीतीने वागविण्यास हरकत नाही. नव्हे ते योग्यच होईल. पण जेथे मुळातच लोक असमान आहेत तेथे त्यांना समानतेने वागविणे अन्याय होणार आहे. यास्तव प्रजेतील सर्व जनांना सारख्या सपाटीवर आणणे ही जर सरकारच्या धोरणाची दिशा असेल तर जे वर्ग सपाटीच्या खाली असतील त्यांना विशेष सवलत देऊन वर आणणे ह्यातच न्याय आहे"[८] आणि सरकारने ही भूमिका अंगिकारावी असे डॉ. आंबेडकरांना वाटते. सार्वत्रिक शिक्षणाचा प्रश्न तुटक तुटक रीतीने सोडविण्याचा प्रश्न

(७) उनि. ब. भा. अग्रलेख, १५-७-२७ (८) तत्रैव १५-७-२७.

नव्हे. तो एकसूत्री धोरणानेच सोडविण्यात आला पाहिजे एवढेच नव्हे तर शिक्षणात सर्व प्रान्तांची समप्रमाणात प्रगती झाली पाहिजे. प्रांतिक सरकारांना निरक्षरतेच्या निर्मूलनाची, शिक्षणातील समतोल साधण्याची जबाबदारी टाळणे राष्ट्रहितदृष्ट्या योग्य व्हायचे नाही असे बाबासाहेबांना वाटते. गरीब जिल्ह्यांना केवळ आपल्या बळावर सक्तीच्या शिक्षणाची योजना राबविता यायची नाही म्हणून प्रांतिक सरकारांनी ही जबाबदारी घ्यावी व हिंदुस्थान सरकारची या कार्यात मदत असावी. यामुळे पूर्ण राष्ट्रात एक समतोल-संवाद राखता येईल असे त्यांना वाटते.

**शिक्षक व प्राथमिक शिक्षण**

"प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार सर्वांगीण राष्ट्रीय प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. केवळ लोकांच्या खुषीवर हा प्रश्न सोपविल्यास प्राथमिक शिक्षणाचा प्रसार होण्यास कैक शतके लागतील." म्हणून बाबासाहेबांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा पुरस्कार केला. 'जे वर्ग आधीच शिक्षणाचा लाभ घेतात, त्यांच्यावर शिक्षणासाठी अर्थातच सक्ती करावी लागत नाही.' म्हणून ज्यांना शिक्षणाचे महत्त्व कळत नाही, शिक्षणासंबंधी जे उदासीन असतात व जे मागासलेले आहेत त्यांच्यासाठी सक्तीच्या शिक्षणाची गरज असते अशी दुर्बलांच्या उत्थानाची मानवतावादी भूमिका बाबासाहेब घेतात. अशीच भूमिका १८८२ साली फुल्यांनी, १८९० साली आगरकरांनी, १९१० साली ना. गोखल्यांनी व १९२० साली सी. ना. शिवतरकर यांनी घेतलेली होती. पण यापुढे जाऊन बाबासाहेब म्हणतात की इंग्लंडमधील सक्तीच्या शिक्षणाचा उपक्रम सुरू झाला तेव्हा तिथे प्राथमिक शिक्षण सर्वांना मोफत नव्हते, त्याप्रमाणे आपल्याकडेही सर्वांना मोफत शिक्षण ठेवण्याची आवश्यकता नाही. "ज्यांना फी देण्याचे सामर्थ्य आहे त्यांच्याकडून ती घेण्यात काही पाप नाही की अन्याय नाही."[९] उलट या मिळकतीतून सक्तीच्या शिक्षणाचा उपक्रम राबविण्यास शासनाला मदत होईल. याशिवाय "सक्तीच्या शिक्षणाचा जादा खर्च भागविण्यास लोकांवर नवीन कर बसविले

(९) तत्रैव, ३१ मे २९

पाहिजेत."[१०] अशी रास्त व दूरदर्शिपणाची भूमिका ते घेतात. या भूमिकेमागे राष्ट्राच्या समतोलाची, मानवतावादाची आणि बहिष्कृतांच्या उत्थानाची प्रेरणा उभी आहे. शिक्षणक्षेत्र पवित्र, स्वतंत्र आणि मागासलेल्या व अल्पसंख्याक लोकांच्या हितसंबंधाचे रक्षण करणारे असावे. ज्यांचा संबंध नाही, शिक्षण, शिक्षणाचे ध्येय यांची गंधवार्ता नाही अशा स्वार्थी, भ्रष्टाचारी व व्यापारी अर्थात अपात्र लोकांच्या हातात ते जाऊ नये. आजही आपण बघतोच की शिक्षणाशी संबंध नसताना कमाईच्या उद्दिष्टाने अनेक लोक शाळा काढतात. परिणामी शिक्षकाला गुलाम व विद्यार्थ्यांना त्यांच्या कमाईचे साधन व्हावे लागते. हे त्याकाळीही बाबासाहेबांना जाणवले होते. म्हणून त्यांनी परखडपणे बजावून ठेवले आहे की, "शिक्षण ही बाब रस्ते बांधणे, गटार साफ ठेवणे वगैरे बाबींपेक्षा निराळ्या प्रकारची आहे. बारभाईचा कारभार तेथे उपयोगी नाही. प्रांतिक स्वायत्तता मागा आणि राष्ट्रीय दृष्टीने शिक्षणाचे धोरण ठरवा, आमची त्याला हरकत नाही. परंतु शिक्षणामध्ये एकसूत्रीपणा असला पाहिजे, शाळांचा कारभार शिस्तीने चालला पाहिजे आणि शिक्षण चोख असले पाहिजे. भलत्याच माणसांना शिक्षणामध्ये ढवळाढवळ करण्यास सवड मिळता कामा नये."[११] यातून शिक्षणातील नीतिमत्ता, शिस्त, सचोटी, पावित्र या गुणांचा आग्रह बाबासाहेब धरतात. शिक्षण हे विवेकपीठ आहे. ती परिवर्तनाची पाठशाळा आहे. शिक्षणावरील ताबा व सक्तीचे तत्त्व अंमलात आणण्याची जबाबदारी ही सक्तीच्या शिक्षणाच्या प्रश्नाची अंगे मानणारे बाबासाहेब "सध्याच्या युगात ज्या देशामधील बहुजनसमाज निरक्षर आहे, अशा देशाचा जीवनकलहात टिकाव लागायचा नाही.[१२]" याप्रकारे राष्ट्रोत्थानाचे शस्त्र म्हणून, ज्ञान आणि व्यक्ती विकास यांच्या साधनेचे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहतात. "...शाळेत मुलांची मने सुसंस्कृत करून त्यांना समाजहितास योग्य असे वळण लावावयाचे असते. शाळा म्हणजे उत्तम नागरिक तयार करण्याचे कारखाने आहेत."[१३] त्यांच्या मते देशाच्या

(१०) तत्रैव, ३१ मे २९ (११) तत्रैव ३१ मे २९
(१२) तत्रैव ३१ मे २९ (१३) उनि. ब. भा. स्फुट लेख. पृ. ४४.

विकासात हे स्थान शिक्षणाला आहे. त्यामुळेच १९२७ साली दादर यथील स्कूल कमिटीच्या शाळांमध्ये स्पृश्यांसाठी निराळे लोटे व अस्पृश्यांसाठी निराळे लोटे ठेवण्यात येत असल्याचे लक्षात येताच हा "माणुसकीस लज्जास्पद असा पक्षभेद"[१४] होय असे आंबेडकर चिडून म्हणाले.

पारंपरिक समाजरचना बदलण्यासाठी नव्या जाणिवेचा शिक्षक असावा असे बाबासाहेबांना वाटते. आपला शिक्षक परिवर्तनविन्मुख आहे. परंपरावादी आहे त्यामुळे समाज आणि शिक्षणक्षेत्र यांचे डबके झाले आहे. परंपरेने ज्ञानसाधना, ज्ञानसंवर्धन आणि ज्ञानदान ही कामे ब्राह्मणाची होती. पण ब्राह्मण सर्जनशील राहिला नाही. ज्ञान केवळ जुन्याची उजळणी ठरले. ज्ञान अवरुद्ध झाले. कारण ब्राह्मणाला त्याचा स्वार्थ साधल्यावर ज्ञानवृद्धी करायची गरज उरली नाही. प्रचलित पारंपरिक कुंठित समाजरचनेत त्याचे हित गुंतले असल्याने ब्राह्मण शिक्षक विद्यार्थ्याला परिवर्तनाची प्रेरणा देऊच शकत नाही. "...सामाजिकदृष्ट्या देखील शिक्षकवर्गात अस्पृश्य लोकांऐवजी ब्राह्मण लोकांचा भरणा होणे आमच्या मते अगदी अनिष्ट आहे. शिक्षक वर्ग हा राष्ट्रातील सारथी वर्ग आहे कारण त्यांच्या हाती शिक्षणाच्या दोऱ्या असतात. यास्तव शिक्षक कोण असावा यासारखा समाजहिताच्या दृष्टीने दुसरा महत्त्वाचा प्रश्न नाही. जे लोक इतरांना जनावरांपेक्षाही कमी लेखतात, इतरांबद्दल ज्यांच्या मनात सदैव तिरस्कार आणि इतरांच्या बुद्धिमत्तेबद्दल ज्यांच्या मनात सदैव शंका असते अशा लोकांच्या हाती शिक्षण देऊन समाजाचे वाटोळे आणखी किती दिवस करावयाचे ?...शाळा म्हणजे काही हिंदू उपहारगृह नव्हे की त्यांत ब्राह्मण भटारी ठेवला की भागले! ब्राह्मणांच्या हातचे अन्न जरी सर्वांना चालत असले तरी ब्राह्मणांच्या हातचे शिक्षण या काळात कोणासच चालणे शक्य नाही."[१५] असे कडक भाषेत त्यांनी सांगितले. तेव्हा समाज बदलण्यासाठी शैक्षणिक रचना आणि शिक्षक बदलला पाहिजे हे स्वच्छपणे डॉ. आंबेडकरांनी सांगितले. शिक्षक समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय व विज्ञानदृष्टी देणारा राष्ट्रातील सारथी असावा असे त्यांना वाटते.

(१४) तत्रैव पृ. ११६ (१५) तत्रैव पृ. ४४,

**प्राध्यापक**

महाविद्यालये व विद्यापीठे हे कारकून काढण्याचे कारखाने होऊ नयेत. राष्ट्राचे आदर्श नागरिक त्यांनी तयार करावे. विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास व त्यांच्या भावी जीवनाची उभारणी त्यांनी करावी. विद्यापीठाची पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्याला प्लेटो, बेकन, नित्से, स्पिनोझा अशा तत्त्वज्ञांच्या तत्त्वज्ञानाबद्दल अवाक्षरही माहीत नसते. "ज्या तत्त्वज्ञानाने नव्या जगाची उभारणी केली किंबहुना आजचा नवमानव आपल्या प्रत्येक दैनंदिन जीवनात ज्या तत्त्वज्ञानावर जगत आहे त्या थोर तत्त्वज्ञानाची उपेक्षा आजच्या पदवीधरांकडून व्हावी..."[१६] ही गोष्ट त्यांना भयंकर लाजीरवाणी वाटते. प्रत्यही बदलणाऱ्या मूल्यांची कास विद्यार्थ्यांनी धरावी. ती मूल्ये आचरणात आणावी. पण आज विद्यार्थ्यांची बौद्धिक व वैचारिक पातळी खालावत असल्याची खंत ते व्यक्त करतात. विद्यार्थ्यांना "...विद्येच्या अभ्यासाने नवी दृष्टी प्राप्त व्हावी आणि या दृष्टीतून त्यांनी खऱ्या जीवनमूल्यांचा शोध व बोध घ्यावा पण आजचे विद्यार्थी क्रीडेच्या आणि राजकारणाच्या फंदात ती दिव्यदृष्टी प्राप्त करून घेतच नाहीत."[१७] याचे त्यांना दुःख होते.

आपल्याकडील प्राध्यापकही त्यांना स्वयंप्रेरणेने विद्यादान करताना दिसत नाही. "शिक्षकाला लागणारी अंतःस्फूर्ती, विद्यादानाची हौस आणि त्यासाठी करावा लागणारा अव्याहत व्यासंग या सर्वांचीच त्यांच्याकडे वानवा असते. किंबहुना अध्यापक पेशाला जे नोकरीचे हिडीस स्वरूप आले आहे आणि तास भरून काढण्यासाठीच त्याला शिकवावे लागत असल्यामुळेच अध्यापकवर्गामध्ये शैथिल्य निर्माण झाले असावे व त्यामुळे अध्यापकही विचारप्रवर्तक ज्ञान पाजण्यास असमर्थ झाले आहेत."[१८] याप्रकारे प्राध्यापक व्यासंगी, विचारवंत आणि नवदिशाप्रवर्तक असावा ही त्यांची अपेक्षा आहे. गाईडस् लिहिणाऱ्या आणि वेतननिष्ठ प्राध्यापकांविषयी ते

(१६) भी. ग. आंबेडकर, **डॉ. आंबेडकरांची विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने**', संपा. डॉ. दुर्गे नागपूर, १९८७, पृ. ५३, (१७) तत्रैव, पृ. ५४–५५, (१८) तत्रैव पृ. ५५,

म्हणतात, "थोडेसे रुपये मिळवावेत व आपली सुखाने कालक्रमणा करावी यापलीकडे आपल्या प्रोफेसरांना आयुष्यात काही महत्त्वाकांक्षाच नाही. या महत्त्वाकांक्षेच्या अभावामुळेच त्यांच्या हातून काहीही भरीव कार्य होत नसावे. ते अधूनमधून काही पाठ्यपुस्तकांवर टिपणे लिहितात. टिपणे लिहिण्यापलीकडे, काही महत्त्वाचे कार्य आहे याची माहिती त्यांना आहे की नाही कोण जाणे!"[१९] हे आजच्या शिक्षणक्षेत्रातले भयानक चित्र आहे. प्राध्यापकांना विशेष अध्ययनक्षेत्र उपलब्ध करून द्यावे. त्यामुळे आपल्या विषयाचा सूक्ष्म अभ्यास करण्यास व संशोधन करण्यास प्राध्यापकांना वाव मिळेल. प्राध्यापक स्वतः उत्साही व विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण करणारा असावा. त्याचे अध्ययन अद्ययावत असावे. ज्ञानसाधना व ज्ञानदान हा त्याचा धम्म व्हावा असे त्यांना वाटते.

**स्त्री–पुरुष शिक्षण**

स्त्री ही चैनीची वस्तू मानल्याने तिचे शरीर वस्त्र आणि दागिने यांनी सजविण्यातच धनाचा मोठा व्यय होतो. हिंदूंनी स्त्रीला स्वातंत्र्य दिले नाही. स्त्रियांनी स्वातंत्र्यचळवळ करून पुरुषांच्या बरोबरीने हक्क मिळवावेत. स्त्री–पुरुष एकत्र आले तर नैतिकता धोक्यात येईल असे पुराणमतवादी लोक उगीच मानतात. डॉ. आंबेडकर सर शंकर नायर यांच्या विचारांचा पुरस्कार करताना असे सांगतात की "स्त्रियांचे शिक्षण पुरुषांच्या बरोबर एकत्र असले पाहिजे."[२०] स्त्री शिकायलाच नको म्हणून विरोध करणारा परंपरावादी समाज त्यावेळी सहशिक्षण नको असे म्हणत होता. आज सहशिक्षण सर्वत्र सुरू आहे. प्रतिगामी मनुष्य दर नव्या पावलाला नकार देतो. "स्त्रियांच्या सहवासात राहून जो पुरुष आपले मन ताब्यात ठेवू शकतो व पुरुषांच्या सहवासात राहून जी स्त्री आपले पाऊल वाकडे पडणार नाही अशी खबरदारी घेऊ शकते त्यांनाच आमच्या मते नीतिमान म्हणता येईल."[२१] असा चारित्र्याचा नवा दंडक ते देतात. सह-

(१९) भी. रा. आंबेडकर, प्रा. हुदलीकर यांनी घेतलेली मुलाखत, नवयुग : १३ एप्रिल, १९४७. (२०) उनि. ब. भा. स्फुटलेख, पृ. ७७, (२१) तत्रैव, पृ. ७७,

शिक्षणामुळे आंतरजातीय विवाहांची शक्यता वाढून पारंपरिक समाजरचना नष्ट होण्याची शक्यता निर्माण होते म्हणून प्रतिगामी लोक सहशिक्षणाला विरोध करीत होते. डॉ. आंबेडकरांना या प्रवृत्तीवरच आघात करायचा होता.

### अस्पृश्यांना शिक्षणाची सर्वाधिक गरज

ब्राह्मण्यग्रस्त लोक अस्पृश्यांच्या शिक्षणाची काळजी घेणार नाहीत. अस्पृश्य हे शिक्षणाभावी जिवंतपणी दुसऱ्याचे शतकानुशतके गुलाम राहिलेले लोक आहेत. प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न अस्पृश्यांच्या अगदी जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. त्यानीं "आमच्या इतकी शिक्षणाची जरूरी दुसऱ्या कोणास आहे असे आम्हास वाटत नाही "[२२] असे म्हटले आहे. सरकारने मुसलमानांना विशेष सवलती दिल्याबद्दल ते आनंद व्यक्त करतात पण मुसलमानांसोबत अस्पृश्यांनाही विशेष सवलती द्याव्यात हे ते सांगतात. त्यांचे म्हणणे असे की– "मागासलेपणामुळे जर सवलती द्यावयाच्या तर जे जास्त मागासलेले त्यांना जास्त सवलती मिळावयास पाहिजे होत्या." कारण "सरकारने सर्व प्रजेला सारखे वागवावे, अंधाजांधाचे करू नये हा उपदेश दिसायला यथार्थ दिसतो पण सर्वच परिस्थितीत तो सारखाच हितकारक होईल असे सांगता येणार नाही. एका परिस्थितीत न्याय करावयाचा झाला तर तोच उपदेश अंमलात आणावा लागेल पण निराळ्या परिस्थितीत तो जर लागू केला तर न्यायाच्या ऐवजी अन्याय होईल. दोन माणसे सारखी सुदृढ असतील तर एकाला मलिदा तर दुसऱ्याला कोंडा देणे केव्हाच रास्त होणार नाही पण एक रोगी व दुसरा निरोगी असला तर निरोग्याला कोंडा व रोग्याला मलिदा हीच व्यवस्था प्रशस्त ठरेल... जेथे सर्व लोक सारख्या सपाटीवर असतील तेथे त्यांना सारख्या रीतीने वागविण्यास हरकत नाही, नव्हे तेच न्याय्य होईल, पण जेथे मुळातच लोक असमान आहेत तेथे त्यांना समानतेने वागविणे अन्याय्य होणार आहे यास्तव प्रजेतील सर्व जणांना सारख्या सपाटीवर आणणे ही जर सरकारच्या धोरणाची दिशा असेल तर जे वर्ग सपाटीच्या खाली असतील त्यांना विशेष सवलत देऊन

(२२) उनि. ब. भा. अग्रलेख, १५–७–२७.

वर आणणे ह्यातच न्याय आहे."[२३] हे समाजातील विषमता निर्मूलनाचे नवे विद्रोही न्यायशास्त्र त्यांनी सांगितले आहे. शेळीचे जगणे शिक्षणाने संपू शकते. डॉ. आंबेडकरांच्या समाजक्रांतीच्या तत्त्वज्ञानातील शिक्षण ही पहिली अट आहे. म्हणून 'शिका. संघटित व्हा. संघर्ष करा.' हे युगवाक्य 'शिका' ने सुरू होते.

---

(२३) तत्रैव, १५-७-२७.

## ७

# डॉ. आंबेडकरांचे वाङ्मयविषयक विचार

"आपली लेखणी आपल्या प्रश्नांपुरती बंदिस्त करू नका. तिचं तेज खेड्यापाड्यातील गडद अंधार दूर होईल असं प्रवर्तित करा." —डॉ. आंबेडकर

---

१९६० नंतर महाराष्ट्रात डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने दलितांच्या विद्रोही साहित्याचे पर्व सुरू झाले. हे जडवादी जीवनजाणिवेचे, नास्तिक्याचा अंगार फुलविणारे साहित्य म्हणून जगाने गौरविले. मराठी साहित्यात या साहित्याने 'आंबेडकर पर्व' सुरू केले. दलित साहित्य एक ज्वलंत आंदोलन झाले. या साहित्याचा जन्म डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेतून झाला. डॉ. आंबेडकरांनी प्राचीन साहित्याचा व्यासंग केला होता आणि अर्वाचीन साहित्याचेही त्यांनी चौकसपणे वाचन केले होते. राजकारणानंतरचे आवडीचे काम म्हणून "I would do literary work" असे ते म्हणाले होते. इंग्रजी साहित्य व मराठीतील संत साहित्य, हरिभाऊ आपटे, गडकरी इत्यादींचे साहित्य त्यांनी वाचले होते. ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर यांचे भाषावैभव त्याना आवडत असे. स्वतंत्र कादंबरी लेखनाचा संकल्पही त्यांनी सोडला होता. लेखणी आणि वाणी कमाविली पाहिजे. आपल्या समाजात उत्तम लेखक निर्माण झाले पाहिजेत असा ते उपदेश करीत. बाबासाहेबांनी वाङ्मयीन भूमिका विस्ताराने मांडली नाही. मनात आणले असते तर

त्यांना स्वतंत्र–मौलिक साहित्यमीमांसा सहज सिद्ध करता आली असती पण त्यांच्या राजकारणाच्या, समाजकारणाच्या आणि संशोधनाच्या व्यापा-तापात तशी उसंतच त्यांना मिळाली नाही. प्रसंगपरत्वे त्यांनी वाङ्मया-संबंधी विचार मांडले त्यावरून साहित्याकडे पाहण्याचा त्याचा रोख लक्षात येतो. साहित्यासंबंधीच्या त्यांच्या अपेक्षा लक्षात येतात. पुढील साधनांच्या-द्वारे असा त्यांचा वाङ्मयीन दृष्टिकोण पाहता येतो (१) २ मे १९५४ रोजी **विदर्भ साहित्य संघ नागपूर येथे साहित्यिकांपुढे दिलेले भाषण.** वृत्तान्त : ना. रा. शेंडे : दलितांचे जग : वेदना आणि शिष्टाई, नागपूर, दु. आ. १९७८, पृ. ११५ ते ११७, (२) **'समतेसाठीच विषमता'**, ब. भारत १ जाने. १९२९, संकलित : ब. भा. अग्रलेख, संपा–रत्नाकर गणवीर नागपूर १९७९ पृ. २६९. (३) **"दत्तदरबाराचे उदाहरण"** ब. भा. स्फुट-लेख. संपा. रत्नाकर गणवीर, नागपूर, १९८१, पृ. २१९ (४) **जुन्या 'वाङ्मयाचा' जीर्णोद्धार** जनता. २ ऑगस्ट १९५२. (५) **ह. वि. देसाई यांना दिलेली मुलाखत** : २१–१–१९४० संदर्भ : दलितांचे विद्रोही वाङ्-मय, म. ना. वानखडे, नागपूर, १९८१, पृ. ११. प्रबोधनकार बाबासाहेब आंबेडकर समाजशास्त्रज्ञ, राजनितीज्ञ, इतिहासकार आणि कायदेपंडित होते. आमूलाग्र समाजपरिवर्तन हा त्यांच्या तत्त्वज्ञानाचा ध्येयवाद आहे. त्यामुळे त्यांची वाङ्मयीन दृष्टी आकृतीवादी असणे शक्य नव्हते, ही दृष्टी रंजनवादी असणे शक्य नव्हते. त्यांनीच म्हटले आहे. "मनोरंजनासाठी मी कधीही काहीही वाचले नाही. वाचीत नाही...शिकण्यासाठी मी वाङ्मय वाचतो. मनोरंजनासाठी नव्हे. What instructs me amuses me."[१] बाबासाहेब जीवनज्ञानप्रत्ययवादी आहेत. जीवनदर्शनवादी आहेत. ते म्हण-तात, "जीवनात भेद न राखला जावा व सदैव दक्ष व जागरूक राहून कल्याण साधलं जावं असंच वाङ्मय किंवा साहित्य निर्माण व्हायला पाहिजे...तरच त्याला वाङ्मय म्हणायचं, उद्धारक साहित्य मानायचं... दहम् व शतम् याचा अर्थ निदान साहित्यकारांनी नीट समजून घेतला

---

(१) म. ना. वानखडे, **दलितांचे विद्रोही वाङ्मय** नागपूर, १९८१, पृ. ११ वरून उद्धृत.

पाहिजे. दहम्चं दमन व दमन होऊ नये आणि शतम्चं शरण व मरण होऊ नये. परंतु अहं ते घडवून आणतं. साहित्यातला 'अहं' तर फार भयंकर आहे. त्यात सहिष्णुता, ऋजुता व विशेषतः 'उद्‌गीथ' आढळत नाही. 'वाचस्पति–कर्माणमूतये। मनोजुवं वाजे अद्या हुवेम ॥' साहित्यसाधनेच्या गतीनं आणि उदात्त हृदयाच्या स्पर्शानं जीवन विकसित व उन्नत झालं पाहिजे तरच तो वाचस्पती, तरच तो साहित्यकार...आजचा साहित्यकार रेंगाळत रेंगाळत दहम्ची दहा पावलं पुढं टाकण्याचा प्रयत्न करतो आणि शतम्ची शंभर पावलं मागं सरकतो. तरी त्यांचा अहं कायमच ! तो कधी बागेतील सुंदर फुल तोडतो. कधी कधी चोरूनही तोडतो...स्वतः कष्ट घेऊन सुंदर बाग निर्माण करणारा तो कुशल माळी बनत नाही, पण मी माळी आहे म्हणून मात्र मिरवतो. मी ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी', तुकोबांची 'गाथा', तर लोकमान्य टिळकांचं 'गीतारहस्य', हरिभाऊंची 'पण लक्षात कोण घेतो' कादंबरी, सावरकरांचं 'काळं पाणी', वामन मल्हार जोश्यांचा 'सुशीलेचा देव', साने गुरुजींची 'श्यामची आई', इतकंच काय फडक्यांची 'दौलत', खांडेकरांची 'हृदयाची हाक', माडखोलकरांचं 'भंगलेलं देऊळ', केशवसुतांची 'तुतारी', यशवंतांची, 'आई' आणि गडकऱ्यांचं 'फुटकं नशीब' समजू शकतो; पण आजचं किन्तूचं किंचित कथा–काव्य–नाट्य मात्र समजू शकत नाही. त्यात ज्ञानबोध तर नाहीच पण उदात्त लालित्यही नाही, ना कसला उच्च कलानंद !'

आज समाजजीवन व राष्ट्रजीवन प्रगत होणारं साहित्यशास्त्र निर्माण होत नाही. आपल्या देशाला एकात्मतेची व बंधुत्वाची नितांत गरज आहे. एकात्मता आणि बंधुता हा आपल्या राष्ट्राचा गाभा ठरला पाहिजे; त्याशिवाय प्रबल संघशक्ती निर्माण होणार नाही. म्हणून साहित्यकलेतूनही मानवतावादी शास्त्र निर्माण होणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी साहित्य-क्षेत्रात राष्ट्रोपयोगी क्रांतीची लाट उसळली पाहिजे. 'सर्वेऽपि सुखिनः संतु सर्वे संतु निरामयाः' हा उच्चार ठीक आहे; पण त्या सिद्धतेसाठी जोष आणि प्रेम नाही. अलीकडे तर साहित्याच्या कडा काळवंडत चाललेल्या आढळतात. पीक फार फार आहे पण ते निःसत्व आहे. आज

आम्हाला ज्ञानसत्त्वाची भूक आहे. ती भागविली गेली पाहिजे. अनुभूतिपूर्व सकस साहित्यातील गोडी आम्हाला चाखता आली पाहिजे. कवी किटस् म्हणतो, "Heard melodies are sweet, but those unheard are sweeter" याप्रमाणे अनुभव आला पाहिजे...आपण आपल्या जीवनाकडे कर्तव्यधर्माकडे आणि संस्कृतीकडे दुर्लक्ष करीत आहोत. थोडं अंतर्मुख होऊन विचार केलात तर आपली जीवनमूल्ये आणि सांस्कृतिक मूल्ये कशी करपून जात आहेत याचे भेसूर चित्र उभं राहील. कारणं काहीही असोत पण आपण अधःपतनाच्या, अवनतीच्या मार्गावरून जात आहोत असंच आढळून येईल. तेव्हा तत्परतेनं सावध होऊन जीवन व संस्कृतिविषयक मूल्ये साहित्यकारांनी जोपासली पाहिजेत, ती सतेज बनविली पाहिजेत, वृद्धिगत केली पाहिजेत. तुमच्या कथा कादंबऱ्यातील सीता आता लक्ष्मणरेषा ओलांडून जात आहे ! दुर्योधनाच्या राजदरबारात द्रौपदीवस्त्रहरण होत आहे—आणि दुष्यंत शकुंतलेला ओळख देत नाही. ती वनवासी होत आहे. म्हणून मला साहित्यकारांना आवर्जून सांगायचे आहे की उदात्त जीवनमूल्ये व सांस्कृतिक मूल्ये आपल्या साहित्यप्रकारातून आविष्कृत करा. आपलं लक्ष आकुंचित, मर्यादित ठेवू नका, ते विशाल बनवा. आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका तिचा विस्तार होऊ द्या. आपली लेखणी आपल्या प्रश्नांपुरतीच बंदिस्त करू नका. तिचं तेज खेड्यापाड्यातील गडद अंधार दूर होईल असं प्रवर्तित करा. आपल्या या देशात उपेक्षितांचं, दलितांचं फार मोठं जग आहे हे विसरू नका. त्यांचं दुःख, त्यांची व्यथा नीट समजून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांचं जीवन उन्नत करण्यास झटा. त्यातच खरी मानवता आहे."[२] यावरून त्यांची साहित्यदृष्टीः—

१. रंजनवादी नाही. ती ज्ञानप्रत्ययवादी आहे.

२. ती व्यक्ती व राष्ट्र यांच्या कल्याणाचे ध्येय बाळगणारी आहे.

३. ती जीवन उन्नत करणाऱ्यालाच साहित्यिक मानते.

---

२. ना. रा. शेंडे, **दलितांचे जग : वेदना आणि शिष्टाई**, नागपूर, १९७८ पृ. ११५; ११६ व ११७ वरून उद्धृत.

४. ती केवळ जीवन चित्रणाला महत्त्व देत नाही तर जीवन निर्माण करण्याला महत्त्व देते. साहित्यिकाने बाग म्हणजे जीवन निर्माण करणारा माळी व्हायला हवे असे ती मानते.
५. ज्यात ज्ञानबोध नाही, उदात्त लालित्य नाही व उच्च कलानंद नाही असे जन्तुवाद्यांचे, नियतीवाद्यांचे, निराशावाद्यांचे, विकृती व लिंग-वाद्यांचे साहित्य त्यांना साहित्यच वाटत नाही. त्यांची साहित्यदृष्टी–
६. राष्ट्रोपयोगी क्रांतीच्या लाटेला व ज्ञानसत्वाच्या आविष्काराला महत्त्व देते.
७. साहित्य अनुभूतीपूर्ण, सकस असावे असे त्यांना वाटते.
८. उदात्त जीवनमूल्यांना ती मौलिक मानते.
९. साहित्यिक संकुचित मनाचा नसावा. त्याची दृष्टी व्यापक असावी. सगळया दुःखी व अन्यायग्रस्त मानवतेला तिने कवळावे.
१०. पीडितांच्या बाजूने उभे राहणे हीच मानवता. हीच बांधिलकी होय.

ही डॉ. आंबेडकरांची साहित्यदृष्टी आशयनिष्ठ आहे...ती चैतन्यवादी, कलावादी वा स्वायत्ततावादी नाही. ती पाटवादी वा आकृतीवादी नाही. त्यामुळे वि. कृ. चिपळूणकर, तांबे, फडके मर्ढेकर या आकृतीवाद्यांना ही साहित्यदृष्टी सहज मोडीत काढते. पुढच्या विद्रोही दलित साहित्याचा भक्कम आधार झालेली ही साहित्यदृष्टी परंपरावादी व रचनावादी साहित्याला स्पष्टपणे नकार देते. ही साहित्यदृष्टी डॉ. आंबेडकरांच्या संपूर्ण, विद्रोही, नास्तिक जीवनदर्शनाला सुसंगत अशीच आहे. समतादर्शी बंधुत्वदर्शी अशा धम्माला–नीतीला ही साहित्यदृष्टी वाङ्मयीन निकष मानते. उन्नतीकडे नेणारा जीवनाशय, उदात्त लालित्य आणि उच्च कलानंद याचा मेळ घालून ही साहित्यदृष्टी आशयसौंदर्यासोबतच अभिव्यक्तीसौंदर्याचेही कलेतील महत्त्व मानते. हे ज्याच्या कृतीत प्रत्ययाला येते त्यालाच ती श्रेष्ठ साहित्यिक मानते. जीवनातील अन्याय-ग्रस्तांच्या दुःखांशी व जीवनोन्नतीशी–मानवतेशी या साहित्यदृष्टीची बांधिलकी आहे. हा साहित्यविचार क्रांतीनिष्ठ जीवनवादी आहे. लौकिकतावादी आहे. आंबेडकरी सौंदर्यशास्त्राची ही जीवनसूत्रे होत.

हरिभाऊ आपटे, वा. म. जोशी, दि. के. बेडेकर, कुसुमावती देशपांडे, शरच्चंद्र मुक्तिबोध, द. ग. गोडसे इत्यादी साहित्यचिंतकांच्या कुटुंबातील ही साहित्यदृष्टी आहे.

ज्योतिबा फुले, रानडे, वि. ल भावे, राजवाडे, लालजी पेंडसे, डॉ. सहस्रबुद्धे व प्रा. सरदार इत्यादी प्रज्ञावंतांनी संतांच्या सामाजिक कार्याचे परखड मूल्यमापन केले. डॉ. आंबेडकरांनीही अत्यंत मूलगामी पातळीवरून संतांच्या कार्याचे मूल्यमापन केले. संतकार्याविषयीच्या अभ्यासात डॉ. आंबेडकरांची ही दृष्टी अत्यंत मौलिक मानली पाहिजे. बाबासाहेबांना संत क्रांतिकारक तर वाटत नाहीतच पण ते 'जातिव्यवस्थेचे 'फार मोठे पक्षपाती'[३] वाटतात संतांचे बंड एका वर्गाचे दुसऱ्या वर्गावर वर्चस्व या चातुर्वर्ण्याच्या मर्मावर नव्हते[४] तर मानवी ब्राह्मण श्रेष्ठ की भक्त श्रेष्ठ असा तो लढा होता. ब्राह्मण मानव श्रेष्ठ की शूद्र मानव श्रेष्ठ हा प्रश्न सोडविण्याच्या भरीस साधुसंत पडले नाहीत या बंडात साधुसंतांचा जय झाला व भक्तांचे श्रेष्ठत्व ब्राह्मणांना मान्य करावे लागले. तरीसुद्धा या बंडाचा चातुर्वर्ण्य–विध्वंसनाच्या दृष्टीने काहीच उपयोग झाला नाही...तुमचे चातुर्वर्ण्य तुम्ही ठेवा, आम्ही भक्त होऊ व तुमच्यातील श्रेष्ठतम गणल्या गेलेल्या ब्राह्मणांना लाजवू अशी अहंमन्यता धरून संतांनी चातुर्वर्ण्याला मुळीच धक्का लावला नाही. भक्तीच्या मुलाम्याने माणुसकीला किंमत येते असे नाही. तिची किंमत स्वयंसिद्ध आहे. हा मुद्दा सिद्ध करण्यासाठी संत भांडले नाहीत. त्यामुळे चातुर्वर्ण्याचे दडपण कायम राहिले. संतांच्या बंडाचा एक मोठाच दुष्परिणाम झाला. तुम्ही चोखामेळ्यासारखे भक्त व्हा मग आम्ही तुम्हाला मानू असे म्हणून दलित वर्गाची वंचना करण्याचा एक नवा उपाय मात्र त्यामुळे ब्राह्मणांच्या हाती सापडला. दलित वर्गातील कुरकुरणारी तोंडे या उपायाने बंद होतात असा ब्राह्मणांना अनुभव आहे व याच उपायांच्या

(३) भी. रा. आंबेडकर : जातिभेद निर्मूलन (भाषा : गांजरे) नागपूर १९७० पृ. ११४. (४) भी. रा. आंबेडकर, ब. भा. अग्रलेख, १–१–२९, (संपा. रत्नाकर गणवीर) नागपूर, १९७६ पृ. २६८.

सहाय्याने त्यांनी अस्पृश्य व ब्राह्मणेतर हिंदू यांना विषमतेत दडपून ठेवले आहे"[४] संत जातिभेदावर पूर्ण विश्वास ठेवणारे होते. संत ज्या जातीचे होते त्याच जातीत जगले व मेले ज्ञानेश्वरांनी जातीच्या मोहापायी जातीत समाविष्ट होण्यासाठी आकाशपाताळ एक केले. एकनाथांनी अस्पृश्याच्या मुळाला स्पर्श केला. याचे कारण तो जातीभेद व अस्पृश्यता यांच्या विरोधी होता असे नव्हे तर "अंत्यजाचा विटाळ ज्याशी। गंगास्नाने शुद्धि त्याशी ॥ (ए. भा, अ. २८, ओवी १९१) ही सोय होती म्हणून ! "माणसामाणसात चाललेल्या भांडणाशी त्यांचा कसलाही संबंध नव्हता. तर माणूस आणि देव यांच्याशी असलेल्या नात्याशीच त्यांचे कार्य संबंधित होते सर्व माणसे समान आहेत असा त्यांनी उपदेश केला नाही तर देवाच्या दृष्टीने सर्व माणसे समान आहेत असा त्यांनी उपदेश केला. हा उपदेश अत्यंत भिन्न असून अत्यंत निरुपद्रवी आहे."[५] हा बाबासाहेबांचा निष्कर्ष अत्यंत बिनतोड आहे. याहीपुढे जाऊन ते म्हणतात की "...संतांवर अवलंबून राहण्याने सत्याच्या दिशेने आमची प्रगती होणार नाही .. त्यांच्या विचाराची झेप पाहता मला तर असे वाटते की या हिंदूंच्या जीर्ण सामाजिक प्रथेचे समर्थन करण्यासाठी ते जो आपल्या बुद्धीचा वापर करीत आहेत तो त्यांनी आपल्या प्रामाणिक बुद्धीचा केलेला वेश्याव्यवसाय होय ! ते जातिप्रथेचे एक फार मोठे पक्षपाती असून हिंदूंचे ते सर्वात मोठे दुष्मन आहेत."[६] असे महात्मा गांधींशी झालेल्या वादविवादात त्यांनी म्हटले आहे संतांच्या वाङ्मयाचे हे बुद्धिवादी, मानवतादृष्टीने केलेले परखड आणि वस्तुनिष्ठ मूल्यमापन होय. हिंदूच्या उन्नयनाचा ध्यास घेतलेले मानस त्यामागे उभे आहे. अध्यात्म, अंधश्रद्धा यापासून वेगळे होऊन समतेच्या व बुद्धिवादाच्या वाटा, उन्नतीच्या व समृद्धीच्या, आधुनिकत्वाच्या आणि सामर्थ्याच्या वाटा या समाजाने अंगिकाराव्या हा उदात्त मनोदय त्यामागे उभा आहे.

---

(४) तत्रैव १–१–२९. (५) उनि. जातिभेद निर्मूलन, पृ. (९८) ९९. (६) तत्रैव, पृ. ११४,

दत्तसंप्रदाय हा सोवळ्या ओवळ्याचे व जातिभेदांचे विशेष कडक समर्थन करतो. पण गुरुचरित्राआधी तो इतका कडवा नव्हता याची नोंद डॉ. आंबेडकर करतात. महानुभाव पंथाबद्दलही त्यांनी मत नोंदविले आहे. "सर्वात जुने मराठी वाङ्मय महानुभावपंथाचे आहे. या पंथात दत्तोपासना चालू असली तरी जातिभेदाचे व सोवळ्या ओवळ्याचे वेड त्या पंथात नाही."[७] असे ऐतिहासिक सत्य ते नोंदवतात. दत्त संप्रदायाच्या व महानुभव-संप्रदायाच्या या प्रकृतिभेदाचा उहापोह करताना ते म्हणतात-" भक्त मंडळी स्वतःच्या समजुती आपल्या उपास्यावर लादीत असते. भक्त सोवळे तर देवही सोवळा. भक्त उदारमतवादी तर देवही उदारमतवादी. भक्त हिंसा-प्रिय तर देवही हिंसाप्रिय. भक्त लाचखाऊ तर देवही लाचखाऊ. भक्त शीघ्रकोपी तर देवही शीघ्रकोपी असेच सर्वत्र दिसून येते. हिंदूधर्मातल्या भक्तांना बहिष्कृतांच्या सावलीने विटाळ असे वाटते. मग आपल्या देवाला विटाळाची बाधा होऊ नये याकरिता त्यांनी त्याला कडीकुलुपात घालून ठेवावे. बहिष्कृतांचा वाराही त्याला लागू देऊ नये हे स्वाभाविकच होय. सारांश, देवाच्या नावावर चालू असलेले सोवळ्या ओवळ्याचे बंड माणसांनीच उत्पन्न केलेले आहे"[८] असा रास्त निष्कर्ष ते काढतात.

लोकसाहित्याचा विचार बाबासाहेबांनी खोलवर केला होता. लोक-साहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व व दिशा काय असावी हे ते आपल्या तत्व-ज्ञानाशी सुसंगत ठरेल या पद्धतीने सांगतात. लावण्या आणि गाऱ्हाणे यांचे सोदाहरण स्पष्टीकरण त्यांनी दिले. "लालित्य आणि नवलाई"[९] या दृष्टीने या साहित्याचे त्यांना मोल वाटते. या वाङ्मयाचे जतन व चिकित्सा दोन्हींची गरज त्यांनी प्रतिपादिली.

बाबासाहेबांच्या या वाङ्मयीन भूमिकेने मराठी साहित्याला नव्या प्रेरणेचे तेज मिळाले. प्रतिभांना नवी क्षितिजे आणि निर्मातयांना नवी

---

(७) भी. रा. आंबेडकर. **ब. भा. स्फुट लेख** संपा. रत्नाकर गणवीर, नागपूर १९८१, पृ. २२०.

(८) तत्रैव पृ. २२०, (९) जुन्या वाङ्मयाचा जीर्णोद्धार, जनता २ ऑगस्ट, १९५२.

विद्रोही स्वप्ने मिळाली. ही जडवादी, बुद्धिप्रामाण्यवादी आणि समतादर्शी अशी जीवनवादी वाङ्मयीन दृष्टी दलितांच्या लाडक्या सर्वश्रेष्ठ विद्रोही तत्त्वज्ञाची आहे. महापंडित डॉ. आंबेडकरांच्या लेखनात अशा ठळक ठिकाणी साहित्याची सौंदर्यसूत्रे आपल्या हाती लागतात. या मूलगामी सौंदर्यसूत्रांच्या अधिष्ठानावर मराठीत आंबेडकरवादी सौंदर्यशास्त्राच्या उभारणीला प्रारंभ झाला आहे.

---

८

# डॉ. आंबेडकरांचे कामगार आणि क्रांतीसंबंधी विचार

"जातीभेद व स्पर्शास्पर्श यांचे बंड कामगारांमध्ये कमी नाही. जातीभेद व अस्पृश्यता ही कम्युनिझमच्या मूलतत्त्वांना अगदी सोडून आहेत." (ब. भा. ४-१०-२९)

—डॉ. आंबेडकर

---

१९२८ साली मुंबईतील गिरण्यांच्या मालकांविरुद्ध कामगारांनी सहा महिने संप चालविला. हा दीर्घमुदतीचा संपही तात्पुरती तडजोड करून मिटविण्यात आला. चौकशीसाठी नेमलेल्या सरकारी समितीने कामगारांच्या काही मागण्याच मंजूर केल्या.

**जातीवादी मराठे कामगार :** या संपाशी अस्पृश्यांचा जिव्हाळ्याचा संबंध होता. कारण मुंबईत हजारोंच्या संख्येने अस्पृश्य स्त्री-पुरुष कामगार होते. कापड खात्यात साच्यावर काम करण्याची मोकळीक मिळावी ही अस्पृश्यांची एक मागणी होती आणि गिरणी मालकांनी ती मंजूर केली होती. या मागणीला सक्त विरोध केवळ मराठे कामगारांचाच होता. कापड खात्यात अस्पृश्यांसोबत काम करणार नाही असा या कामगारांचा आग्रह होता. त्रासन खात्यात वगैरे अस्पृश्य काम करू शकत पण कापड-खात्यात पगार अधिक म्हणून तेथे अस्पृश्यांना जाता येत नसे. शिवाय तेथे महार चांभार काम करू लागले तर मराठे वगैरे लोकांची जात बुडते, कारण या खात्यात तोंडात सूत धरावे लागल्याने बाटाबाट होते असे मानले

जाई. मुसलमान कामगारांच्या संदर्भात मात्र या कामगारांनी असा मुद्दा कधीच उपस्थित केला नाही.

या संपाच्या निमित्ताने आंबेडकरांनी कामगारांच्या या सरंजामी मनोवृत्तीतील कडवेपणावर नेमके बोट ठेवले आहे. भांडवलशाहीकडून होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढणारा हा कामगार आपल्याच देशातील लोकांवर केवढा भयंकर अमानुष अन्याय करतो याची जाणीवही त्याला नाही. या देशातील कम्युनिस्ट नेतृत्वानेही ही गोष्ट लक्षात घेतली नाही. कामगारांनाही शिकविली नाही. कम्युनिस्ट नेत्यांसकट कामगारांचीही मनोवृत्ती नितांत क्रांतीविरोधी आहे. त्यामुळे अस्पृश्य गिरणी कामगारांचा लढा दुहेरी आहे. त्याला भांडवलदाराविरुद्धही लढायचे आहे आणि येथील अस्पृश्येतर कामगारातील सरंजामी वृत्तीविरुद्धही लढायचे आहे. त्यामुळे सर्व गिरण्यांच्या कापड खात्यांची दारे खुली होण्यासाठी अस्पृश्यांनी जबरदस्त चळवळ केली पाहिजे आणि "मराठे वगैरे गिरणी कामगार आड येऊ लागल्यास त्यांचा जोराने प्रतिकार व वेळीच अडवणुकीच्या मार्गाने त्यांना वठणीस आणण्याला तयार असले पाहिजे."[१] अशी दुहेरी युद्धाची ज्वलंत प्रेरणा अस्पृश्यांमध्ये बाबासाहेब चेतवतात.

अशा अत्यंत मूलगामी प्रश्नाच्या संदर्भात लाल बावटेवाला 'गिरणी कामगार युनियन संघ' मौन पाळतो याची खंत व्यक्त करून कम्युनिस्ट पुढाऱ्यांची कामगारांना याबाबतीत योग्य शिकवण देण्याची तयारी नाही असा रोखठोक आरोप आंबेडकर करतात.

**विणकर व बहिष्कृत कामगार** : गिरणी मालकांनी पगाराची निरख बंदी (स्टँडर्डायझेशन) करण्याची व गिरणीधंद्याला मंदी असल्याने पगार साडेसात टक्क्यांनी कापण्याची योजना मंजूर केली. पैकी निरखबंदीमुळे सूत खात्यातील कामगारांची संख्या घटणार होती व याच खात्यातील अगदीच हलके असलेले पगार थोडे वाढणार होते. पण साडेसात टक्के पगार कापण्याची कल्पना राबवू नये असे ठरले.

---

(१) ब. भा. अग्रलेख. २९–३–२९

विणकरांमध्ये अस्पृश्य नसले तरी विणकरांच्या पगारात काट होण्याचे टळणे ही गोष्ट अस्पृश्यांच्या दृष्टीनेही समाधानाची मानावी कारण त्यामुळे संप टळलेला असतो. मागल्या लहान मोठ्या संपांमुळे बहिष्कृत कामगार बेजार झाले असतात. कर्जाखाली चेपले असतात. आणखी संप झाला असता तर अस्पृश्य कामगारांच्या हालांना पारावार उरला नसता. या अभिप्रायामधून अस्पृश्यांच्या शतकांच्या दारिद्र्याचे खोल भान आंबेडकर व्यक्त करतात आणि–

**संघटनेचे सामर्थ्य :** अस्पृश्यांनी संघटित व्हावे. त्यांनी बेसावध राहू नये. गिरणी कामगार संघाचे सदस्य होऊन संघशक्ती वाढवावी आणि त्याद्वाराच त्यांना त्यांच्या अडचणी व दुःखे यावर मात करण्याची शक्ती लाभेल असा मोठा निर्वाणीचा निर्वाळा ते देतात. यातून चळवळीच्या सामर्थ्याचे मोल ते जाणतात, लढण्याची गरज ते मानतात आणि शत्रूंची प्रबलता ज्ञात असल्याने संघटनात्मक लढ्याशिवाय दुसरा मार्ग नाही हे ते परिवर्तनावर नजर रोखूनच बोलतात.

**संपाच्या विरोधाची मीमांसा :** २८ सालातील सहा महिन्याच्या मोठ्या संपाचे दुष्परिणामही गरीब–अस्पृश्य कामगारांवर खूप झाले होते. त्यामुळे परत २९ साली संपाचे घाटू लागले तेव्हा आंबेडकरांनी त्याला विरोध केला. कारण मागच्या संपाने लोक जेरीस आले होते. त्यावेळचा संप मागच्या काही तयारीवर लढवला गेला होता पण आता तशी तयारीही नाही. म्हणून संपाला विरोध करणाऱ्या आंबेडकरांनी म्हटले आहे की, " आम्हाला कामगारांची चळवळ जरूर पाहिजे. कामगारांच्या हितसंबंधांचे संरक्षण होण्यासाठी कामगार संघ अवश्य पाहिजेत असे आमचे मत आहे परंतु कामगार चळवळीचे पर्यवसान निष्कारण उपासमार व कर्जबाजारीपणा यांच्यामध्ये होणे आम्हाला इष्ट वाटत नव्हते."[२] याचे कारणही उघड आहे. अस्पृश्य कामगारांची स्थिती इतर कामगारांपेक्षा वाईट आहे. इथे पगार कमी व गावात जमीन नाही. त्यांची पोटे हाता-

(२) तत्रैव ४–१०–२९

वरच असतात. सहा महिन्याच्या मोठ्या संपानंतर ऐंशी–नव्वद लहान संप झाले. त्यामुळे संपावर जाण्याचे त्राण या कामगारात अगदी नव्हते. पण युनियनचे पुढारी या अस्पृश्य कामगारांच्या भयंकर दारिद्र्याचा विचार करीत नाहीत. ते त्यांच्या हिशेबातच नाहीत आणि संप पुकारतात असा पुढाऱ्यांच्या अपर्याप्त वृत्तीवर आंबेडकर आरोप करतात.

**शुद्ध कामगार संघ व क्रांतिवादी चळवळ :** या दोन घटनांमध्ये आंबेडकर भेद करतात. संप या अस्त्राचा उपयोग जपून करायचा असतो. शुद्ध कामगार संघाच्या संपाचा उद्देश कामगारांची दुःखे दूर करून घेणे हा असतो. पण क्रांतिवादी चळवळीमध्ये हा उद्देश गौण ठरून त्यांना क्रांतीच्या तयारीची तालीम देणे हा उद्देश प्रधान ठरतो. या चळवळीत कामगारांची आर्थिक स्थिती सुधारणे हे बाह्य निमित्त असते. पण मूळ हेतू कामगारांमधील असंतोष वाढविणे हा असतो. "कामगारांची जितकी उपासमार होईल व त्यांचे जितके हाल होतील, त्यांच्यावरील जुलूम जितका वाढेल तितके क्रांतिवादाच्या दृष्टीने इष्ट असते. कारण वैतागल्याशिवाय क्रांतीसाठी कोणी तयार होत नाही."[३] अर्थात अशा झटपट क्रांतीचे आकर्षण आंबेडकरांना नाही. कम्युनिस्ट पुढाऱ्यांना अशा क्रांतीने समाज बदलेल, कामगारांचे राज्य येईल असे वाटत असले तरी अशी क्रांती आंबेडकरांना इष्ट वाटत नाही. ही क्रांती भारतीय समाजाची संरजामी–जातीय मानसिकता लक्षात घेता फलदायी होणार नाही हे त्यांचे मत आहे. आपली समाजसंस्था विषमज्वराने आजारी आहे. संपत्तीच्या विषम वाटणीमुळे कोट्यवधींचे जीव मूठभरांच्या हातात पडले आहेत. या रोगावर उपाय होणे आवश्यकच, पण हे कसे करायचे ? सद्यस्थितीत भारतात कम्युनिझम हे करू शकेल काय ? दांडगाईने राज्यक्रांती शक्य होईल काय ? आपला कामगार हा क्रांतीसाठी मनाने तयार आहे काय ? या प्रश्नांचा विचार ते करतात.

**देवखुळा कामगार :** भारतीय कामगार खऱ्या अर्थाने कम्युनिस्ट नाही ही पहिली मुद्याची गोष्ट ते नोंदवतात. देव, धर्म, राष्ट्र या कल्पनांचे निर्मूलन झाल्याशिवाय खरी शांतता जगात नांदायची नाही व बहुजन-

---

(३) तत्रैव ४–१०–२९

समाज सुखी व्हायचा नाही हा कम्युनिस्टांचा सिद्धांत आहे. पण आपले कामगार हे मानतात काय ? कम्युनिस्ट पुढारी जर वरील अटी घालतील तर "कामगारांमध्ये एकही अनुयायी "[४] उरायचा नाही. कामगारांमधील या देव–दैववादी व जातीय मनोवृत्तीचा फायदा भांडवलदार, जमीनदार व साम्राज्यवादी घेतात ही गोष्ट आंबेडकर नोंदवतात. हे खरे तर केवळ कामगारांच्याच संदर्भात खरे नाही. ते कम्युनिस्ट नेतृत्वाच्याही संदर्भात तेवढ्याच तीव्रपणे खरे आहे हेही अर्थात सांगितले गेले पाहिजे.

**जातीवादी कामगार :** हा कामगार जातीवादी आहे कडक स्पृश्यास्पृश्यताही तो पाळतो. लाल बावटेवाले कामगारही गिरण्यांमधील नळांकडे अस्पृश्य कामगारांना येऊ देत नाहीत. आंबेडकर यातून हे सांगतात की ही कामगाराची मनोवृत्ती नितान्त क्रांतीविरोधी आहे. जातीनिर्मूलनाचा कार्यक्रम किंवा कामगारांच्या या अनुषंगाने संभवणाऱ्या 'मानसिक प्रबोधनाचा कार्यक्रम कम्युनिस्ट का हाती घेत नाहीत ? हे न करता झालेली क्रांती येथील गोरगरिबांसाठी गुलामीशिवाय दुसरे काय आणील ? अशा क्रांतीने आंबेडकर म्हणतात त्याप्रमाणे "कदाचित समाजामध्ये विशेषच गोंधळ माजेल, अंतःकलह वाढतील आणि सध्या दुर्बळ असलेले वर्ग जातिदूराभिमानी प्रबळ वर्गाच्या जुलूमाला बळी पडतील."[५] हे नाकबूल कसे करणार ? भोवती आपणास काय दिसते ? त्यामुळेच "कम्युनिस्टांची या देशातील सध्याची चळवळ 'आधी कळस मग पाया' या प्रकारच्या विपरित क्रमाची आहे."[६] असे स्पष्ट शब्दात आंबेडकर सांगतात. इथे क्रांती करू इच्छिणाऱ्या कोणत्याही चळवळीला आंबेडकरांचे हे मार्गदर्शन टाळता यायचे नाही. आंबेडकरांना क्रांती हवी होती. समाजात आमूलाग्र परिवर्तन हवे होते. पण मानसिक प्रबोधनाच्या मार्गानेच ही क्रांती यशस्वी व अर्थपूर्ण होऊ शकते असे एकूण मानवी मनाचा व भारतीय मानसिकतेचा संदर्भ लक्षात घेऊन बाबासाहेब सांगतात. हे सांगणारा आंबेडकर टाळून इथे क्रांतीची वाटचाल कोणालाच करता यायची नाही.

---

(४) तत्रैव ४–१०–२९ (५) तत्रैव ४–१०–२९ (६) तत्रैव : ४–१०–२९

## ९

# डॉ. आंबेडकरांची गद्यशैली

"What instructs me amuse me."

'आशा प्रमोद' २१-१-१९४०.

—डॉ. आंबेडकर.

---

लोकहितवादी, फुले आणि आगरकर ही आपल्या प्रबोधनातील नेतृत्वनामे होत. या विशेषनामांचे सूर्यमंडळ आपल्या प्रबोधनाने मस्तकी धारण केले आहे. आंबेडकरांनी आपल्या प्रबोधनाला फुले-आगरकरांच्या-नंतर नवे तत्त्वज्ञान दिले. या देशाला समतेचा ध्येयवाद देणाऱ्या संविधानाचे ते शिल्पकार आहेत. आपल्या विचारपरंपरेला नवे विद्रोही आयाम देणारे आणि उजेडाची नवनवी क्षितिजे उघडून देणारे ते सर्जनशील तत्त्वज्ञानी आहेत. एकविसाव्या शतकाच्या दारात उभ्या असलेल्या, या देशाने पुढे जाण्यासाठी सोबतीला विश्वासाने घ्यावे त्या पाथेयाचे नाव आंबेडकर आहे. समतापूजन, स्वातंत्र्यपूजन बंधुतापूजन, विवेकपूजन आणि विकासपूजन ही पंचप्रकाशपूजने आंबेडकरांच्या कर्तृत्वावर तळपणारी पंचशिले होत. भौतिक आणि नैतिक असा द्विविध विकास हा या तत्त्वज्ञानाचा ध्येयवाद आहे. या देशाला त्याने मानवतेचे सुंदर स्वप्न दिले आणि साहित्याला विद्रोहाचे वैभवी लावण्य दिले. आंबेडकर ही नव्या सुंदर मनुष्यनिर्मितीची प्रक्रिया आहे. आंबेडकर हे समतासंस्कृतीचे

संविधान आहे. आंबेडकरवाद हा भारतीय ज्ञानपरंपरेचा गौरव आहे. या देशातील बुद्धिवादी परंपरेचा तो महनीय ठेवा आहे.

रिडल्स इन हिंदूइझमच्या प्रास्ताविकात बाबासाहेब आंबेडकरांनी पुढीलप्रमाणे ग्रंथप्रयोजन नोंदविले आहे. ते म्हणतात–

"This Book is an exposition of the beliefs propounded by what might be called Brahmanic theology it is intended for the common mass of Hindus who need to be awakened to know in what quagmire the Brahmins have placed them and to lead them on to the road of rational thinking ... But the time has come when the Hindu mind must be freed from the hold which the silly ideas propagated by the Brahmins, have on them. Without this liberation India has no future. I have undertaken this task knowing full well what risk it involves. I am not afraid of the consequences. I shall be happy if I succeed in stirring the masses." (पृ. ५ व ९)

(ब्राह्मण धर्माने रूढ केलेल्या समजूतींचा दंभस्फोट म्हणजे हे पुस्तक होय. ब्राह्मणी धर्माने हिंदूजनसामान्यांना सुटका करून घेता येणार नाही अशा भयावह स्थितीत कसे रूतवले आहे हे कळावे यासाठी त्यांचे मानसिक प्रबोधन करावे आणि त्यांना विवेकनिष्ठ जीवनमार्गावरून चालण्यास प्रवृत्त करावे हे या ग्रंथलेखनामागचे प्रयोजन आहे. ब्राह्मणांनी सांगितलेल्या मूर्ख समजूतींच्या मगरमिठीतून हिंदूंनी मुक्त होण्याची वेळ आता आलेली आहे त्यापासून मुक्त झाल्याशिवाय भारत देशाला कोणतेही भवितव्य नाही, सर्व संभाव्य धोक्यांचे भान ठेवून हिंदू समाजाला ब्राह्मणी समजूतींच्या कैदेतून मुक्त करण्याची जबाबदारी मी पत्करली आहे. मी परिणामांना घाबरत नाही. जनमानस घुसळून काढण्यात यशस्वी झालो तर मला खरी कृतार्थता लाभेल.)

या उताऱ्यातील त्यांचे मनोगत हे क्रांतीपुरुषाचे मनोगत आहे. ज्या विवेकवादाशिवाय भारताला व सर्व हिंदू समाजालाही भवितव्य नाही

त्या विवेकवादाचा वसा डॉ. आंबेडकरांनी घेतला आहे आणि उज्ज्वल भवितव्यासाठीच जनमानस घुसळून काढणे ही त्यांची प्रतिज्ञाच त्यांच्या सर्व इंग्रजी व मराठी लेखनामागील प्रतिज्ञा आहे. वैचारिक निबंध या महाशक्तीला ही प्रतिज्ञाच शक्ती व सौंदर्य देते. महानता देते.

डॉ. आंबेडकरांच्या मराठीतील वैचारिक निबंधाने दलितांच्या अस्मितेला जन्म दिला. माणुसकीसाठी त्यांच्यात लढण्याची प्रेरणा चेतवली. या निबंधांच्या तरफेने त्यांनी समाज उलथून टाकण्याचा महापराक्रम केला. ही आमूलाग्र उलथापालथ, समाजाचे हे महामंथन अर्थात या देशातील उपेक्षितांच्या जागृतीचा जन्म आणि उत्थानाची घोडदौड त्यांच्या मराठी वैचारिक निबंधांमधून शिल्पांकित झाली आहे.

मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता इत्यादी पत्रांमधील डॉ. आंबेडकरांच्या लेखनाचा पत्रकारितेच्या दृष्टीने–काही अत्यंत बाळबोध प्रयत्न सोडले तर–अजूनही अभ्यास झाला नाही हे खरे आहे. पत्रकारितेसंबंधी पदवीसाठी झालेले लेखन तर अत्यंतच कच्चे आहे. याचा अर्थ असा आंबेडकरांच्या वाङ्मयाचा अभ्यास करणाराही जरा तयारीचा पाहिजे. तेव्हा जाणकार आणि बुद्धिमान अभ्यासकाची वाट त्यांची पत्रकारिता अजूनही पाहते आहे.

वैचारिक निबंध प्रभावी आणि जिवंत होतो कारण त्याच्या पाठीशी एका प्रज्ञाभास्कराचे जळते मन उभे असते. वर्षानुवर्षे एखादा वणवा धगधगत राहावा तसे आंबेडकरांचे मन धगधगत होते. आयुष्याच्या शेवटपर्यंत आंबेडकर या ज्ञानसागराला आली केवळ भरती. त्याच्या अफाट धुंदीचा शक्तीविलास सुरू असताना त्याच्यापर्यंत जाण्याची हिंमतच या ओहोटीला झाली नाही. आंबेडकरांच्या आकाशात सूर्य कधी ढळला नाही. तो कायम मध्यान्ही होता. आंबेडकर ही शक्ती होती आणि तिचे सौष्ठव कधी कोमेजले नाही. ज्या दिशेने हे वादळ धावत होते ती दिशा न्यायाची होती. महासंग्राम हेच या आयुष्याचे समर्पक नाव आहे. आंबेडकरांच्या निबंधांनी या युगप्रवर्तक आयुष्याची चढती शक्तीकळा शिल्पांकित करून ठेवली आहे. आंबेडकरांचा वैचारिक निबंध ' समाज-

क्रांतीवीराचा' लढाऊ निबंध आहे. या निबंधातील शब्द वाचकाच्या मनात नव्या दुनियेची तहानभूक चेतवतात. आपला हात धरून हे शब्द आपल्याला परिवर्तनाच्या अग्निप्रवाहात ओढतात.

आंबेडकरांच्या वैचारिक निबंधाचा महत्त्वाचा विशेष हा की हस्तिदंती मनोऱ्यात बसून केवळ बौद्धिक रंजनाच्या हेतूने हा निबंध साकार झाला नाही हा निबंध आंदोलनांच्या धुमश्चक्रीत लिहिला गेला. समाज-क्रांतीच्या रणमैदानावर तो फुलला त्यामुळे या निबंधामधून आपल्यापुढे उभी राहणारी आंबेडकरांची प्रतिमा एका महायुद्धाचा जनक व मार्ग-दर्शक असलेल्या युगंधर युद्धवीराची प्रतिमा आहे. त्यामुळेच हा निबंध वाचकाच्या मनात ठिणग्यांचे अनोखे तारांगण फुलवितो. 'मनोरमं जीवितं मनुष्याणाम्' मानवी जीवन सुंदर आहे असे बुद्ध म्हणाला होता. आंबेड-करांना या सुंदर जीवनाचाच ध्यास लागला होता. या ध्यासाची तरुण भरती त्यांच्या निबंधातून उफाळताना आपणास दिसते.

वैचारिक निबंध लिहिण्यासाठी व वैचारिक निबंधकार ठरण्यासाठी निबंधाचे कोष्टक पुढे ठेवून आंबेडकरांनी लेखन केले नाही. वैचारिक निबंध जन्माला घालणे या हेतूच्या पोटी खरा थोर निबंध जन्माला येत नाही तर नवजीवनाची निर्मिती करण्याच्या प्रज्ञेच्या पराक्रमातून वैचारिक निबंध जन्माला येतो. आंबेडकरांचा निबंध या प्रक्रियेतूनच जन्माला आला आहे. सतत युद्ध सुरू असलेल्या रणांगणाची प्रतिमा या निबंधातून आपल्यापुढे उभी राहते. आव्हान देणारी अपराजित प्रज्ञा आपल्यापुढे येते. 'हजार जिव्हा तुझ्या गर्जू रे प्रतिध्वनीने त्या, समुद्रा डळमळू दे तारे', किंवा 'नाविक आम्ही परंतु फिरतो सात नभाखाली निर्मितो नवक्षितिजे पुढती' किंवा 'अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा किनारा तुला पामराला' असा मानवी महाशक्तीचा असीम साक्षात्कार घडवणारा कुसुमाग्रजांचा कोलंबस मला तरी सर्वाधिक प्रमाणात आंबेडकरांमध्येच दिसतो.

बुद्धिप्रामाण्यवाद आणि बंधुता मिळून सिद्ध होणाऱ्या धम्मराज्याचा आशय आंबेडकरांच्या वैचारिक निबंधांचा प्राण आहे. आंबेडकरांचा

निबंध म्हणजे दुधारी शस्त्र होय. एक धार पिकाला पाणी देते. दुसरी पिकांच्या शत्रूंना नष्ट करते.

मायबापाहूनि बहु मायावंत । करू घातपात शत्रूहूनि ।।
अमृत ते काय गोड आम्हापुढे । विष ते बापुडे कडू किती ।।
तुका म्हणे आम्ही अवघेचि गोड । ज्याचे पुरे कोड त्याचेपरी ।।

तुकोबांच्या या शब्दात आंबेडकरांच्या दुधारी व्यक्तित्वाचे सार्थ वर्णन करता येईल. आंबेडकरांचा वैचारिक निबंध उरात एकाचवेळी दाहकता आणि प्रकाश वागवितो. हा नवनिर्मितीचा विचार आहे म्हणूनच विचाराची नवनिर्मिती इथे होते. तो प्रकाशाचा विचार आहे म्हणून आंबेडकरांचा निबंध विचाराचा प्रकाश होऊ शकतो. हा समाजसौंदर्याचा विचार आहे म्हणून या विचाराला सौंदर्य प्राप्त होते.

**निबंधातील आम्ही** : आंबेडकरांची प्रज्ञा आणि करुणा जीवनाच्या अनेक पातळ्यांवर सतत फिरताना दिसते. अस्पृश्यता, ब्राह्मण्यरहित-समाज, ब्राह्मण्य, राष्ट्र या अशा काही पातळ्या होत.

(१) "...अस्पृश्यांची गुलामगिरी कायम ठेवण्याकरिताच जर स्वराज्य मिळविण्याची खटपट असेल तर अशा खटपटीला जितकी विघ्ने आणता येतील तितकी विघ्ने आणणे हे अस्पृश्य वर्गातील दरेक व्यक्तीने आपले कर्तव्यकर्म म्हणून समजले पाहिजे."[१]

(२) "सध्याच्या युगात ज्या देशामधील बहुजनसमाज निरक्षर आहे अशा देशाचा जीवनकलहात टिकाव लागावयाचा नाही." [२]

(३) " .. ब्राह्मण्याचा नायनाट होणे अगदी अवश्य आहे.[३]"

(४) "हिंदु समाजाचा रोष आमच्यावरती आहेच. त्यात मुसलमान समाजाच्या रोषाची भर पडणे बरे नव्हे हे आम्हाला कळत आहे. पण **ज्यात आमच्या देशाचे अकल्याण आहे त्यात आमचेही अकल्याण आहे** अशी आमची भावना असल्यामुळे ही जोखीम आम्ही आमच्या शिरावर घेतली आहे."[४]

---

(१) भी. रा. आंबेडकर, ब भा. १५-११-२९, (२) तत्रैव ३१-५-२९, (३) तत्रैव १-७-२७, (४) तत्रैव १८-१-२९

(५) "सामाजिक सुधारणेच्या बाबतीत दुनिया कोठच्या कोठे निघून गेली आहे. आम्ही मात्र जगाच्या आरंभी होतो तेथेच आहोत."[५]

(६) "व्यक्तिस्वातंत्र्याची आवश्यकता जर मान्य असेल तर दरेक व्यक्तीच्या ठायी आपले स्वातंत्र्य रक्षण करण्याची शक्ती उत्पन्न होणे जरूर आहे व ती शिक्षणाशिवाय उत्पन्न होऊ शकत नाही."[६]

वरील अवतरणांवरून हे दिसते की आंबेडकरांचा मी 'आम्ही' होतो आणि हा आम्ही व्यक्ती ते विश्व अशा सर्व पातळयांवर वावरतो. आणि या सर्व पातळ्या त्यांच्या विश्वजीवनविचाराच्या अर्थात धम्मराज्याच्या संकल्पनेच्या सेंद्रिय घटक असतात. या आंबेडकरी विचाराला सौंदर्याचा ध्यास आहे. त्यांचा निबंध या सौंदर्याने आणि विचारशक्तीने संपन्न झाला आहे.

या निबंधातील विचार शूरवीर विचार आहे. तो रात्रंदिनीच्या युद्धात सक्रीय आहे. तो एकाच वेळी अस्पृश्यांशी संवाद साधतो. सवर्णांशी वाद घालतो आणि राष्ट्राच्या उज्जवलतेची समतोल भूमिका घेतो. तो व्यक्ती, पोटजात, जात, वर्ण, प्रांत, राष्ट्र अगा चौफेर फेरफटका करतो. या देशातील मूल्यात्मक परिवर्तनाच्या मुळावर आलेल्या प्रवृत्तींचा बिमोड व्हावा यासाठी दुनियेची सफर करून पुरावे उभे करतो.

**स्वशक्तीवरील विश्वास :** आंबेडकर हा झंझावात आहे. त्यात बौद्धिक ऊर्जा सारखी उफाळत होती. ज्या परिस्थितीतुन त्यांनी हे मनःसामर्थ्य आणि प्रज्ञाबळ मिळविले होते त्या परिस्थितीने त्यांना विलक्षण निर्भीडही केले होते. अभ्यांनी या त्यांच्या वृत्तीशैलीचे मोठे मार्मिक वर्णन केले आहे. ते म्हणतात "मूळच्या बंडखोर स्वभावात सतत अभ्यासाने प्राप्त झालेल्या खंबीर आत्मविश्वासाची भर पडल्याने त्यांच्या भाषणात आणि लेखनात एक प्रकारची बेदरकार निर्भयता निर्माण झालेली आहे. म्हणून आपण जे बोलतो आहोत किंवा सांगतो आहोत ते खोटे आहे असे दाखविण्याची प्रत्यक्ष परमेश्वराची देखील प्राज्ञा नाही असा आवेश आणि

---

(५) तत्रैव २१-१२-२८, (६) तत्रैव १५-७-२७,

उद्दामपणा त्यांच्या भाषणात किंवा लेखनात धगधगत असल्याचा आपल्याला भास होतो. त्यातून, पहिल्या दर्जाचे ते कायदेपंडित असल्याने तर्कशुद्ध वादविवाद करण्याचे कामी कोणालाहि सहजासहजी हार जाणारे नाहीत. आपल्या बिनतोड कोटिक्रमाने ते आपल्या प्रतिस्पर्ध्याची भंबेरी उठवून टाकतात. त्यांचे विरोधक त्यांच्या विरुद्ध मनातून खूप चरफडतात, पण त्यांच्या भेदक कोटिक्रमाला प्रत्युत्तर देण्याचे त्यांना धैर्य होत नसल्यामुळे त्यांची उपेक्षा किंवा उपहास करणे एवढाच आत्मसंरक्षणाचा मार्ग त्यांना मोकळा राहतो. आंबेडकरांच्या बौद्धिक तपश्चर्येचे सामर्थ्य ज्यांना माहीत आहे ते त्यांना अतिशय वचकून तरी असतात नाहीतर ते त्यांच्या कधी वाटेलाहि जात नाहीत."[७] 'आंबेडकर' हा व्यक्तिमत्वाचा प्रकारच आपल्याला अपूर्व आहे. 'दुर्जनांशी पंचानन–तुका रजरेणु संतांचा' असे विलक्षण आणि दोन्ही बाजूंनी तेवढेच धारदार असे आंबेडकरांचे व्यक्तिमत्व आहे.

**हिंदूधर्माची समीक्षा** : आंबेडकरांनी जेवढ्या खोलात जाऊन आणि जेवढ्या बाजूंनी हिंदूधर्माची समीक्षा केली तेवढी कोणीही केली नसेल. "...माणसे असून त्यांना जनावरांना मिळणाऱ्याही सवलती लाभू देत नाही तो धर्म तरी कसला ? तशा धर्माला 'धर्म' हे नावच योग्य नाही."[८], "ज्या भेदावर ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाची उभारणी झाली आहे तो भेद इतर धर्मात नसून फक्त हिंदू धर्मातच काय तो आहे."[९], "हिंदू म्हणजे जगातले मोठ्यातले मोठे पाप आहे."[१०] इथे त्यांच्या शैलीचे सडेतोडपणा, बेदरकारपणा, बौद्धिक आत्मविश्वास, सुभाषितत्त्व, वक्तृत्व आणि चिकित्साबुद्धी इत्यादी गुण प्रत्ययाला येतात.

**म्हणी व वाक्प्रचार** : लेखन म्हणी व वाक्प्रचारांमुळे प्रभावी ठरते. मुद्दा वाचकाच्या मनावर खोल बिंबवता येतो. आंबेडकर अनुभवाने या देशातील जनसंस्कृतीचे आणि शिष्ट संस्कृतीचे सभासद होते तर अभ्यासाने पाश्चात्य व प्राचीन भारतीय संकृतिसंचिताचे सभासद होते. त्यांच्या लेखनात वरील चारही प्रदेशातील संदर्भ येतात. ते अनेकदा म्हणी–

(७) प्र. के. अत्रे, **दलितांचे बाबा**, मुंबई–तिसरी आवृत्ती, १९७६, पृ. ५.
(८) तत्रैव २९–७–२७ (९)तत्रैव १–७–२७(१०)तत्रैव १६–११–२८.

वाक्प्रचारांच्याद्वारा येतात. प्रतिपक्षाची भंबेरी उडवताना त्यांच्या शैलीला या म्हणी व वाक्प्रचारांचे तीक्ष्ण काटे येतात. नमुन्यादाखल काहीची नोंदच तेवढी करता येईल : दसकी लकडी एक का बोजा, मी हासते लोकाला शेंबूड माझ्या नाकाला, सळो की पळो करणे, टनभर बोलणे इंचभर न हलणे, तुम्ही आम्ही एक आणि कंठाळिला मेख, घोड्याचे ओझे गाढवावर लादणे, कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ, शिंगे मोडून वासरात शिरणे, आकाश पाताळ एक करणे, महार मेला आणि विटाळ गेला, भीक आलेली पुरवली पण भीड मोडू नये, नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही, रानात नाही शेत व गावात नाही घर, परदुःख शितल, हिंग गेला पण वास राहिला, माकडाच्या हाती कोलीत इत्यादीतून भाषेचे मऱ्हाट-मोळेपण प्रत्ययाला येते.

**संतांची वचने व संस्कृतातील वचने :** आपला विचार धारदार, प्रभावी व प्रत्ययकारी करण्यासाठी आंबेडकर संतांच्या वचनांचा समर्पक उपयोग करून घेतात. 'विष्णुमय जग, वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ' किंवा 'जातिकुळ येथे असे अप्रमाण : गुणाचे कारण नसे अंगी किंवा जरी तो ब्राह्मण झाला कर्मभ्रष्ट । तुका म्हणे श्रेष्ठ तिन्ही लोकी, अशा तुकारामांच्या तर भले "कुलवंत म्हणावे : तेही वेगी हजीर व्हावे हजीर न होता कष्टावे लागेल पुढे" अशा रामदासी वचनाचा आधार घेऊन आपले म्हणणे प्रभावी करतात. यावेळी परंपरेची समीक्षा करीत, परंपरेचा आधार घेत विवेचन करण्याची, त्याला अनेक आयाम प्राप्त करून देण्याची त्यांची हातोटी लक्षात येते तर यतोभ्युदयनिःश्रेयस सिद्धि स धर्मः, परोपदेशे पांडित्यम्, अर्थस्य पुरुषो दासा, काको ऽ पि जीवति चिराय बलिव भुंक्ते, सर्वं धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज इत्यादी संस्कृत वचनांचा आपला मुद्दा तेजस्वी करण्यासाठी ते वापर करतात. विचाराची आवाहनक्षमता वाढवितात.

**लेखांची पारदर्शक शीर्षके :** निबंधांची शीर्षके अत्यंत भेदक ठेवण्याचेही भान डॉ. आंबेडकरांना आहे. वाचकाला ही शीर्षके आकर्षित करतात. आरशात चेहरा दिसावा तसा या शीर्षकातून आंबेडकरांच्या

निबंधातील विचार दिसतो. ही शीर्षके मार्मिकता, रोचकता, अल्पाक्षर व सूचकता या गुणांनी युक्त आहेत. काही शीर्षके पहा : आप घरी बाटा बाप घरीही बाटा, अस्पृश्यता निवारणाचा पोरखेळ, आजवरि होतो तुझे सत्तेखाली तोवरि तो केली विटंबना, समतेसाठीच विषमता, आधी कळस मग पाया, हिंदूधर्माला नोटीस, ही बहिष्कृत भारतातील काही अग्रलेखांची शीर्षके तर बहिष्कृत भारतातील स्फुट लेखांची शीर्षके अत्यंत चटपटीत, धारदार आणि अणकुचीदार आहेत. काही अशी : आमच्या प्रतिनिधीने आमचे मीठ तोलले, आरसा आहे नाक असेल तर तोंड पाहून घ्या, निभणार नाही त्यात पडावे कशाला ? तंगड्या गळ्यात आल्या, सुशील पदरी असेल तरच सुबुद्धी येईल, टाळी एका हाताने वाजत नसते, हक्कांसाठी दैन्य का भाकावे, नकटा नकट्याला हसतो इ.

**सुभाषिते:** जीवनाचे सतत चिंतन करणाऱ्या व त्याची चिंता करणाऱ्या महामानवाच्या वाणीला सुभाषितांचे सौंदर्य प्राप्त होते. अल्पशब्दांमधून मोठा आशय सांगण्याची सिद्धी भाषेला प्राप्त होते तेव्हा शैली सुभाषितांनी मोहरून येते. भाषा आणि आशय यांचा झपूर्झा साधतो तेव्हा शैलीला सुभाषितप्रवणता प्राप्त होते. म्हणी, वाक्प्रचार आणि सुभाषिते म्हणजे गद्यातील काव्याच्या ओलाव्याच्या जागा होत. आधीच्या लेखकांची सुभाषिते वापरण्यातून बहुश्रुतता व्यक्त होते पण स्वतःची नवी सुभाषिते निर्माण करण्यातून नवनिर्मिती सिद्ध होते. सुभाषिते म्हणजे शैलीतले बेगड नव्हे. सजावट नव्हे. भाषेची रोशनाई नव्हे. तर परिपक्व मनाला आलेली ती विश्वसत्यांची फळे होत. निर्णयशालीता, जीवनाकलनावरची हुकुमत, भाषेवरील अंकुश आणि प्रज्ञा-प्रतिभेची सर्जनशक्ती एवढ्या गोष्टी सुभाषितांच्या जन्माला कारणीभूत होत असतात.

(१) समतावाद्यांचे ध्येय सर्वांना समानतेने वागविणे हे नसून समता प्रस्थापित करणे हे आहे.

(२) घरच्याच सहाय्याने आत आलेला शत्रू घर करून राहणार.

(३) समता हे सार्वजनिक नीतीचे एक मुख्य तत्त्व आहे.

(४) राजकारणात लायकीपेक्षा जबाबदारीचे महत्त्व विशेष आहे.

(५) लोकसंग्रहाचा आग्रह म्हणजे सत्याग्रह.

(६) अस्पृश्यांनी देशद्रोह केला, ही गोष्ट वाईट झाली असेल, पण त्याचे पातक ज्यांनी मानवद्रोह केला त्यांच्यावर आहे.

(७) ज्या समाजात जातीशिवाय गत नाही आणि जन्माशिवाय जात नाही त्या समाजात कोणीही परधर्माचा माणूस येण्यास धजत नाही.

(८) खरा शहाणपणा कोणावरही विश्वास न ठेवता स्वत:वर विश्वास ठेवणे यातच आहे.

(९) महाराष्ट्रातील राष्ट्रीय पुढारी तर कुटिलांचा कंपू !

(१०) बहिष्काराने जर शत्रूला धाक बसतो, असे असेल तर त्याच्यासारखे इतरांस वठणीवर आणण्याचे दुसरे महान शस्त्र नाही परंतु त्या शस्त्राची अशी विचित्र गती आहे की त्याच्या माऱ्याने शत्रुबरोबर स्वत:लाही घाव होतो.

(११) कोणतेही ध्येय कितीही हलके असले तरी ते साध्य करण्यास तपाची आवश्यकता असते. हे ध्येय जितके उच्च असेल तितके ते मिळविण्याकरिता करावी लागणारी तपश्चर्याही खडतर प्रकारची पाहिजे.

(१२) लोकांना मूर्ख किंवा माथेफिरू बनविणे सोपे असते पण शहाणपणा शिकविणे सोपे नसते.

(१३) धार्मिक कलह म्हणजे मूर्खपणाचा बाजार !

अशी अनंत सुभाषिते आंबेडकरांच्या मराठी निबंधांमधून विखुरलेली आहेत. त्यातून आपणापुढे साकार होतात ते आंबेडकर जसे विचार-सम्राट आहेत तसे भाषासम्राटही आहेत, असेच म्हणावे लागते. आंबेडकर आपल्या भाषेला सजवीत नाहीत. त्यांच्या विचार सौंदर्यानेच त्यांची भाषा रोचक होते.

**दृष्टान्त आणि रूपकांची प्रभा :** दृष्टान्त व रूपके यामुळे भाषेला चित्रशक्ती लाभते. अशा मोठ्या अर्थवाही दृष्टान्तांची योजना करून डॉ. आंबेडकर आपल्या वैचारिक निबंधाची चित्रशक्ती वाढवितात.

(१) आगबोटीतील एखाद्या उतारूने इतरांचे नुकसान करण्यासाठी किंवा त्यांची उडालेली त्रेधा पाहण्यासाठी वा विनाशक स्वभावामुळे जर बोटीतील इतर कुणाच्या खोलीस छिद्र पाडले तर बोटीतील इतरांसोबत त्यालाही जलसमाधी मिळते. हा दृष्टान्त ते (मूकनायकाच्या प्रथमांकात) एका जातीच्या माणसाने दुसऱ्या जातीचे नुकसान केले तर त्यांत त्याचेही नुकसान होते. समाजच बुडतो. भारतातील उच्चवर्णीयांनी याप्रकारे समाज बुडवला हे सांगण्यासाठी देतात.

(२) आगीतली धग, तिला तुच्छ मानून जिभेवर घेणाऱ्यांच्या जिभेला फोड आणते व आपली कदर करावयास लावते हा दृष्टान्त[११] त्यांनी अस्पृश्यांनी या आगीप्रमाणे वागायला हवे होते हे सांगताना वापरला आहे

(३) एखाद्या जनावाराला त्याचा निर्दय धनी कसाबाच्या स्वाधीन करतो हा दृष्टान्त[१२] ते इंग्रजांनी बहिष्कृतांना हिंदी वरिष्ठांच्या हवाली करण्याची घटना स्पष्ट करण्यासाठी वापरतात.

(४) घराला पडलेल्या मोठ्या भगदाडांकडे दुर्लक्ष करून एखादे बीळ पाहून रडणाऱ्या घरमालकाचा दृष्टान्त[१३] त्यांनी खान–मालिनी विवाहाच्या निमित्ताने हिंदूसमाजाच्या वृत्तीवर प्रकाश टाकण्यासाठी वापरला. तर हिंदूसमाजाचे कप्पेबंद स्वरूप स्पष्ट करण्यासाठी ते मूकनायकाच्या प्रथमांकात शिडी नसलेल्या चार मजल्यांच्या मनोऱ्याचा मोठा समर्पक दृष्टान्त वापरतात आणि आपला विचार वाचकांच्या काळजापर्यंत आणि मेंदूपर्यंत एकाच वेळी नेतात.

**कथासामर्थ्याचा उपयोग :** (१) एकाक्ष हरिणाची इसापनीतीतील कथा :[१४] हरिण आपला आंधळा डोळा तळ्याच्या बाजूस व धड डोळा जमिनीच्या बाजूस राहील या हुषारीने चरते त्यामुळे शिकारी त्याची शिकार करू शकत नाहीत. हिंदूसमाज म्हणजे हे एकाक्ष हरिण होय.

(११) तत्रैव २०–५–२७, (१२) तत्रैव ३–४–२७,
(१३) तत्रैव १२–८–२७, (१४) तत्रैव ब. भा. स्फुट लेख, २७–९–२९.

रूढीने त्याचा एक डोळा फोडल्याने त्याला त्या फुटक्या डोळयाच्या बाजूचे काहीच दिसत नाही शिवाय फुटका डोळा सोयीने फिरवून आत्मवंचना करण्याची कला हिंदूंनी साध्य केलेली आहे हे वरील कथेतून ते सांगतात.

(२) पांडवांच्या राजसूय यज्ञाच्या वेळी पुष्कळ ब्राह्मण जेवतात पण स्वर्गात घंटा वाजत नाहीत. शुक महर्षी राघुच्या रूपाने शिते खाऊ लागताच शितागणिक लक्षभोजन झाले म्हणून स्वर्गात घंटा वाजू लागल्या. ही कथा[१५] खान मालिनीच्या विवाहाच्या संदर्भात ते सांगतात.

(३) भीष्म, द्रोण व शल्य यांनी कौरवांनी आम्हाला अर्थाने बांधून टाकले आहे असे धर्मराजाला सांगण्याच्या निमित्ताने आलेली कथा[१६] त्यांनी अस्पृश्यांना आर्थिक स्वातंत्र्याचा मुद्दा पटवून देण्यासाठी सांगितली आहे.

(४) रामानुजाचार्यांच्या अब्राह्मण गुरूला सन्यस्त अवस्थेत तिरुवल्ली येथे भेटलेल्या चांडाळ स्त्रिची कथा[१७] डॉ. आंबेडकर समताप्रस्थापनेच्या कार्यातील रामानुजादि आचार्यांचा सहभाग स्पष्ट करताना सांगतात. इत्यादी कथा सांगून ते आपला विचार प्रत्ययकारी करतात. या अशा कथायोजनेतून त्यांचा जसा चौफेर व्यासंग जाणवतो तसा कथांचा चोखंदळ व समर्पक उपयोग करण्याची हातोटीही जाणवते.

**शोषणव्यवस्थेच्या पायात सुरूंग** टाकणारी ही त्यांची शैली आहे. 'सत्याअसत्याशी मन केले ग्वाही. मानियेले नाही बहुमता' अशी त्यांची सत्यनिष्ठ शैली आहे.

(१) "आमच्या देशात स्त्री शूद्रांना साध्या प्रणवाचा उच्चार करण्याचा अधिकार नाही असे शास्त्रमत निःशंकपणे मांडण्यात येत आहे."[१८]

(२) "हिंदू समाज हा अनेक वर्षे जगला आहे, तो केवळ गुलामांचे राष्ट्र म्हणून जगला आहे."[१९]

---

(१५)उनि. ब. भा. अग्रलेख १२-८-२७ (१६) तत्रैव २३-१२-२७, (१७) तत्रैव ३-६-२७. (१८) तत्रैव २१-१२-२८ (१९) तत्रैव २१-१२-२८

(३) "या देशात शोधक बुद्धीचे लोक उत्पन्न झाले नाहीत याचे तरी कारण ही अनिष्ट विवाहपद्धतीच होय."[२०]

(४) "मनुस्मृती जाळल्याने ब्राह्मण्य नष्ट होणार नाही ही शंका जर दुर्दैवाने खरी ठरली तर ब्राह्मण्य विध्वंसनासाठी ब्राह्मण्यग्रस्त लोकांना जाळणे किंवा हिंदुधर्माचा त्याग करणे या दोहोपैकी कोणती तरी एक गोष्ट करावी लागेल."[२१]

(५) "आगीतल्या धगीस तुच्छ मानून जिभेवर घेणाऱ्यास ती तशी त्यांच्या जिभेस फोड आणून आपली कदर करण्यास लावते तसे अस्पृश्य लोक त्यांना अस्पृश्य म्हणणाऱ्यांची जीभ उपटते तर कोणी कुणाला अस्पृश्य म्हणतेच ना."[२२]

(६) "ज्या जातीतील प्रत्येक माणूस उपजल्यापासून तो मरेपर्यंत दुसऱ्यांच्या अन्नावर जगतो, ज्याचा देह दुसऱ्याच्या घासकुटक्यावर पोसलेला असतो, त्याच्या अंगी आत्मतेज ते काय असणार.?"[२३]

(७) स्वाभिमानरहित गुलाम आपली स्वत:ची किंवा देशाची कधी-तरी उन्नती करू शकला आहे का ?"[२४]

(८) "महाभारतात वीरपत्नी विदुला हिने पुत्रास असे सांगितले की, अंथरुणावर पडून कुजत किंवा शंभर वर्षे निरर्थक जीवित घालविण्या-पेक्षा घटकाभर पराक्रमाची ज्योत दाखवून मेलास तरी बरे. तसेच दरेक अस्पृश्य मातेने आपल्या पुत्रास सांगण्याची वेळ येऊन ठेपली आहे. परंतु इतके मोठे असिधाराव्रत पाळण्यास अस्पृश्यास कोणीच लावीत नाही. फक्त तुरुंगात जाण्यास तयार व्हा. यापलीकडे त्यांच्यापासून दुसऱ्या कोणत्याही स्वार्थत्यागाची मागणी नाही. आणि तितकेही जर होत नसेल तर अस्पृश्य लोक पुरुष नसून हिजडे आहेत असेच म्हणावे लागेल."[२५]

---

(२०) तत्रैव २१–१२–२८ (२१) ब. भा. स्फुटलेख पृ. १३०
(२२) उनि; ब. भा. अग्रलेख २०–५–२७ (२३) तत्रैव १६–९–२७
(२४) जनता : ११–७–३६ (२५)उनि; ब. भा. अग्रलेख २५–११–२७

शीतून दंभस्फोट, आत्मपरीक्षण, संताप, प्रेरकता, उत्कटता, तळमळ, युक्तिवादचातुर्य, कठोर पण इष्टफलदायी शवविच्छेदन इत्यादी गुणांनी त्यांची शैली नटलेली आहे हे आपल्या लक्षात येते.

डॉ. आंबेडकर निरीश्वरवादी आहेत. त्यांच्या तर्कांची उड्डाणे बव्हंशी नास्तिक्याच्या नभोमंडळात चालतात. भावविवश ते होत नाहीत. त्यांची शैली भावना आणि बुद्धी या दोघांनाही सम्यक पातळीवरून प्रबोधित करते. विचारमंथन, संस्कृतीमंथन, सार्वत्रिक मूल्यांची घुसळण आणि त्यातून मानवी मूल्यांचे नवनीत काढणे हे या शैलीचे अंतरंगविशेष होत.

**संतप्त उपरोध :** महाराष्ट्रातील राष्ट्रीय पुढारी तर कुटिलांचा कंपू[२६] खरे गुलाम जगात कोण असतील तर हे ब्राह्मणांचे बगलबच्चे होत,'[२७] '...कावळ्याचे हजार वर्षे जगणे व हिंदू समाजाचे हे हजारो वर्षे जगणे सारखेच आहे."[२८] "...'तेथे लव्हाळे वाचती ।' या न्यायाने तो आतापर्यंत टिकून राहिला.[२९] "संस्था निराळी देवळे बांधण्याचा उपक्रम करते ती संस्था म्हणजे एक मूर्खांचा कंपू आहे...अशा लोकांना फासावर दिले तरी ते कार्य पुण्यप्रदच ठरेल...अशी बेवकूफ कामे हाती घेणाऱ्या संस्था नसलेल्या परवरल्या'[३०] पिठ्या महादु महाराला चावलेला साप त्याच्या अंगात आला व त्याने चांभार ही आपली जात सांगितली. कुलाबा समाचारने जातपात तोडक मंडळाने प्राण्यांमधील जाती नष्ट कराव्या असे अत्यंत कुत्सितपणे लिहिले त्याला डॉ. आंबेडकरांनी उपरोधाचा उत्कृष्ट नमुना ठरावे असे 'सापात चांभार आहेत की माणसात साप आहेत.'[३१] हे क्षणक्षणीत उत्तर दिले. प्रार्थना समाजाने त्याकाळी अस्पृश्यांसाठी काही शाळा काढल्या त्या बंद पडल्या पण याच समाजाने मात्र सासऱ्याशी, दिराशी अगर पुतण्याशी व्यभिचार करून पोट वाढविलेल्या स्पृश्य हिंदूंच्या बोडक्या बायांचे बाळंतपण सुखाने पार पाडावे

---

(२६) तत्रैव १६–९–२८ (२७) तत्रैव १२–७–२९ (२८) तत्रैव २१–६–२९ (२९) तत्रैव १२–४–२९ (३०) तत्रैव ३–६–२७ (३१) ब. भा. स्फुटलेख पृ. २६, २७ वरून उद्धृत.

म्हणून एक अनाथाश्रम खस्ता खाऊन, कर्जाला न जुमानता चालू ठेविला आहे. त्यावरून या समाजाला अस्पृश्यांविषयी कळवळ जास्त की बोडक्या बायांच्या बाळंतपणाची कळकळ जास्त [३२] ते दिसून येईल.

याप्रकारे त्यांची लेखणी उपरोधाचे शस्त्र चालविते. याशिवाय मुद्दा पटवून देण्यासाठी लागणारे युक्तिवाद कौशल्य,[३३] (दोन माणसे सुदृढ असतील तर) चित्रमय शैली[३४] (पेशवाईच्या काळात अस्पृश्यांना रस्त्यात थुंकून...) सूक्ष्मनिरीक्षण, भेदक अन्वयार्थशोधन या गुणांनी त्यांची शैली नटलेली आहे.

या शैलीतून बेदरकार, बेडर, निग्रही, निठावंत, त्यागी प्रामाणिक, स्वजननिष्ठ आणि राष्ट्रनिष्ठ अशा बुद्धिप्रामाण्यवादी प्रबोधनकाराची प्रतिमा साकार होते. ही शैली एका युगाला मार्गदर्शन करणारी, एका युगाने क्रांतीसाठी उभारलेला महासंगर साकार करणारी शैली आहे. उपहासाच्या शस्त्राने ती उच्चवर्णाचे बुरखे फाडते. ब्राह्मण्याचे धिंडवडे काढते. त्याविरुद्ध युद्ध पुकारते. ही महान पराक्रमी शैली आहे, तिने हजारो वर्षे गुलाम राहिलेल्या लोकांमध्ये गुलामीबद्दल ज्वालामुखी-प्रमाणे खदखदता असंतोष निर्माण केला. या लढ्यात त्यांनी भाषेला संघर्षशील व कृतीशील बनवले. आंबेडकरांची शैली येथील अन्यायग्रस्तांच्या संवेदनांशी बांधिलकी मानते. तीच तिची प्रतिज्ञा आहे. या भाषेला औपचारिकपणा मान्य नाही. स्वतःच्या अनन्य शक्तीचा अनुभव भोगणारी ही शैली आहे. सनातन हिंदूसमाजव्यवस्थेतील आसुरी रूढींचे निर्दय विच्छेदन केले आणि एका परखड, संतप्त व मनस्वी व्यक्तित्वाचे महा-शिल्प सिद्ध करणाऱ्या या शैलीने दलितांच्या विद्रोही शैलीची अग्निसूत्रे मनीमानसी जपली.

ही शैली भांडखोर आहे. ती कधी व्याकूळ होते. कधी विश्लेषण करते. कधी अंगार होते. कधी अश्रू होते. तुकोबा, लोकहितवादी, फुले

---

(३२) उनि; ब. भा. अग्रलेख १६-९-२९ (३३) तत्रैव १५ जुलै २७, (३४) तत्रैव १६ नोव्हें. २८.

यांच्या शैलीतील वर्णव्याशी या शैलीचें घरोब्याचे नाते आहे. प्रत्यक्ष पराक्रमाने नृत्य करावे तशी ही शैली आहे. अस्पृश्यता, जाती–वर्ण अन्याय, हिंदूधर्म यांच्या नावाने या शैलीच्या जिवाचा भडका उडतो आणि आंबेडकरांच्या निबंधातून ती थयथया नाचत निर्वाण मांडते.

ही निषेधशैली आहे. आशयावरील पकड ढळू न देणारी ही शैली संतापाचे लावण्य मांडते. पण हा संताप 'बुडती हे जन न देखवे डोळा, येतो कळवळा म्हणोनिया' त्यांना येतो. कळवळयाचे, संतापाचे, निषेधाचे नाट्य ही शैली साकार करते. नेमके शब्द, नेमकी विशेषणे वापरून ही शैली मर्मभेदक होते. या स्वाभाविक आक्रमक, रोखठोक, सडेतोड पण साध्या शैलीने हजारो वर्षे अस्मितेला पारखा झालेला बहिष्कृत भारत क्रांतीमनस्क केला. त्यातील अनोखा पुरुषार्थ जागविला.

या शैलीतून विसाव्या शतकातील आपल्या समाजक्रांतीच्या वाटचालीतील केंद्रवर्ती मानस घटना साकार केली. आगरकरांच्या नंतरचे, वैचारिक निबंधाचे सर्वोच्च शिखर सिद्ध केले.

(१) "...तो राग दुर्वासाचा नव्हता तर तो वाल्मिकाचा राग होता. वाल्मिकाचा राग नव्या जगाचे स्वप्न पहात होता,· बाबासाहेबांची लेखणी किंवा वाणी ज्वालामुखीसारखी आग ओकीत होती. तेव्हा ही लेखणी समताविष्ठीत शोषणरहित समाजाचे स्वप्न पहात होती "[३५] असे डॉ. फडके म्हणतात तर–

(२)" शतपत्रे जशी शब्दशस्त्रे आहेत तशीच परखड ही स्फुटे आहेत. बाबासाहेबांच्या मनाचे तसेच त्यांच्या सामाजिक व धार्मिक संघर्षाच्या स्पष्ट मार्गाचे प्रतिबिंब त्यात सापडते. त्यांच्याएवढा प्रांजळ, रोखठोक व प्रामाणिक लेखक मराठी भाषेला प्राप्त झाला हे सारस्वताचे अपूर्व भाग्य..."[३६] होय असे रा. ना. चव्हाण यांना वाटते तर–

(३५) भालचंद्र फडके, निबंधकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर **वसंत** दि. अंक १९८९. (३६) रा. ना. चव्हाण, 'बहिष्कृत भारता'तील **डॉ.** आंबेडकरांचे स्फुट लेख, **नवभारत**, वाई, नोव्हेंबर १९८१

(३) "...आंबेडकरांची विचारसरणी तेजस्वी असून भाषा धारदार आहे. त्यांची लेखनशैली उपरोधगर्भ असून ती प्रतिपक्षाच्या वर्मावर घाव घालताना मुळीच संकोचत नाही. ओज, सडेतोडपणा आणि स्फोटकता यामुळे ती अधिक वैशिष्टयपूर्ण बनते. तिच्यात गोडव्याऐवजी दिमाख आढळतो आणि तिच्यातील प्रसन्नतेची जागा संघर्ष घेतो. प्रतिपक्षाला धारेवर धरताना तिच्यात विलक्षण जोम निर्माण होऊन प्रतिपक्षाचे विचार हास्यास्पद आहेत हे सिद्ध करताना ती भरपूर बोचक होते."[३७] असे कृ. श्री. पेढणेकर म्हणतात.

अशा या शैलीने व तिच्यातून व्यक्त होणाऱ्या क्रांतिकारक विचार-धनाने आपल्या प्रबोधनाला विशुद्ध जडवादी केले. धर्मविहीन केले. या लेखनाने मराठीला एक उग्र, आक्रमक आणि गंभीर वैचारिक निबंध दिला. आंबेडकरांचे हे निबंधवैभव मराठीत अपूर्व आहे.

---

(३७) महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, २७-९-८१.

परिशिष्ट

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा त्रोटक जीवनपट

| | |
|---|---|
| १८९१ एप्रिल १४, | जन्म : महू, मध्यप्रदेश |
| १९०० नोव्हेम्बर | सातारा येथील शासकीय विद्यालयात प्रवेश |
| १९०८ जानेवारी | मुंबई विद्यापीठाची मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण |
| १९०८ जानेवारी | मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात प्रवेश |
| १९१३ जानेवारी | पर्शियन आणि इंग्रजी घेऊन बी. ए. उत्तीर्ण |
| १९१३ जुलै | कोलंबिया विद्यापीठात (न्यूयॉर्क) सयाजीराव गायकवाड यांची शिष्यवृत्ती घेऊन अभ्यासासाठी दाखल |
| १९१५ | अर्थशास्त्र हा प्रधान विषय घेऊन एम. ए. उत्तीर्ण. |
| १९१६ मे | दि कास्ट इन इंडिया या निबंधाचे वाचन. हा त्यांचा पहिला प्रकाशित निबंध. |
| १९१६ जून | स्कूल ऑफ एकॉनॉमिक्स व पोलिटिकल सायन्स, लंडन येथे दाखल. |
| १९१७ | कोलंबिया विद्यापीठात पीएच.डी. चे संशोधन पूर्ण. |
| १९१७ | 'स्मॉल होल्डिंग्स इन इंडिया अँड देअर रेमेडिज' प्रकाशित |
| १९१८ नोव्हेंबर | राजकीय अर्थशास्त्राचे मुंबईच्या सिडेनहॅम कॉलेजात प्राध्यापक. |
| १९२० जानेवारी | '**मूकनायक**' सुरू केले. |
| १९२१ जून | लंडन विद्यापीठाची एम. एस्सी. ही अर्थशास्त्रातील पदवी मिळाली. |

| | |
|---|---|
| १९२३ मार्च | दि. प्रॉब्लेम ऑफ रूपी या प्रबंधाला अर्थशास्त्रातील डी. एस्सी ही सर्वोच्च पदवी मिळाली. |
| १९२६ | मुंबई शासनात एम्. एल. सी. म्हणून नियुक्ती |
| १९२६ मार्च | चवदार तळयाचा महाड येथील सत्याग्रह |
| १९२७ एप्रिल | ' बहिष्कृत भारत ' सुरू केले |
| १९२८ जून | सरकारी विधी महाविद्यालयात प्राध्यापक |
| १९३० ते ३५ | नासिक काळाराम मंदिर सत्याग्रह |
| १९३० | ' जनता ' पत्र सुरू केले |
| १९३०–३२ | गोलमेज परिषदेत सहभागी |
| १९३२ सप्टेंबर | पुणे करार |
| १९३५ जून | मुंबईच्या सरकारी विधी महाविद्यालयाचे प्राचार्य |
| १९३५ ऑक्टोबर | हिंदूधर्मत्यागाची येवला येथे घोषणा |
| १९३६ ऑगस्ट | स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना |
| १९४५ जुलै | पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना |
| १९४६ ऑक्टोबर | ' हू वेअर शूद्राज ' प्रकाशित |
| १९४७ ऑगस्ट | घटना समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्त |
| १९४७ ऑगस्ट | स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री |
| १९४९ नोव्हेंबर | भारतीय संविधान सादर |
| १९५० जून | औरंगाबादला मिलिंद महाविद्यालयाची स्थापना |
| १९५२ मार्च | कोलंबिया विद्यापीठाने एल्एल्. डी. पदवी दिली |
| १९५५ मे | भारतीय बौद्ध महासभेची स्थापना |
| १९५५ | ' प्रबुद्ध भारत ' सुरू |
| १९५६ ऑक्टो. १४, | बुद्धधम्मस्वीकार |
| १९५६ नोव्हेंबर | जागतिक बौद्ध परिषदेला खाटमांडू येथे प्रतिनिधी म्हणून हजर |
| १९५६ डिसेंबर ६, | दिल्ली येथे महापरिनिर्वाण |
| १९५७ | दि बुद्धा अँड हिज धम्माचे प्रकाशन |

—

▸ मुल्य ५०/- रु.